ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

## बी.एड. शिक्षणक्रम माहितीपुस्तिका (P80)

**शैक्षणिक वर्ष : 2016–2018**

# बी.एड. प्रवेश २०१६-१८ Online

## प्रवेश अर्जासंदर्भात

**<u>महत्त्वपूर्ण सूचना</u> :**

(१) Online माहितीपुस्तिका विनामूल्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने ती डाऊनलोड करून शांतपणे पूर्णतः वाचावी व नंतरच Online अर्ज भरावा.

(२) Online अर्ज भरताना आपण भरलेली माहिती बरोबर आहे याची खात्री केल्याशिवाय शेवटचे Submit बटन दाबू नये कारण एकदा Online अर्जात भरलेली माहिती पुन्हा बदलता येत नाही.

(३) Online अर्जात भरलेल्या संपूर्ण माहितीचे पुरावे प्रवेशाच्या वेळी आपणाकडे असणे अनिवार्य असेल.

(४) Online अर्जात माहिती भरल्यानंतर नेट बँकींगद्वारा एक्सेस बँक किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये खुल्या प्रवर्गासाठी रु. ४००/- आणि राखीव प्रवर्गासाठी रु. २००/- या प्रमाणे प्रोसेसींग शुल्क भरावे.

(५) Online अर्ज भरणेसाठीची आवश्यक माहिती माहितीपुस्तिकेतील भाग १ व भाग २ मध्ये वाचावी.

(६) प्रवेशासाठी तुम्हांला दोन अर्ज भरावे लागतील, ते म्हणजे -

(अ) ऑनलाईन संगणकीय अर्ज

(आ) छापील नमुना अर्ज - (पुस्तिकेत शेवटी जोडलेला आहे.)

ऑनलाईन संगणकीय अर्जाची प्रिंट आणि या पुस्तिकेत देण्यात आलेला छापील अर्ज पूर्णतः भरून प्रवेश मुलाखतीच्या वेळी तुम्हांला सादर करावा लागेल.

(७) Online प्रवेश-अर्ज प्रत व या पुस्तिकेतील छापील नमुन्यातील आपण भरलेला अर्ज हरविल्यास प्रत्यक्ष प्रवेशात अडचणी निर्माण होतील.

(८) ऑनलाईन संगणकीय अर्ज एकदा सादर केल्यानंतर विद्यार्थ्याने भरलेल्या माहितीत कोणताही बदल स्वीकारला जाणार नाही. त्यासंदर्भात विद्यापीठाशी पत्रव्यवहार करू नये.

(९) एन.सी.टी.ई. नियमानुसार पत्राद्वारा डी.एड. पूर्ण करणारे विद्यार्थी प्रवेशास अपात्र असतील.

(१०) एन.सी.टी.ई. नियमानुसार केवळ डी.एड. नियमित करणारे विद्यार्थीच प्रवेशास पात्र असतील.

**विद्यापीठ वेबसाईट**

***http://ycmou.digitaluniversity.ac***

Anurath/AF16-152

## *अनुक्रमणिका*

**भाग १ : बी.एड. प्रवेशासंदर्भात सर्वसामान्य माहिती**


०१. मुक्त विद्यापीठाविषयी थोडेसे ........ ४
०२. विद्याशाखेविषयी थोडेसे ........ ४
०३. शिक्षणक्रमासंबंधी ........ ४
०४. हा शिक्षणक्रम कोणासाठी ? ........ ४
०५. शिक्षणक्रम प्रवेश-पात्रता ........ ५
०६. प्रवेशासाठी अपात्र ........ ५
०७. एकूण जागा ........ ६
०८. अतिरिक्त व राखीव जागांबाबत ........ ६
०९. प्रवेश-अर्ज कसा भरावा ........ ७
१०. निवड-प्रक्रिया ........ ११
११. शिक्षणक्रमाचे माध्यम ........ १२
१२. परीक्षेचे माध्यम ........ १२
१३. शिक्षणक्रमाची संरचना/आकृतिबंध ........ १२
१४. संपर्कसत्रांचा कार्यक्रम व उपस्थिती ........ १३
१५. अंतिम परीक्षेस पात्र होण्यासाठी अटी ........ १४
१६. विद्यार्थी-मूल्यमापन ........ १४
१७. शिक्षणक्रमाचे शुल्क ........ १५
१८. विभागीय केंद्रे ........ १६
१९. अभ्यासकेंद्रे, प्रवेश-अर्ज विक्री/जमा केंद्रे ........ १६
२०. विशेष नोंदी ........ १९
२१. संपर्कासाठी ........ १९


**भाग २ : बी.एड. प्रवेश-प्रक्रियेत संगणकाचा वापर**


- प्रास्ताविक ........ २२
- बी.एड. प्रवेश-प्रक्रियेत माहिती तंत्रविज्ञानाचा वापर ........ २२
- बी.एड. प्रवेश-प्रक्रियेत ऑनलाईन प्रवेश अर्जाचा वापर ........ २२
- **परिशिष्ट - १** : जातीनिहाय आरक्षण ........ ३९
- **परिशिष्ट - २** : अपंग विद्यार्थी प्रवेश कार्यपद्धती (बी.एड.) ........ ४०
- **परिशिष्ट - ३** : मान्यताप्राप्त प्रयोगशील शाळा यादी ........ ४१
- **परिशिष्ट - ४** : प्रवेश-अर्ज प्रत ........ ४३
- **परिशिष्ट - ५** : मेंटार मान्यता प्रपत्र ........ ४९


### आवाहन

शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अध्यापकांनी ही माहितीपुस्तिका डाऊनलोड करून अतिशय काळजीपूर्वक वाचावे. पुस्तिकेच्या भाग २ मध्ये प्रवेश-अर्जाचे दोन नमुने दिले आहेत : एक साधा, जुन्या पद्धतीचा आणि दुसरा संगणकीय 'संगणकीय' पद्धतीचा. त्यातील आवश्यक सूचना वाचून अर्जाचे दोन्ही नमुने काळजीपूर्वक भरावेत. या शिक्षणक्रमाला दिला जाणारा प्रवेश केवळ गुणवत्तेनुसार व नियमानुसार दिला जातो, **अन्य कोणताही मार्ग कोणी सूचित केल्यास कुलगुरू, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा किंवा प्रमुख, परीक्षा व नोंदणी कक्ष ह्यांच्याशी संपर्क साधावा.**

## भाग १

# बी.एड. प्रवेशासंदर्भात सर्वसामान्य माहिती

## २०१६ – २०१८

# भाग १: बी.एड. प्रवेशासंदर्भात सर्वसामान्य माहिती

## १. मुक्त विद्यापीठाविषयी थोडेसे

महाराष्ट्र शासनाने या मुक्त विद्यापीठाची स्थापना 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा १९८९' अन्वये १ जुलै १९८९ रोजी केलेली आहे. भारतातले हे पाचवे मुक्त विद्यापीठ. देशात विविध राज्यांत सुरू झालेल्या राज्य स्तरावरील मुक्त विद्यापीठांपैकी हे चौथे.

औपचारिक शिक्षण अर्धवट राहिलेल्या, अर्थार्जन करीत असलेल्या अनेकांना पुढे शिक्षण घेता यावे ह्या हेतूने मुक्त विद्यापीठांची स्थापना झाली. अशा शिक्षणाचे अनेक लाभ संभवतात. निर्भेळ ज्ञानसाधना करता येते, अधिक परिणामकारक सामाजिक समायोजन साधता येते, स्वतःची नोकरी, व्यवसाय वा उद्योग नव्या ज्ञान-कौशल्यांतून अधिक नेटका करता येतो. हा अनुभव जगभराच्या मुक्त विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्यक्रमांतून शिक्षण घेणाऱ्यांना येत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. प्रारंभी सेवा-उद्योग करणाऱ्या युवक-युवतींच्या पुढील शिक्षणाचा विचार करणे अगत्याचे असले तरी ह्या विद्यापीठाने लोकविद्यापीठ बनण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे व अशा संधीतून सामाजिक न्याय व समता निर्माण करणे ही ह्या मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे आहेत.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची (Distance Education) असते. ह्या पद्धतीत विद्यार्थ्याला अध्ययन-साहित्य दिले जाते. शैक्षणिक कार्यक्रमातील प्रात्यक्षिके, प्रयोग करता यावेत, ध्वनिफिती व चित्रफिती ह्यांचा लाभ व्हावा आणि तज्ज्ञ मार्गदर्शक अध्यापकांचे मार्गदर्शन घेता यावे म्हणून विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्रासाठी विद्यार्थ्यांना उपस्थित राहावे लागते. ह्या विद्यापीठाचे कार्यालय नाशिक येथे आहे, परंतु अभ्यासकेंद्रे राज्यभर विखुरलेली आहेत; त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी नजीकच्या अभ्यासकेंद्राचा लाभ घेता येतो. या विद्यापीठाला २००२ या वर्षाचा Commonwealth of Learning, Canada या संस्थेचा Award of Excellence for Institutional Achievement मिळालेला आहे.

## २. विद्याशाखेविषयी थोडेसे

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. त्यातील एक म्हणजे शिक्षणशास्त्र विद्याशाखा होय. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षाच्या कालावधीत म्हणजे १९९० मध्ये या विद्याशाखेने नावारूपाला येण्याच्या दृष्टीने पावले उचलली. १९९१ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी.एड., १९९४ मध्ये एम.एड., शालेय व्यवस्थापन पदविका, १९९८ मध्ये सहयोगी बी.एड. तर १९९९ पासून स्वयं-साहाय्य गट बांधणी आणि बालसेविकासारखे प्रमाणपत्र, एम.फिल. (शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण), एम. ए. शिक्षणक्रम सुरू केले. ज्या आधारे विद्यापीठाला तळागाळातील लोकांपर्यंत बहुसंख्येने पोहोचणे शक्य झाले. त्या दृष्टीने विद्याशाखेने स्वतःची उद्दिष्टे, व्रतविधानही तयार केले आहे. या विद्याशाखेतील सर्वांत महत्त्वाचा मानला जाणारा हा सेवांतर्गत शिक्षक -प्रशिक्षण (बी.एड.) शिक्षणक्रम होय. या विद्याशाखेची एम.एड. शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी श्रीमती स्वाती वानखेडे यांना Commonwealth of Learning, Canada या संस्थेचा Award of Excellence for Distance Learning Experience पुरस्कार २००४ साली प्राप्त झालेला आहे.

## ३. शिक्षणक्रमासंबंधी

महाराष्ट्रात व देशभर पारंपरिक विद्यापीठांमधून बी.एड.चा एक वर्ष कालावधीचा शिक्षणक्रम सुरू आहे. पण नोकरी करणाऱ्या शिक्षकांच्या दृष्टीने तो सोईचा नाही. शिक्षणशास्त्र विद्याशाखेने अशा शिक्षकांसाठी नोकरी करीत असताना पूर्ण करता येईल असा २ वर्षे कालावधीचा 'शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम' (बी.एड.) १९९१ पासून सुरू केलेला आहे.

**ह्या शिक्षणक्रमाचा कालावधी २ वर्षांचा असला तरी विद्यार्थी त्याच्या सोईप्रमाणे प्रवेश घेतल्यापासून ५ वर्षांत हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकतात. ह्या कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी पुन्हा तीन वर्षांसाठी ज्या वर्षी नोंदणी कालावधी संपतो त्या वर्षाच्या तुकडीचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी करण्याची संधी देण्यात येते.**

दूरशिक्षणाच्या परिभाषेत हा संपूर्ण शिक्षणक्रम ५४ श्रेयांकांचा म्हणजे सुमारे १,७५५ अध्ययन-तासांचा आहे.

(एक श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ तासांचा अभ्यास होय.)

## ४. हा शिक्षणक्रम कोणासाठी ?

**या शिक्षणक्रमाला प्राथमिक शिक्षणातील सेवांतर्गत प्रशिक्षित शिक्षक ज्यांनी पारंपरिक पद्धतीने एन.सी.टी.ई. मान्य डी.एड. पूर्ण केले आहे असे शिक्षक प्रवेशास पात्र असतील.**

## ५. शिक्षणक्रम प्रवेश–पात्रता

### किमान पात्रता

५.१ यू.जी.सी. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.

५.२ **पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षेत ५०% (४९.५ ते ४९.९९ टक्के पर्यंतचे गुण) व मागासवर्गीय उमेदवारांना किमान ४५% (४४.५ ते ४४.९९ टक्के पर्यंतचे गुण) गुण असणे अनिवार्य आहे.**

५.३ डी.एड. शिक्षणक्रम पारंपरिक शिक्षण पद्धतीने (F to F mode) पूर्ण केलेले आणि मान्यताप्राप्त प्राथमिक स्तरावर शासनाने मंजूर केलेल्या पदावर पूर्णवेळ/अर्धवेळ काम करणाऱ्या व किमान दोन वर्षांचा (अर्धवेळ असल्यास ४ वर्षे) अनुभव असलेल्या अध्यापकांना सेवाज्येष्ठतेनुसार प्रवेश मिळेल.

५.४ पूर्णवेळ/अर्धवेळ सेवेत असलेल्या व शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत सेवेत ठेवले जाईल असे शाळा प्रमुखांचे प्रमाणपत्र देऊ शकणाऱ्या पदवीधर शिक्षकांना ह्या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. अर्धवेळ सेवेत असणाऱ्या शिक्षकांची सेवा 'दोन वर्षे अर्धवेळ असेल तर त्याचे एक वर्ष' याप्रमाणे एकूण सेवा कालावधी विचारात घेण्यात येईल. शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंतच्या इतर अटी पूर्णवेळ सेवेत असणाऱ्या शिक्षकांप्रमाणेच असतील.

## ६. प्रवेशासाठी अपात्र

पुढील प्रकारच्या अर्जांचा प्रवेशासाठी विचार केला जात **नाही** आणि अशी आवेदनपत्रे सादर झाल्यास ती रद्द करण्यात येतील व उमेदवारास याबाबत कळविले जाणार नाही.

६.१ दूरस्थ/पत्रादाव्रा डी.एड. करणारे शिक्षक.

६.२ ज्यांच्या सेवा आदेशात शिक्षक नियुक्ती असा उल्लेख नाही.

६.३ एकापेक्षा जास्त अभ्यासकेंद्रावरून प्रवेश अर्ज भरणारे विद्यार्थी.

६.४ प्रवेश अर्जात चुकीची माहिती भरणारे विद्यार्थी.

६.५ सेवेत नसलेले अध्यापक.

६.६ तासिका वेतनावर कार्यरत शिक्षक.

६.७ **यू. जी. सी. व महाराष्ट्र शासन ह्यांची मान्यता नसलेल्या विद्यापीठाचे पदवीधारक.**

६.८ माध्यमिक/उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक/प्रयोगशाळा सहायक / कनिष्ठ सहायक/ लिपिक, ग्रंथपाल, इत्यादी.

६.९ पदवी वर्षाच्या अंतिम परीक्षेस बसलेले परंतु निकाल न लागल्यामुळे पदवी परीक्षेचे पदवी प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिकेची सत्यप्रत न जोडणारे शिक्षक.

६.१० बालवाडीत शिकविणारे अध्यापक.

६.११ तांत्रिक विद्यालये, कृषी विद्यालये व तत्सम अन्य विद्यालये, एम.सी.व्ही.सी. निदेशक (Instructor) यांचा विचार प्रवेशासाठी करण्यात येणार नाही.

६.१२ प्रवेश-अर्जावर ज्या मुख्याध्यापकाची स्वाक्षरी असेल त्यांचीच स्वाक्षरी प्रवेश घेताना हमी-पत्रावर असणे आवश्यक आहे. परंतु मुख्याध्यापकांची बदली / निवृत्ती किंवा अन्य कारणांमुळे पदात बदल झाला असल्यास नवीन मुख्याध्यापकांची सही व त्यासोबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास प्रवेशा-साठी पात्र समजण्यात येईल अन्यथा अपात्र ठरेल. मात्र मुख्याध्यापकच स्वतः उमेदवार असेल, तर संस्थेच्या सेक्रेटरीची किंवा शिक्षणाधिकारी यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे. तसे नसल्यास सदर प्रवेशेच्छु अपात्र ठरेल.

६.१३ **ह्या विद्यापीठातील शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी आहे. त्यामुळे बी.एड. शिक्षणक्रमाचे माध्यम, साहित्य व प्रश्नपत्रिका मराठीत असतील. त्यामुळे मराठीचे पुरेसे ज्ञान नसणारे विद्यार्थी.**

६.१४ राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र/जात पडताळणी प्रमाणपत्र/ सायस्तर नसल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर न करू शकणारे (ज्यांनी जातीच्या रकान्यात ✓ अशी खूण केली आहे, अशांसाठी).

**आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या अर्जदारांपैकी अनुसूचित जमातीसाठी जात वैधता प्रमाणपत्र तर विमुक्त व भटक्या जमातींपैकी आणि इतर मागासांना व विशेष मागास प्रवर्गाला सायस्तर नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करावे लागेल. ते नसल्यास प्रवेश देण्यात येणार नाही म्हणून आपल्या जवळ उपर्युक्त प्रमाणपत्रे असतील तरच प्रवेश-अर्जात तशी नोंद करावी. अन्यथा खुल्या प्रवर्गातूनच अर्ज भरणे अधिक उचित ठरेल.**

६.१५ मतिमंद/मूकबधिर/अंध विद्यार्थ्यांनी बी.एड. प्रवेशासाठी अर्ज केल्यास स्वतःच्या प्रयत्नांनी प्राप्त अभ्याससाहित्याद्वारे अभ्यास करू शकणाऱ्या प्रवेशच्छूचा विशेष बाब म्हणून प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

**महत्त्वाचे : ज्या जिल्ह्यात तुमची शाळा असेल त्याच जिल्ह्यातून प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल व त्या जिल्ह्याचाच संकेतांक 'प्रवेश-अर्ज आणि संगणक अर्जात' लिहावा. अन्य जिल्ह्याचा संकेतांक लिहिला तसेच एकापेक्षा जास्त जिल्ह्यातून प्रवेश-अर्ज भरल्यास तुमचा प्रवेशासाठी विचार होणार नाही आणि चुकून प्रवेशासाठी विचार करण्यात आला असेल तर मुलाखतीच्या वेळी तो रद्द करण्यात येईल. त्यासंदर्भात संपूर्ण जबाबदारी तुमची असेल. याची सर्व प्रवेशेच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

६.१६ विद्यापीठाला प्रवेशाच्या वेळी चुकीची माहिती दिल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर केलेल्या छाननीत तक्रारीविषय तथ्य आढळले तर सदर प्रवेश रद्द करण्यात येईल व शुल्कही परत केले जाणार नाही. हा निर्णय पूर्णतः विद्यापीठातील मुख्य समिती करेल. तो त्या समितीचा अधिकार असेल. त्यासंदर्भात कोणतीही तक्रार **ऐकली जाणार नाही.**

६.१७ प्रवेश प्रक्रिया दरम्यान प्रवेशासंदर्भात वेळोवेळी करण्यात आलेली तक्रार, प्रत्यक्ष प्रवेश मुलाखतीत होणारा अंतिम प्रवेशापर्यंतच विचारात घेण्यात येतील. त्यानंतर कोणतीही तक्रार विचाराधीन नसेल, याची नोंद घ्यावी.

## ७. एकूण जागा

ह्या शिक्षणक्रमाकरिता महाराष्ट्र राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यांसाठी एन.सी.टी.ई.ने निर्धारित केलेल्या जागांनुसार शिक्षकांना प्रवेश देण्यात येतील. त्यात महाराष्ट्र शासनाचा राखीव जागांच्या आदेशाचे पालन करण्यात येईल.

## ८. अतिरिक्त, राखीव जागांबाबत

राखीव जागा, प्रकल्पग्रस्त, सीमावर्ती भाग, इत्यादींसाठी विशेष तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

शासननियमानुसार व विद्यापीठ ठरावानुसार खालीलप्रमाणे अतिरिक्त व राखीव जागा राहतील.

८.१ महाराष्ट्र शासनाच्या निर्णय क्रमांक एसटीसी १०९९/बी.एड. प्रवेश/(१४/९९)/मशि-३ दि. १९ जानेवारी ९९ अन्वये अनुक्रमे अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती / विमुक्त व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी ५०% जागा राखून ठेवलेल्या आहेत. ह्या जागा शासनाच्या उपर्युक्त निर्णयानुसार भरण्यात येतील. एकूण निर्धारित जागांमध्ये आरक्षण पुढीलप्रमाणे राहील.

**आरक्षित जागा दर्शविणारा तक्ता**

| *क्र.* | *प्रवर्ग* | *प्रमाण/टक्के* |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती (SC) | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ७% |
| ३. | विमुक्त जाती (मूळ १४ व तत्सम जाती) 'अ'(VJ-A) | ३% |
| ४. | भटक्या जमाती (जाने. १९९७ पूर्वीच्या २८ व तत्सम जाती, नव्याने समाविष्ट (NT-B) केलेल्या तत्सम जाती) 'ब' (७ मे २००५ जी.आर.) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) 'क'(NT-C) | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) 'ड'(NT-D) | २% |
| ७. | इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.)(OBC) | १९% |
| | **एकूण** | **५०%** |

*(प्रवेश देताना केंद्रावरील प्रवेश संख्येचा विचार करता आरक्षणाबाबत पूर्णतः न्याय देता येत नाही, अशावेळी एखाद्या संवर्गाचा विचार त्या वर्षी करण्यात येतो; मात्र पुढील वर्षी इतर संवर्गाचा क्रमाने विचार केला जातो याची नोंद घ्यावी.)*

८.२ संगणकीय अर्ज भरतेवेळी अनुसूचित जमातीतील उमेदवारांकडे **जात-वैधता प्रमाणपत्र** असणे आवश्यक आहे. **तुम्ही नोकरीत असल्याने हे प्रमाणपत्र त्या त्या व्यवस्थापनाकडे सादर करावे लागतेच त्यामुळे ते तुमच्याकडे आहेच असे गृहीत धरलेले आहे.** जर तुमच्याकडे जात-वैधता प्रमाणपत्र नसेल तर राखीव जागांतून अर्ज करू नये. कारण त्यामुळे प्रत्यक्ष प्रवेशाचे वेळी तुमचा प्रवेश केला जाणार नाही.

तसेच ओ.बी.सी. आणि विमुक्त व भटक्या जमाती **यांच्याकडे प्रवेश-अर्ज भरतेवेळी सायस्तर नसल्याचा दाखला असणे आवश्यक आहे.** ज्यामुळे सायस्तर दाखला प्राप्त झालेल्या तारखेची नोंद संगणकीय प्रवेश अर्जात करावी लागेल आणि ती १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ असणे आवश्यक आहे. तशी नोंद केली नसेल तर तो अर्ज संगणकात स्वीकारला जाणार नाही. **ती तारीख खोटी आढळल्यास खोटी माहिती विद्यापीठास पुरवल्या कारणावरून तुमचा अर्ज मुलाखतीचे वेळी किंवा तत्पूर्वी रद्द करण्यात येईल.** त्यामुळे सायस्तर नसल्याचा दाखला तुमच्याकडे नसल्यास जनरलमधून अर्ज भरावा कारण प्रवेशाच्या वेळी या संदर्भात कोणत्याही प्रकारची मुदत देण्यात येणार नाही तसेच प्रवेशही देण्यात येणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

८.३ प्रवेश मुलाखतीस बोलावल्यास मुलाखतीच्या वेळी ह्या माहिती-पुस्तिकेतील अर्ज सर्व कागदपत्रांसह सोबत आणावा. प्रवेश मुलाखतीच्या वेळी ह्या माहितीपुस्तिकेतील प्रवेश-अर्ज ऑनलाईन प्रत तुमच्याजवळ नसल्यास प्रवेशासंदर्भात अडचणी निर्माण होतील व त्याची पूर्णतः जबाबदारी उमेदवाराची असेल.

८.४ **आरक्षित जागांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने बी.एड. प्रवेश मुलाखतीच्या वेळी जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत आणावी अन्यथा मुलाखतीस येऊ नये.**

आरक्षित जागांसाठी खालील प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या प्रवेशासाठी खालील प्रमाणपत्रे **मुलाखतीच्या वेळेस** सादर करणे अनिवार्य आहे. शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार समावेश करण्यात आलेल्या जाती / उपजाती आरक्षणासाठी पात्र राहतील.

(अ) अनुसूचित जमातीच्या (S.T.) उमेदवारांसाठी जातीचे वैधता प्रमाणपत्र.

(आ) विमुक्त जाती/भटक्या जमाती/इतर मागासवर्ग/विशेष मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवारांनी 'सायस्तर नसल्याचा दाखला' (नॉन क्रिमिलेअर) व जातीचे प्रमाणपत्र.

८.५ **विशेष मागास प्रवर्गाबाबतची तरतूद**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासननिर्णय क्र.टीईएम/३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१/दि. ११ जुलै ९७ च्या शासननिर्णयानुसार आरक्षित जागा एकूण ५० टक्के करण्यात आल्या. गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या **जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण** प्रवेशक्षमतेच्या जास्तीत- जास्त २ टक्क्यांपर्यंत विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

तसेच शासननिर्णय क्र. एसटीसी–१००१/बी.एड.प्रवेश/(२४/२००१)/मशि – ३ दिनांक ३० जानेवारी २००१ मधील तरतूद क्र. ३.५ अन्वये विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना संबंधित सक्षम अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र योग्य त्या पद्धतीचा अवलंब करून देण्याबाबतचा उल्लेख आहे. त्यानुसार कार्यवाही होईल.

८.६ शासन निर्णयानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० % जागा महिला उमेदवारांकरिता राखीव राहतील.

*टीप : आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.*

८.७ **अपंग शिक्षक** : अपंग शिक्षकांसाठी ३% आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्याची संपूर्ण महाराष्ट्रातील प्रवेशेच्छुंची जनरल गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्तेनुसार प्रवेशप्राप्त अपंगांना वगळून ह्या गुणवत्ता यादीत १% अल्पदृष्टी, १% कर्णबधिर, १% अस्थिव्यंगाचा समावेश असेल. जिल्हानिहाय गुणवत्तायादी असल्याने प्रत्येक जिल्ह्यास किमान एक आणि कमाल दोन जागा दिल्या जातील. अशा एकूण ४५ जागा संपूर्ण महाराष्ट्रात अपंगांसाठी शासन नियमानुसार राखीव असतील. (अपंगाबाबतची सविस्तर योजना माहितीपुस्तिकेतील परिशिष्टामध्ये दिलेली आहे ती पाहावी. त्या संदर्भात काही आक्षेप असल्यास प्रवेश–अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांच्या आत विद्यापीठाच्या नोंदणी कक्ष प्रमुख यांच्या नावे कळवावे.) अपंगांचे आरक्षण अंतर्गत असल्यामुळे प्रथम गुणवत्तेनुसार या जागा भरल्या जातील व भरलेल्या जागा ज्या संवर्गाच्या असतील तेवढ्या जागा नियमित प्रवेशाच्या जागांमधून कमी होतील.

८.८ **सैनिक** : सैन्य दलातील सक्रिय सेवेत असलेले आजी व माजी कर्मचारी किंवा त्यांचा मुलगा/मुलगी यांना **२% जागा** राखून ठेवल्या जातील.

८.९ स्वातंत्र्यसैनिक पती/पत्नी, मुलगा/मुलगी, भूकंप व प्रकल्पग्रस्त, विधवा व परित्यक्ता यांपैकी एकाच संवर्गासाठी **अतिरिक्त २ गुण** देण्यात येतील.

८.१० **गोवा, बेळगाव व बिदर** : गोवा, बेळगाव व बिदर हा मराठी भाषक प्रदेश असल्याने गोवा व सीमा भागातल्या मराठी भाषक शिक्षकांसाठी **प्रत्येक ५०० विद्यार्थ्यांमागे एक जागा देण्यात येईल.** सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांचा एक संच तयार ठेवावा. प्रवेश मुलाखतीच्या वेळी त्याचा पडताळा घेण्यात येईल. नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी/हिंदी/इंग्रजीतच असावेत. इंग्रजी वा मराठीत नियुक्ती आदेश व दाखले नसतील तर त्याची मराठीतील अधिकृत भाषांतरित प्रत आणावी. त्यावर मुख्याध्यापकाची सही व शिक्का असणे अनिवार्य आहे.

८.११ **प्रयोगशील शाळा** : युनिसेफनी निवड केलेल्या प्रयोगशील शाळांतील अप्रशिक्षित शिक्षकांसाठी **५०० विद्यार्थ्यांमागे एक जागा राखीव** ठेवण्यात येईल.

**ह्या शिक्षकांनी आपले प्रवेश–अर्ज व संगणकीय अर्जाची प्रत भरून बंद पाकिटात त्यावर 'प्रयोगशील शाळेसाठीचा अर्ज' असे नोंदवून तो विद्यापीठाच्या नोंदणी कक्ष, विद्यार्थी सेवा विभाग, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या–कडेच पाठवावयाचा आहे** ह्याची नोंद घ्यावी. प्रवेशापूर्वी त्यांना मुख्याध्यापक/संस्थाप्रमुखांचे स्वतंत्र हमीपत्र भरून पाठवावे लागेल. स्वतंत्रपणे अर्ज न आल्यास त्या अर्जाचा विचार होणार नाही.

**आरक्षित व राखीव जागांसाठी अर्ज करणाऱ्या अध्यापकाने किमान पात्रतेची अट पूर्ण करणे आवश्यक आहे.**

## ९. प्रवेश–अर्ज कसा भरावा

**बी.एड. प्रवेश–अर्ज भरण्याचे मार्गदर्शन पूर्णतः ऑनलाईन आहे. त्यामुळे माहितीपुस्तिका बारकाईने वाचून मगच ऑनलाईन प्रवेश–अर्ज भरावा. प्रवेश–अर्ज भरतेवेळी आपण राखीव प्रवर्गातील असाल तर ना सायस्तर, जात पडताळणी दाखला आपणाजवळ असणे आवश्यक आहे. कारण त्या कागदपत्रावरील प्राप्तीचे दिनांक अर्जात भरावे लागतील. नेट बँकींगद्वारे प्रोसेसिंग शुल्क भरल्यानंतर आपल्याला आपला प्रवेश–अर्ज यशस्वीपणे भरला गेल्याचा मेसेज येईल. ज्या विद्यार्थ्यांना अर्ज यशस्वीपणे भरल्याचा मेसेज येईल तेवढेच अर्ज प्रवेशासाठी विचाराधीन असतील, याची नोंद घ्यावी. उपरोक्त प्रक्रियेत आपण काही चूक केल्यास आपण प्रवेशेच्छूच्या यादीत नसाल. तसेच प्रवेश–अर्ज भरतेवेळी आपण केलेली चूक, अपूर्ण माहिती व पुरवलेली खोटी माहिती आपणास प्रवेश प्रक्रियेतून बाद करू शकते याचीही नोंद घ्यावी. ऑनलाईन प्रवेश–अर्ज भरताना तो आपण स्वतः किंवा MKCLकेंद्राच्या मदतीने भरू शकाल. परंतु प्रवेश–अर्ज ऑनलाईन भरण्याची जबाबदारी व भरलेला अर्ज बरोबर आहे का ? ते तपासण्याची जबाबदारी पूर्णतः प्रवेशेच्छुची आहे. त्यासाठी कुणालाही जबाबदार धरता येणार नाही.**

९.१ बी.एड. प्रवेशासाठी दोन अर्ज भरावे लागतात. त्यातील एक अर्ज प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी भरावा लागेल. त्याचा नमुना माहिती–पुस्तिकेत शेवटी दिलेला आहे तर **दुसरा अर्ज संगणकामार्फत जाहिरात आल्यानंतर लगेच भरावा लागेल. संगणकीय प्रवेश–अर्जाची माहिती स्वतंत्र दिलेली आहे. संगणकीय अर्जाच्या आधारेच गुणवत्ता यादी तयार केली जाते. त्यामुळे तो अर्ज बिनचूक भरणे उमेदवाराची जबाबदारी आहे.**

संगणक अर्ज भरण्यासंदर्भात तुम्हांला आवश्यक असल्यास तुम्ही **MKCL** केंद्राचे मार्गदर्शन घेऊ शकाल.

९.२ संगणक अर्ज कोठेही जमा करू नये. संगणक अर्ज मुलाखतीच्यावेळी सोबत आणावा.

९.३ संगणक अर्जात लिहिलेला अनुभव, पदवी / पदव्युत्तर पदवीचे गुण व श्रेणी आणि **प्रवर्गाच्या आरक्षणाआधारेच प्रथमदर्शनी प्रवेशाची निश्चिती केली जाईल.** या निश्चितीपूर्वी प्रवेशेच्छुंना जनरल यादीवर ऑब्जेक्शन मांडण्याची संधी देण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही स्वरूपाचे ऑब्जेक्शन विचारात घेतले जाणार नाही याची नोंद सर्वांनी घ्यावी. प्रवेशानंतर प्रवेशार्थीने दिलेली माहिती वा कागदपत्रे खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल. शुल्क परत केले जाणार नाही. तसेच त्यावर फौजदारी गुन्हाही दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९.४ शिक्षक म्हणून अनुभव लिहिताना संगणक अर्जावर **(पुरावे सादर करू शकत असलेल्या)** केवळ तुमच्या एकूण सेवा कालावधीची नोंद करावी. ई-माहितीपुस्तिकेतील प्रवेश-अर्जावर अनुभव नोंदवताना नोकरीच्या सुरुवातीपासूनचे सर्व कार्यालयीन आदेश किंवा पुराव्याप्रमाणे नोंद करावी. **अनुभवाचा पुरावा म्हणून सेवेचे प्रमाणपत्र हे दस्तऐवज मान्य करण्यात येत नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.** ज्या सेवेचे पुरावे तुमच्याकडे नाहीत त्याची नोंद प्रवेश-अर्जात किंवा संगणकीय अर्जात करू नये.

९.५ पूर्वीची सेवा अर्धवेळ असल्यास प्रवेश-अर्जात अनुभव नोंदविताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. या संदर्भात मुद्दा ५ : शिक्षणक्रम प्रवेश-पात्रता प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

९.६ **तुम्ही ज्या शाळेत सेवेत असाल त्या शाळेचा जिल्हा, संगणक प्रवेशअर्जावरील 'जिल्हा' या ठिकाणी नोंदवावा. तुमची शाळा ज्या जिल्ह्यात असेल त्याच जिल्ह्यात तुम्हांला प्रवेश घ्यावा लागेल. बी.एड.चे प्रवेश हे जिल्हावार गुणवत्ता यादी करून त्यानुसार देण्यात येतात. त्यात काही चूक झाल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवारांची असेल. अर्जातील इतर माहिती काळजीपूर्वक भरावी.**

९.७ **भरलेल्या ऑनलाईन अर्ज, अर्जातील माहितीचे पुरावे आणि पान क्र. ४५ ते ५१ वरील भरलेले अर्ज मुलाखतीच्यावेळी सादर करणे अनिवार्य असेल.**

९.८ अर्जदाराने गुणवत्ता यादीत प्रवेशासाठी निवड झाल्यास मुलाखतीच्या वेळी सोबत आणावयाची कागदपत्रे :

(अ) मूळ प्रवेश अर्ज व ऑनलाईन संगणकीय अर्जाची प्रत.

(आ) शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती.

डी.एड. नियमित केल्याचा पुरावा व डी.एड. गुणपत्रक

(इ) प्रवेश-अर्जात नोंद केल्याप्रमाणे प्रत्येक विद्यालयातील सुरुवातीपासून पुढील सर्व नेमणुकीच्या आदेशांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती, अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र.

(ई) मागासवर्गीय असल्यास पुढे नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत.

**अनुसूचित जाती (एस.सी.)** - जातीचा दाखला

**अनुसूचित जमाती (एस.टी.)** - जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र

**विमुक्त जमाती / भटक्या जाती / इतर मागासवर्गीय / विशेष मागासवर्गीय (VJ / NT / OBC / SBC)** - जातीचा दाखला, ऑनलाईन संगणकीय अर्जात नमूद केलेल्या नावाचे वैध कालावधीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

(उ) जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कोणत्याही प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

(ऊ) सर्व सेवेचे नेमणूक आदेश, शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांच्या शिक्षक किंवा पदमान्यता पत्राच्या सुरुवातीपासूनच्या सर्व साक्षांकित प्रती, शाळा मान्यतापत्र.

(ए) मेयर मान्यता प्रमाणपत्र. शाळा अनुदानित असेल तर वर्षनिहाय शाळा तपासणी अहवालाच्या साक्षांकित प्रती.

(ऐ) सेवापुस्तिकेतील संबंधित नोंदी. (संपूर्ण सेवापुस्तिकेची साक्षांकित केलेली झेरॉक्स प्रत)

(ओ) नावात बदल असल्यास नाव बदल पुरावा म्हणूज राजपत्र.

(औ) सामाजिक आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांना -

**अपंग :** किमान ४०% अपंग असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र.

**प्रकल्पग्रस्त :** जिल्हा पुनर्वसन अधिकारी / सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.

**आपत्तीग्रस्त :** उपविभागीय अधिकारी / तहसीलदार यांचे प्रमाण-पत्र परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.

**माजी सैनिक पाल्य :** मृत सैनिकाची पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांनी जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र आवश्यक. नातेसंबंधाचा पुरावा आवश्यक, डिसचार्ज पुस्तक आवश्यक.

**आजी सैनिक पाल्य :** पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांनी आजी सैनिकाच्या ओळखपत्राची प्रत व पाल्याचा नातेसंबंधाचा पुरावा.

**विधवा :** महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त झालेले पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.

**घटस्फोटिता :** विवाहनोंदणी दाखला किंवा न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश किंवा मुस्लीम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी / इमामांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असे प्रमाणपत्र नोटरीकडून मराठी भाषेत रूपांतरित करून आणणे आवश्यक.

**गोवा - बेळगाव :** हा मराठी भाषक प्रदेश असल्याने या उमेदवारांनी नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी / हिंदी / इंग्रजीत आणावे व त्यावर संबंधित मुख्याध्यापकाची सही व शिक्का आणणे अनिवार्य.

**मुलाखतीच्या वेळी वरील मूळ व साक्षांकित (Attested) प्रमाणपत्रे तुमच्या जवळ नसल्यास प्रवेश दिला जाणार नाही.**

९.९ **संगणकामार्फत भरलेल्या अर्जातील सर्व माहिती बरोबर व अचूक आहे किंवा नाही याची तपासणी उमेदवाराने स्वतः करावी. अंतिमतः ती जबाबदारी तुमची असेल. तुम्ही चुकीची माहिती भरल्यामुळे मुलाखतीस बोलाविले गेले आहे असे विद्यापीठाच्या लक्षात आल्यास तुम्हांला प्रवेश दिला जाणार नाही व त्यास पूर्णतः तुम्ही स्वतः जबाबदार असाल.**

९.१० **संगणक अर्जातून प्राप्त माहितीच्या आधारे प्रवेश गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.** गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी निवड झालेल्या **(Selection List)** उमेदवारांनी **मुलाखतीसाठी विद्यापीठात नियोजित वेळेत येणे अनिवार्य असेल.** मुलाखतीसाठी **प्रथम फेरीत केवळ सामाजिक आरक्षण व द्वितीय,** तृतीय फेरीत गुणवत्ता यादीतील विशिष्ट उमेदवार बोलविण्यात येतील. त्यातील ४२ उमेदवार प्रवेशासाठी निवड झालेले तर उर्वरित विद्यार्थी प्रतीक्षा यादीतील असतील. पहिल्या ४२ उमेदवारांपैकी जर कोणी कागदपत्रांची पूर्तता करू शकले नाहीत किंवा गुणवत्ता यादीतील गुण कमी झाल्याने प्रवेश घेऊ शकले नाहीत किंवा नियोजित वेळी मुलाखतीस अनुपस्थित राहिले तर अशा विद्यार्थ्यांना पुन्हा कोणत्याही कारणास्तव प्रवेशाची संधी देण्यात येणार नाही. मात्र रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील उपस्थित उमेदवारांना प्राधान्यक्रमानुसार त्याच दिवशी प्रवेश देण्यात येतील. प्रथम खुल्या प्रवर्गातील त्यानंतर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना बोलविण्यात येईल. द्वितीय फेरीत/प्रथम फेरीत गुण कमी झालेले व पुढील गुणवत्ता यादीचा विचार करण्यात येईल. विशिष्ट प्रवर्गातील प्रवेश पूर्ण झाल्यास पुढील फेरीत त्या प्रवर्गातील प्रवेश केले जाणार नाहीत. निवड यादी व मुलाखतपत्रही केवळ वेबसाईटवरच टाकण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उपस्थित असलेल्या निर्धारित संख्येच्या पात्र उमेदवारांची कागदपत्रे अभ्यासकेंद्रावर पडताळणीनंतर क्रमाने लगेच प्रवेश देण्यात येईल. प्रवेश अर्जातील गुण प्रवेशाच्या वेळी कमी झाल्यास त्याचा पुढील फेरीत वा त्या फेरीत विचार केला जाणार नाही. तर तो विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

<u>लक्षात ठेवा</u>

**मुलाखतीस येतेवेळी संगणकीकृत भरलेला बी.एड. प्रवेश–अर्ज व वर मुद्दा क्र. ९.८ मध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे आणणे आवश्यक आहे. जर प्रवेश–अर्ज व मूळ कागदपत्रे सादर करता आली नाही तसेच अर्जात दिलेली माहिती व मूळ कागदपत्रातील माहिती यात तफावत असेल तर त्यास प्रवेश नाकारण्यात येईल. तसेच जातवैधता प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट विशिष्ट प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे अनिवार्य आहे. अन्यथा प्रवेशासाठी विचार होणार नाही.**

९.११ मुलाखतीस येताना या शिक्षणक्रमासाठीचे संपूर्ण शुल्क रोखीने आणावे. ते प्रवेशानंतर नाशिक येथेच बँकेत भरता येतील.

९.१२ प्रत्येक अभ्यासकेंद्रावर निर्धारित जागा आहेत. त्या भरल्या न गेल्यास त्या केंद्राच्या प्रतीक्षा यादीतील **पुढील उमेदवारांना प्रवेश देण्यात येतील.**

९.१३ **बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत कोणाच्या काही तक्रारी असल्यास त्या तक्रारी/ऑब्जेक्शन नोंदविण्याच्या दिलेल्या संधीच्या वेळीच प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच सादर कराव्यात. विद्यापीठ त्यावर योग्य तो निर्णय घेईल. मात्र प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर आलेल्या तक्रार अर्जांवर विचार केला जाणार नाही.**

९.१४ या शिक्षणक्रमासाठी गुणवत्ता यादीत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीसंदर्भातील माहिती **केवळ वेबसाईटद्वारेच कळविली जाईल. मुलाखतपत्र पाठविले जाणार नाही.** तसेच मुद्दा क्रमांक १० नुसार तयार झालेली गुणवत्ता प्रवेश यादी वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल. **उमेदवारांनी वेबसाईट न पाहिल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. वेबसाईटवरील माहितीच्या आधारेच आपण मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकाल. गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवाराने मुलाखतीसाठी येताना ऑनलाईन प्रवेश–अर्ज इ–प्रोसेसिंग शुल्क चलनासह मुलाखतीसाठी आवश्यक या माहितीपुस्तिकेत नमुना म्हणून दिलेला प्रवेश–अर्ज आणावा. वेबसाईटवरील मुलाखत पत्राची प्रत सोबत आणावी.**

९.१५ या पुस्तिकेतील प्रवेश–अर्ज व त्याची सहपत्रे आणि उमेदवाराने ज्या अभ्यास तुकडीसाठी प्रवेश–अर्ज सादर केला असेल त्या तुकडीच्या प्रवेशासाठीच फक्त तो अर्ज वैध धरला जाईल.

९.१६ **संगणकीय अर्जात जिल्हा संकेतांकाची चुकीची नोंद केल्यास तुमचा प्रवेशासाठी विचार होणार नाही. ज्या जिल्ह्यात तुमची शाळा आहे त्याच जिल्ह्याचा संकेतांक संगणकीय अर्जात व प्रवेश–अर्जात लिहावा/सिलेक्ट करावा. बी.एड. प्रवेश गुणवत्ता याद्या जिल्हानिहाय करण्यात येतात. त्यामुळे जर जिल्हा संकेतांक तुम्ही चुकीचा लिहिला आणि वेगळ्या जिल्ह्यातील प्रवेशासाठी तुम्हांस मुलाखतीसाठी बोलविण्यात आले तरी मुलाखतीच्या वेळी तुम्हाला प्रवेश देण्यात येणार नाही.**

९.१७ मागासवर्गीय उमेदवार गुणवत्तेनुसार खुल्या (ओपन) संवर्गात प्रवेशास पात्र आहेत, त्यामुळे त्यांनी खुल्या प्रवर्गासाठी दुसरा प्रवेश अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

**तुम्ही या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी भरलेला संगणक अर्जाची प्रिंट, इ–चलन पावती व माहितीपुस्तिकेतील प्रवेश–अर्ज स्वतःकडे ठेवणे आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी तो सोबत आणावा.**

# प्रवेश-अर्ज भरणे ते प्रत्यक्ष प्रवेशासंदर्भात फ्लो चार्ट

## जाहिरात

↓

Online अर्ज भरणे (राखीव गटातील प्रवेशेच्छुकडे ना सायस्तर व जात तपासणी अर्ज अपेक्षित अन्यथा जनरलमधून अर्ज भरावा) व इतर कागदपत्रे अपलोड करावीत.

↓

पासवर्ड व login ID प्राप्त होईल तो जपावा.

↓

नेट बँकींगने प्रोसेसिंग शुल्क बँकेत भरावे. (अॅक्सेस किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडिया)

↓

प्रवेश-अर्ज प्राप्त विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय प्रवेश यादी (लागेल पत्रासह) प्रसिद्ध (आठ दिवस ऑब्जेक्शनसाठी खुली)

↓

योग्य तक्रारींची दखल घेऊन गुणवत्ता यादी प्रवेशासाठी प्रसिद्ध (मुलाखत पत्रासह)

↓

गुणवत्ता यादीत नावे आलेल्या प्रवेशेच्छुंनी Online माहितीपुस्तिकेसोबत दिलेला प्रवेश मुलाखत अर्ज, मेंटार मान्यता पत्र आणि सेवा माहिती अर्ज भरणे अनिवार्य.

↓

मुलाखतीस येताना उपस्थिती नोंदीच्या नियोजित वेळी, नियोजित ठिकाणी उपस्थित राहणारे विद्यार्थीच केवळ मुलाखतीस पात्र असतील उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांचा मुलाखतीस विचार करण्यात येणार नाही.

↓

मुलाखतीचे वेळी प्रवेशार्थीकडे सुरुवातीला प्रवेशासाठी भरलेला Online अर्ज प्रत, आपण अर्जात भरलेल्या माहितीचे मूळ पुरावे उदाहरणार्थ, शैक्षणिक पात्रता गुणपत्रक व प्रमाणपत्र, सर्व नियुक्ती आदेश, अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र, मागासवर्गीय असल्यास जातीचा/ जात पडताळणीचा दाखला, ना-सायस्तर प्रमाणपत्र, जन्म तारखेचा पुरावा, सेवापुस्तिका, सामाजिक आरक्षण लाभ घेणाऱ्यांनी (संबंधित पुरावे) इत्यादी यासंदर्भात Online e-बी.एड. प्रवेश माहिती पुस्तिकेत सविस्तर नोंदी आहेत. त्यानुसार सर्व कागदपत्रे आणणे आवश्यक असेल. अन्यथा प्रवेश मुलाखत घेण्यात येणार नाही. आणि प्रवेशेच्छु प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येतील. (शिवाय प्रवेश अर्जासोबत जोडावयाचे सहपत्र)

↓

खोटी माहिती पुरविणारे व परिणामतः गुणांमध्ये वजावट होणारे विद्यार्थीही प्रवेशास अपात्र ठरतील त्यांना त्यांच्या गुणांनुसार खाली अणून प्रवेश-प्रक्रियेत विचार केला जाईल.

↓

जे उमेदवार प्रवेशास पात्र होतील त्यांना विद्यापीठ धोरणात्मक निर्णयानुसार प्रवेश शुल्क भरण्यास सांगितले जाईल.

↓

प्रवेशाचेवेळी देण्यात येईल. त्यानंतर आपण आपल्या अभ्यासकेंद्रावर जाऊन आपल्या प्रवेशाची नोंद व पत्रव्यवहाराचा पत्त्याची नोंद करावी. मोबाईल नंबर द्यावा.

## १०. निवड–प्रक्रिया

१०.१ सदर शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादी तयार करताना **केवळ ऑनलाईन संगणकीय अर्जात भरलेल्या माहितीचा विचार केला जातो**. उदाहरणार्थ, सेवाज्येष्ठता, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि अतिरिक्त पदवीचे गुण इत्यादी. आरक्षणासंदर्भात संगणक अर्जातील माहिती व शासन नियमांचे पालन करण्यात येते. **त्यामुळे संगणक अर्जातील माहिती बिनचूक भरावी.**

१०.२ गुणवत्ता यादी करताना प्रथम अनुभवानुसार पायाभूत गुण देण्यात येतील. प्रत्येक वर्षासाठी एक गुण असे एकूण जितक्या वर्षांचा अनुभव असेल तितके गुण मिळतील. एका वर्षापेक्षा कमी कालावधीचे गुण ठरविताना जर अनुभव सहा महिने किंवा अधिक असेल तर एक गुण धरण्यात येईल. त्यापेक्षा कमी महिन्यांच्या सेवेला गुण देण्यात येणार नाहीत. अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांची सेवा पान क्र. ५ मुद्दा क्र. ५ मध्ये दिल्याप्रमाणे विचारात घेतली जाईल. प्रवेशासाठी मराठीचे पुरेसे ज्ञान उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे, तसे नसेल असे मुलाखत समितीचे मत झाल्यास त्याला प्रवेश नाकारण्यात येईल. त्यासंदर्भात कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.

१०.३ पदवी परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या श्रेणींना पुढीलप्रमाणे गुण धरण्यात येतील. (बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., इत्यादी)

तृतीय किंवा 'सी' श्रेणी ........................... ० गुण
द्वितीय किंवा 'बी' श्रेणी ........................... ४ गुण
प्रथम किंवा 'ए' श्रेणी ............................. ५ गुण
विशेष गुणवत्ता किंवा 'ओ' श्रेणी .................. ६ गुण

हे गुण एकूण गुणात समाविष्ट करण्यात येतील.

१०.४ पदव्युत्तर पदवीधारक असल्यास त्याचे पुढीलप्रमाणे गुण मिळतील. (एकापेक्षा अधिक पदव्युत्तर पदव्या असतील तर एकाच पदवीचे गुण धरले जातील.)

तृतीय किंवा 'सी' श्रेणी ........................... ३ गुण
द्वितीय किंवा 'बी' श्रेणी........................... ४ गुण
प्रथम किंवा 'ए' किंवा 'ओ' श्रेणी................. ५ गुण

१०.५ ज्या शिक्षणक्रमाची प्रवेश पात्रता पदवीधर असणे अनिवार्य आहे अशा पदवीनंतरची अतिरिक्त एक वर्षाची पदविका किंवा पदवी असल्यास (उदा. बी.पी.एड., डिप्लोमा इन पॉप्युलेशन एज्युकेशन, डिप्लोमा इन ॲडल्ट एज्युकेशन, शालेय व्यवस्थापन पदविका इत्यादी) पुढीलप्रमाणे गुण मिळतील.

तृतीय किंवा 'सी' श्रेणी ........................... ३ गुण
द्वितीय किंवा 'बी' श्रेणी........................... ४ गुण
प्रथम किंवा 'ए' किंवा 'ओ' श्रेणी................. ५ गुण

१०.६ निवड प्रक्रिया – प्रवेश देताना प्रथमतः खुला संवर्ग (ओपन मेरिट) नुसार यादी तयार करण्यात येईल. यात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र मागासवर्गीयांची निवडही खुल्या प्रवर्गांतर्गत करण्यात येईल. खुल्या प्रवर्गात निवड झालेले मागासवर्गीय वगळून मागास–वर्गीयांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. एखाद्या मागासवर्गीय घटकासाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा नियमानुसार व गुणवत्तेनुसार मागासवर्गीयांच्या इतर घटकांमधून भरण्यात येतील. त्यानंतरही राखीव संवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास त्या सर्वसाधारण गटातून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

राखीव ठेवण्यात आलेल्या जागा भरण्याकरिता योग्य उमेदवार उपलब्ध नसल्यास राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या जागा ह्या पुढील ३ गटांमध्ये करण्यात येतील.

गट ए – अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST)

गट बी – विमुक्त जाती (NT-A) व भटक्या जाती (NT-B)

गट सी – भटक्या जमाती (NT-C) व भटक्या जमाती (NT-D) आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांचा समावेश असेल.

संदर्भ : शा.नि.क्र. टी.ई.एम.–२००६/(३०६/०६) तांशि–१, दि. ६ जुलै २००६ (अध्यादेश २००६ची अधिसूचना).

अपंग / आजी–माजी सैनिक / प्रयोगशील शाळा / गोवा–बेळगाव त्या त्या संवर्गातील किमान गुणाअखेर आरक्षित जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा संवर्गानुसार मुक्त समजण्यात येतील व त्या संवर्गातील मूळ गटास दिल्या जातील.

१०.७ अंतिम गुणवत्ता यादीत जर समान गुण असतील तर प्रथम अनुभवाचा आणि नंतर वयानुसार ज्येष्ठता विचारात घेतली जाईल. जर वय समान असेल तर ज्यांनी पदवी अगोदर प्राप्त केली असेल त्यांना प्राधान्य मिळेल. त्यानंतरही समान गुण झाल्यास गुणवत्ताक्रम ठरविण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील व तो अंतिम असेल.

१०.८ **ज्या प्राथमिक शिक्षकांना शासनाने प्रत्यक्ष पदवीधर वेतनश्रेणी देऊन पाच वर्षांच्या आत बी.एड. शिक्षणक्रम पूर्ण करण्याची अट घातलेली आहे, अशा शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मिळाल्यापासून प्रत्येक वर्षासाठी एक अतिरिक्त गुण देण्यात येईल. त्यामुळे हे उमेदवार आपोआपच गुणवत्ता यादीत वरच्या भागात जाऊ शकतील. वेतनश्रेणी मिळाली नसेल किंवा खोटी/चुकीची तारीख असेल तर देण्यात आलेले जादा गुण त्या प्रमाणात कमी होतील. त्याची पूर्ण जबाबदारी उमेदवाराचीच असेल. ५ ते १०/१२वी वर्ग असलेल्या माध्यमिक शाळेत नियुक्ती पण पाचवी ते सातवी इयत्तांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना जर शासनाने दिलेली प्राथमिक शिक्षकाची पदवीधर वेतनश्रेणी मिळाली असेल तर अशा व्यक्तींनी पदवीधर वेतन–श्रेणी मिळाल्याची तसेच ती श्रेणी मिळून किती वर्षे झालेली आहे त्याचीही नोंद संगणक अर्जावर करावी. पदवीधर वेतनश्रेणी प्राथमिक शिक्षकांना देण्यात येत असल्याने या योजनेचा लाभ घेणारे सर्व शिक्षक प्राथमिक स्तरात गणले जातील.**

१०.९ सैनिक, अपंग, स्वातंत्र्यसैनिकांची पत्नी/पती, मुलगा/मुलगी, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता यांना नियमाप्रमाणे प्राधान्य देण्यात येईल. मात्र **मुलाखतीच्या वेळी त्याचा पुरावा/प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

१०.१० मुद्दा क्र. ६.१३ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे मराठीचे पुरेसे ज्ञान उमेदवाराकडे नाही असे मुलाखत समितीचे मत झाल्यास त्याला प्रवेश नाकारण्यात येईल. त्यासंदर्भात कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

१०.११ **बी.एड. शिक्षणक्रम प्रवेश गुणवत्ता यादी ही पूर्णतः संगणक अर्जावर लिहिलेल्या माहितीवर आधारित असते.** त्यामुळे तो बिनचूक भरणे आपली जबाबदारी आहे.

**पुन्हा एकदा महत्त्वाचे –**

**शहरी, ग्रामीण, आदिवासी विभाग, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या सर्व प्रवेशेच्छुकांसाठी महत्त्वपूर्ण सूचना**

**मुलाखतीसाठी निवड झालेल्या प्रवेशेच्छूंना पोस्टाने कळविले जाणार नाही. त्यासाठी केवळ वेबसाईटचाच वापर करण्यात येईल. विद्यापीठाच्या वेबसाईटवरही प्रवेशासाठी निवड झालेल्यांची यादी पाहायला मिळेल. जवळच्या सायबर कॅफेतून ती प्राप्त करता येईल. तुम्ही ती न पाहिल्यास प्रवेश होणार नाही व त्यास तुम्हीच जबाबदार असाल. तसेच अशा उमेदवारांची त्या वर्षाच्या नंतरच्या फेरीच्या मुलाखतीसाठी निवड केली जाणार नाही.**

तुमचे प्रवेशासाठीच्या यादीमध्ये नाव आहे की नाही ते विद्याशाखेच्या वेबसाईटवर कसे पाहाल ?

(अ) विद्याशाखेच्या homepage ला log on व्हा.
*http://ycmou.digitaluniversity.ac*

(आ) प्रवेशास पात्र उमेदवारांच्या याद्यांसंबंधी सूचना असेल त्यावर Click करा. त्यानंतर पुढे कसे जावे याबाबत सूचना आपल्याला बघायला मिळतील. त्या वाचून त्याप्रमाणे कृती करा म्हणजे आपण आपल्या नावापर्यंत पोहोचाल.

१०.१२ **बी.एड. प्रवेशानंतर तुमच्या मोबाईलवर Password येईल. त्यावर तुमचे Profile तपासून पाहावे. विषय निवड, नावाच्या संदर्भात जर काही त्रुटी असतील तर तातडीने विभागीय केंद्रावर संपर्क साधावा.**

## ११. शिक्षणक्रमाचे माध्यम

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना प्रामुख्याने महाराष्ट्रासाठी झाली. महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी असल्याने ह्या शिक्षणक्रमासाठी मराठी भाषा असेल. ह्या शिक्षणक्रमासाठी तयार केलेले सर्व अध्ययन साहित्य मराठीत आहे. अभ्यासकेंद्रावरील कामकाजही मराठी माध्यमातून चालते.

अपवाद म्हणून अमराठी भाषकांना त्याचे अंतर्गत कार्ये व अंतिम परीक्षा लेखनास विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीने हिंदी तसेच इंग्रजी भाषेस मान्यता देण्यात येते.

## १२. परीक्षेचे माध्यम

प्रात्यक्षिक कार्यात सूक्ष्म अध्यापन पाठ व वर्ग–अध्यापन–सराव–पाठ ह्यांत इंग्लिश विषयासाठी माध्यम इंग्लिश, हिंदी विषयासाठी माध्यम हिंदी व इतर विषयांसाठी माध्यम मराठी राहील. सर्व अभ्याससाहित्य व अभ्यासकेंद्रांवर होणारे मार्गदर्शन पूर्णतः मराठीतच असेल. इतर सर्व प्रात्यक्षिक कार्ये मराठी भाषेतूनच पूर्ण करावी लागतील. विद्यापीठाचा पाठ्यक्रम १ ते १० च्या लेखी परीक्षांचे माध्यम पुढे दिल्याप्रमाणे राहील.

शालेय अध्यापनशास्त्र विषयांत मराठी विषयाची उत्तरे मराठीतून, हिंदी विषयाची हिंदीतून व इंग्लिश विषयाची इंग्लिशमधून लिहावी लागतील. उरलेल्या विषयांची उत्तरे सर्वसाधारणपणे मराठीतूनच लिहावी लागतील.

तथापि, अपवाद म्हणून ज्या अध्यापकांना लेखी परीक्षेसाठी इंग्लिश/ हिंदी माध्यम अधिक सोईचे असेल, त्यांना प्रश्नांची उत्तरे हिंदी/ इंग्लिशमधून लिहिण्याची परवानगी देण्यात येईल; प्रश्नपत्रिका मराठी आणि इंग्रजी ह्या दोन्ही **माध्यमांत उपलब्ध असतील. मात्र मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका प्रमाण मानण्यात येईल.**

## १३. शिक्षणक्रमाची संरचना / आकृतिबंध

या शिक्षणक्रमाचे (१) अनिवार्य अभ्यासक्रम (२) वैकल्पिक अभ्यासक्रम (३) प्रात्यक्षिक कार्य असे तीन भाग पडतात.

### १३.१ प्रथम वर्ष

**अनिवार्य विषय**

**अधिष्ठान अभ्यासक्रम**

EDU401 अध्ययनार्थी व त्याचा विकास
EDU402 अध्ययन आणि अध्यापन
EDU403 अभ्यासक्रमाची भाषा, विद्याशाखा व विषयाचे आत्मसातीकरण
EDU421 मूल्यमापन आणि मूल्यनिधारण

**वैकल्पिक विषय**

**पुढीलपैकी कोणतेही दोन विषय निवडावेत**

EDU405 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : मराठी
EDU406 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : हिंदी
EDU407 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : इंग्रजी
EDU408 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : संस्कृत
EDU409 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : इतिहास
EDU410 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : भूगोल
EDU411 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : गणित
EDU412 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : विज्ञान
EDU413 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : अर्थशास्त्र
EDU414 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : हिशेबशास्त्र

## १३.२ द्वितीय वर्ष

### अनिवार्य विषय

EDU 422 उदयोन्मुख भारतीय समाज आणि शिक्षण
EDU 423 जेन्डर, स्कूल आणि सोसायटी
EDU 424 ज्ञान आणि अभ्यासक्रम
EDU 425 एकात्मिक शाळा

### वैकल्पिक अभ्यासक्रम (पुढीलपैकी कोणताही एक विषय निवडावा)

EDU426 शैक्षणिक तंत्रविज्ञान
EDU427 बाल आणि बालशिक्षण (भाग –१ व भाग – २)
EDU428 शिक्षक आणि स्वयंसहाय्य गट (भाग –१ व भाग – २)
EDU429 मूल्यशिक्षण
EDU430 प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी : भाग – १
EDU431 प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी : भाग – २
EDU432 प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी : भाग – ३
EDU433 शिक्षणातील संज्ञापन प्रकार
EDU434 प्राथमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्ये
EDU435 माध्यमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्ये
EDU436 कृतिसंशोधन

**वैकल्पिक विषयांची पुस्तके केवळ बेवसाईटवर उपलब्ध होतील.**

## १३.३ प्रात्यक्षिक कार्य

(अ) सैद्धांतिक विषय १ ते १० साठी योजिलेली प्रात्यक्षिक कार्ये.

(आ) सैद्धांतिक विषय १ ते १० साठीचे स्वाध्याय लेखन.

(इ) अध्यापन सराव व संबंधित प्रात्यक्षिके
सूक्ष्म अध्यापन, आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र, पाठ नियोजन, अभिरूप अध्यापन, वार्षिक नियोजन, घटक नियोजन, घटक चाचणी, दिग्दर्शन पाठ व सरावपाठ, विद्यार्थ्यांचा वृत्तेतिहास, पाठ निरीक्षण छात्र अध्यापक पर्यवेक्षित सरावपाठ (कोचिंग), समंत्रण पाठ, स्वयं–मूल्यमापन पाठ, सलग साप्ताहिक पाठ, संगणक प्रात्यक्षिके, कृतिसंशोधन व मूल्यशिक्षण प्रात्यक्षिके, स्वजाणिव, विशेष शाळेला भेट, विशेष विद्यार्थी मुलाखत, पर्यावरण शिक्षण, योगा प्रात्यक्षिके.

(ई) कार्यानुभव, पूर्वतयारी शिक्षणक्रम प्रात्यक्षिक, सहशालेय व समाजसेवा प्रात्यक्षिक.

**(एन.सी.टी.ई. नियमाप्रमाणे या संरचनेत बदल होऊ शकेल. तो केंद्रांमार्फत कळविण्यात येईल.)**

# १४. संपर्कसत्रांचा कार्यक्रम व उपस्थिती

शिक्षणशास्त्र पदवी प्रशिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं–अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्त्विक पाठ्यक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार प्रात्यक्षिके पूर्ण करणे, स्वाध्यायलेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्‌बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी योजनाबद्ध संपर्कसत्रांची आवश्यकता आहे.

ही संपर्कसत्रे विद्यापीठाच्या या शिक्षणक्रमाच्या नियोजित अभ्यासकेंद्रांवर आयोजित केल्या जातात. अभ्यासकेंद्रे म्हणून प्रामुख्याने राज्यातील प्रथितयश शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड करण्यात आलेली आहे. विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार ह्या संपर्कसत्रांचे आयोजन करण्यात येते. **संपर्कसत्रातील छात्र–अध्यापकांची उपस्थिती व सहभाग अत्यावश्यक असतो.** संपर्कसत्रांना अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक दिवसाला **रु. ५००/–** याप्रमाणे विद्यापीठात दंड शुल्क भरावे लागते. दंड शुल्कातील ६०% रक्कम विद्यापीठाकडे नेटबँकेद्वारे भरावी लागते तर ४०% रक्कम अभ्यासकेंद्रावर रोखीने भरून त्याची पावती विद्यार्थ्याने घेणे अपेक्षित असते. त्यानंतर विद्याशाखेच्या मान्यतेनुसार नियुक्त अभ्यासकेंद्रावर अपूर्ण संपर्कसत्र पूर्ण करणे अनिवार्य असते. सर्व संपर्कसत्र पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थी अंतिम परीक्षेला पात्र ठरत नाही. तेव्हा ही संपर्कसत्रे वेळच्यावेळी पूर्ण करणे हिताचे ठरते. शिक्षणक्रमाचा तात्त्विक भाग, शिक्षणातील व्यवहार व प्रात्यक्षिके यांमधील परस्परसंबंध राखता यावा, तत्त्वांचा, व्यावहारिक उपयोजनांचा कार्यभाग सहजपणे शक्य व्हावा, व्यवहारातून तत्त्वांची समज दृढ व्हावी या पद्धतीने संपर्कसत्रांचे वेळापत्रक व आयोजन करण्यात येते. साधारणतः ५२ दिवसांची संपर्कसत्रे ह्या शिक्षणक्रमासाठी आयोजित करण्यात येतात. ही संपर्कसत्रे विद्यार्थ्यांना अनिवार्य असतात. सुट्टीव्यतिरिक्त काही छोटी संपर्कसत्रे केंद्राने आयोजित केल्यास त्यास प्रशिक्षणार्थींना रजा घेऊन उपस्थित राहावे लागते. त्याबद्दल कोणतीही तक्रार विचारात घेतली जात नाही.

**आपला प्रवेश ज्या अभ्यासकेंद्रावर निश्चित करण्यात येईल त्या अभ्यासकेंद्राकडूनच संपर्कसत्रासंदर्भातील पत्रे आपणाला प्राप्त होतात. त्यामुळे प्रवेशानंतर पंधरा दिवसांच्या आत अभ्यासकेंद्रावर जाऊन तेथे अभ्यासकेंद्र शुल्क भरावे व आपले नाव, फोन नंबर व पत्रव्यवहारासाठीचा पत्ता अभ्यासकेंद्रांना द्यावा. म्हणजे केंद्र संपर्कसत्राचे पत्र आपणास पाठवतील. संपर्कसत्राबाबतची चौकशी आपल्या अभ्यासकेंद्राकडेच करावी.**

## १४.१ संपर्कसत्रे

**प्रथम वर्ष = २३ दिवस**
**द्वितीय वर्ष = २९ दिवस**
**रोज – घड्याळी ६ तास**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्रथम वर्ष :** | (१) | उद्‌बोधन | – | ४ दिवस |
| | (२) | ऑक्टोबर | – | १२ दिवस |
| | (३) | डिसेंबर | – | ७ दिवस |
| **द्वितीय वर्ष :** | (१) | उन्हाळी/मे | – | २२ दिवस |
| | (२) | जुलै | – | ३ दिवस (कोचिंग) |
| | (३) | ऑगस्ट | – | २ दिवस (पाठ) |
| | (४) | फेब्रुवारी | – | २ दिवस (मौखिक परीक्षा) |

या शिक्षणक्रमाची काही प्रात्यक्षिक कार्ये अध्यापक आपल्या अभ्यासकेंद्रावर पूर्ण करतील. ह्या प्रात्यक्षिक कार्याचे मार्गदर्शन विद्यालयाचे अनुभवी तज्ज्ञ अध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय / शिक्षणशास्त्र विद्यालय ह्यांतील तज्ज्ञ प्राध्यापक ह्यांच्याकडून देण्यात येईल. भाग ३ मधील प्रात्यक्षिक कार्ये अध्यापक आपल्या विद्यालयात पूर्ण करील. सरावपाठासाठी पाठनिरीक्षक म्हणून जे ज्येष्ठ अध्यापक पाठ पाहतील त्यांना विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक असेल.

### १४.२ विद्यालयात पूर्ण करावयाचे प्रात्यक्षिक कार्य

(अ) वर्गाध्यापनाचे काही सरावपाठ व सहाध्यायी पर्यवेक्षित सरावपाठ, स्वयं-मूल्यमापन पाठ, सलग साप्ताहिक पाठ व आंतरवारीता

(आ) वर्गाध्यापनाच्या (अनुभवी सहकाऱ्यांच्या) पाठांचे निरीक्षण.

(इ) कार्यानुभव (Work Experience) व समाजसेवा (Social Service) प्रात्यक्षिक.

(ई) पर्यावरण जाणिव, सहशालेय उपक्रमाची प्रात्यक्षिके, मूल्यशिक्षण व योगा प्रात्यक्षिके.

(उ) शिक्षक-पालक संघाच्या उपक्रमांचे प्रात्यक्षिक विद्यालयात पूर्ण करावयाची वरील सर्व प्रात्यक्षिके शिक्षणक्रमाचे दुसरे सहामाही सत्र व तिसरे सहामाही सत्र ह्या कालखंडात पूर्ण करायला हवे.

### १४.३ पाचवे संपर्कसत्र - मौखिक परीक्षा (लघुकालीन संपर्कसत्र)

हे संपर्कसत्र शेवटचे असून ते २ दिवसांचे १२ तासिकांचे आयोजित करण्यात येईल. यात सर्व विद्यार्थ्यांच्या त्यांनी केलेल्या प्रात्यक्षिक कार्याची तपासणी व त्यावर आधारित अंतिम मौखिक परीक्षा घेण्यात येईल.

या व्यतिरिक्त दोन दिवसांचे संपर्कसत्र केंद्र व विद्यार्थी यांच्या सोईने आयोजित केले जाईल.

**संपर्कसत्राच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतील व ते वेळोवेळी विद्यार्थ्यांना कळविण्यात येतील.**

## १५. अंतिम परीक्षेस पात्र होण्यासाठी अटी

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेस पात्र होण्यासाठी अटी पुढीलप्रमाणे आहेत :

१५.१ शिक्षणक्रमाच्या सर्व संपर्कसत्रांना किमान ८०% उपस्थित राहून सर्व प्रात्यक्षिक कार्ये व्यवस्थित पूर्ण केल्याबद्दलचे एकत्रित असे **अभ्यासकेंद्र- प्रमुखाचे प्रमाणपत्र अध्यापकाने घेतले पाहिजे.**

१५.२ शिक्षणक्रमाच्या विद्यालयांतर्गत प्रात्यक्षिक कार्याची वेळापत्रकानुसार पूर्तता केल्याबद्दलचे एकत्रित असे विद्यालय-प्रमुखाचे प्रमाणपत्र अध्यापकाने घेतले पाहिजे.

१५.३ संगणक प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संगणक केंद्र - प्रमुखांकडून छात्राध्यापकाने घेणे आवश्यक आहे.

१५.४ केंद्रावरील मौखिक परीक्षेस उपस्थित असण्याचे प्रमाणपत्र अध्यापकाने घेतले पाहिजे.

१५.५ **विद्यार्थ्याचे कोणतेही संपर्कसत्र अथवा प्रात्यक्षिक कार्य अपूर्ण असल्यास त्यास अंतिम परीक्षेला बसू दिले जाणार नाही.**

१५.६ संपर्कसत्रे व प्रात्यक्षिक कार्ये पूर्ण केलेली नसल्यास अंतर्गत गुणदान तक्त्यात तुमच्या नावासमोर प्रात्यक्षिक कार्याचे गुण नसतील पण तरीही तुम्ही अभ्यासकेंद्राकडून परीक्षा-अर्जावर ते काम पूर्ण केल्याचे सही-शिक्के घेऊन तो अर्ज विद्यापीठाला पाठविला तर अशा परिस्थितीत तुमचे अंतर्गत कार्य पूर्ण होईपर्यंत तुमचा निकाल जाहीर केला जाणार नाही.

१५.७ अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रास आपण अनुपस्थित राहिल्यास **प्रतिदिन रु. ५००/- अतिरिक्त शुल्कासह पुढील तुकडी बरोबर पूर्ण करून त्यानंतरच आपणाला अंतिम परीक्षेला बसता येईल.**

आपण आपली संपर्कसत्रे पूर्ण केल्याची प्रमाणपत्रे विद्यापीठ परीक्षेच्या प्रवेश-अर्जास जोडून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे प्राप्त झाल्यासच अध्यापकाला परीक्षेला बसण्याची रीतसर परवानगी दिली जाईल.

## १६. विद्यार्थी-मूल्यमापन

शिक्षणक्रमात अध्यापकांचे मूल्यमापन दोन पद्धतींनी होईल.

(अ) शिक्षणक्रम पूर्ण करीत असताना सैद्धांतिक भागाशी केले जाणारे अंतर्गत मूल्यमापन. ३०% भारांश असेल.+ प्रात्यक्षिक कार्येमूल्य

(आ) शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर होणारी पाठ्यक्रमांची अंतिम लेखी परीक्षा. (ही परीक्षा प्रत्येक वर्षाच्या उन्हाळी सुट्टीत घेण्यात येईल.) ७०% भारांश असेल.

### १६.१ मूल्यांकनाचा तपशील

शिक्षणक्रमाचे एकूण मूल्यांकन १,३०० गुणांचे राहील. त्याची विभागणी पुढे दिली आहे. सैद्धांतिक भागावरील अंतिम मूल्यांकनास ८५० गुण आणि प्रात्यक्षिक भागास ४५० गुण असतील. त्याची

प्रथम वर्ष

- एकूण गुण ६५०
- सैद्धांतिक भाग - ५०० गुण यात ५ विषयांच्या अंतिम परीक्षांचा समावेश असेल.
- प्रात्यक्षिक भाग - १५० गुण

द्वितीय वर्ष

- एकूण गुण ६५०
- सैद्धांतिक भाग - ३५० गुण यात ५ विषयांच्या अंतिम परीक्षांचा समावेश असेल.
- प्रात्यक्षिक भाग - ३०० गुण

### १६.२ उत्तीर्णतेचे नियम

(अ) तात्त्विक भागात उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक लेखी परीक्षेत किमान ४०% गुण मिळविले पाहिजे आणि सर्व विषय मिळून किमान ५०% गुण मिळविले पाहिजे.

(आ) प्रात्यक्षिक भागात उत्तीर्ण होण्यासाठी प्रात्यक्षिक प्रत्येक गटात किमान ४०% गुण मिळविले पाहिजे आणि सर्व गटांमध्ये मिळून किमान ५०% गुण मिळविले पाहिजे.

(इ) अध्यापक तात्त्विक भागात तसेच प्रात्यक्षिक भागात उत्तीर्ण झाला तरच तो ह्या शिक्षणक्रमाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाला असे जाहीर करण्यात येईल.

(ई) अंतिम श्रेणी ही तात्त्विक व प्रात्यक्षिक ह्या दोन्ही भागांवर आधारित असेल व विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे ती निश्चित होईल.

(उ) प्रात्यक्षिक गुणांवर 'स्केलिंग डाऊन' (प्रमाणीकरण) योजनेनुसार प्रक्रिया करण्यात येईल. अभ्यासकेंद्रावरून प्राप्त झालेले प्रात्यक्षिकाचे गुण जसेच्या तसे शिक्षणक्रमाच्या टक्केवारीसाठी धरण्यात येणार नाहीत. सैद्धांतिक भागात/अंतिम परीक्षेतील गुणांप्रमाणे त्याचे प्रमाणीकरण करण्यात येईल. जर अंतिम परीक्षेत गुण आणि प्रात्यक्षिकात मिळालेले गुण यांत १५% पेक्षा जास्त फरक असेल तर प्रात्यक्षिकांचे गुण कमी करून तो फरक १५% पर्यंत आणला जाईल. त्यानंतर सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक परीक्षेतील गुणांची मिळून अंतिम एकत्रित टक्केवारी काढण्यात येईल.

(ऊ) अंतिम गुण पुढे दर्शविल्याप्रमाणे दिले जातील.

| *वर्ग* | *ग्रेड पॉईंट* |
|---|---|
| 'ओ' विशेष प्राविण्य | १० |
| 'ए+' अति उत्तम | ९ |
| 'ए' उत्तम | ८ |
| 'बी+' चांगला | ७ |
| 'बी' सरासरीपेक्षा वर | ९ |
| 'सी' साधारण | ५ |
| 'डी' साधारण | 0 |
| 'एफ' साधारण | 0 |

## १७. शिक्षणक्रमाचे शुल्क

विद्यापीठाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार निवड समितीने प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाचे शुल्क म्हणून पुढील प्रमाणे रु. ३२,८५०/- शुल्क भरावे लागेल.

विद्यापीठ शुल्क प्रथम वर्षी रु. १५,८५० + अभ्यासकेंद्र शुल्क रु. १७,००० असे एकूण रु. ३२,८५० प्रवेशाचे वेळी विद्यापीठात भरणे अनिवार्य असेल. द्वितीय वर्ष प्रवेशाचे वेळी व रु. २,१५०/- प्रवेश-अर्ज भरतांना भरणे अनिवार्य असेल.

अभ्यासकेंद्र शुल्क रु. १७,०००/- त्यात मूल्यशिक्षण प्रात्यक्षिक व साहित्य शुल्क रु. ६००/-, संगणक प्रात्यक्षिक कार्य शुल्क रु. ६००/-, ग्रंथालय आणि अभ्यासकेंद्र शुल्क व विकासनिधी रु. १५,८००/- या सर्वांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| ● नोंदणी शुल्क .......................... | रु. | १००/- |
| ● विकसन शुल्क ......................... | रु. | ९,४५०/- |
| ● शिक्षण शुल्क .......................... | रु. | ४,०००/- |
| ● परीक्षा शुल्क .......................... | रु. | ४,३००/- |
| ● अभ्यासकेंद्र शुल्क ...................... | रु. | १७,०००/- |
| ● इतर शुल्क ............................. | रु. | १५०/- |
| **एकूण ..............................** | **रु.** | **३५,०००/-** |

भरलेल्या शुल्कातील कोणतेही शुल्क आपणास परत केले जाणार नाही. **याव्यतिरिक्त आपापल्या अभ्यासकेंद्रावर तेथील ग्रंथालय नियमानुसार अनामत रक्कम आपणास भरावी लागेल. ती मात्र शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर आपणास अभ्यासकेंद्रावरून परत देण्यात येईल. त्याचीही रीतसर पावती अभ्यासकेंद्रावरून मिळेल.** या व्यतिरिक्त कोणत्याही स्वरूपाचे शुल्क किंवा रक्कम अभ्यासकेंद्राकडून घेतली जाणार नाही. अभ्यासकेंद्राकडून पावती न मिळाल्यास किंवा अतिरिक्त रक्कम घेतल्यास विद्यापीठाकडे विचारणा करावी.

विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चिती झाल्यानंतर साधारणतः ऑगस्ट/सप्टेंबर महिन्यापूर्वी आपल्या नियोजित अभ्यासकेंद्राकडून

संपर्कसत्रासंदर्भात पत्र येणे आवश्यक आहे. ते न आल्यास आपल्या नियोजित अभ्यासकेंद्रावर आपण संपर्क साधावा. प्रवेशानंतर आठ दिवसांत आपले नाव, पत्ता, फोन नंबर, पत्रव्यवहारासाठी अभ्यासकेंद्राकडे नोंदवावा.

**महत्त्वाचे**

प्रवेशासंदर्भात या पुस्तिकेत दिलेल्या सर्व अटी आणि नियम प्रवेशेच्छू विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील याची नोंद घ्यावी.

## १८. विभागीय केंद्रे

| *विभागीय केंद्र* | *पत्ता* | *दूरध्वनी* |
|---|---|---|
| अमरावती | व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड,<br>पोस्ट व्ही.एम.व्ही., नवसारी<br>अमरावती - ४४४ ६०४ | (०७२१) २५३१४४५<br>फॅक्स -२५३१४४४<br>९४२२२४७२९२ |
| औरंगाबाद | सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या<br>वसतिगृहाच्या पूर्वेस<br>नंदनवन कॉलनी, छावणी<br>औरंगाबाद - ४३१ ००२ | (०२४०)२३७१०६६<br>फॅक्स -२३७१०८८<br>९४२२२४७२९३ |
| मुंबई | जगन्नाथ शंकरशेठ महानगरपालिका<br>शाळेची इमारत, दुसरा मजला<br>फ्रेअर ब्रीज (साऊथ एण्ड)<br>नाना चौक, ग्रँट रोड (पश्चिम)<br>मुंबई - ४०० ००७ | (०२२)२३८७४१८६<br>फॅक्स :<br>२३८१३२५६<br>९९६९०१३८८६ |
| पुणे | शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह<br>महानगरपालिका शाळा क्र.५<br>(मुलांची), ६५४, सदाशिव पेठ<br>हौदासमोर, कुमठेकर मार्ग<br>पुणे - ४११ ०३० | (०२०)<br>२४४९११०७<br>फॅक्स :<br>२४४५७९१४<br>९४२२२४७२९८ |
| नागपूर | सुभेदार हॉल, विद्यापीठ क्रीडा परिसर<br>लॉ कॉलेज कॅम्पस, रविनगर चौका-<br>जवळ, अमरावती रोड<br>नागपूर-४४० ००१ | (०७१२)२५५३७२४<br>फॅक्स :<br>२५५३७२५<br>९४२२२४७२९५ |

| *विभागीय केंद्र* | *पत्ता* | *दूरध्वनी* |
|---|---|---|
| नाशिक | महानगरपालिकेची जुनी इमारत<br>दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी<br>नाशिक - ४२२ ००२ | (०२५३)२३१७०६३<br>फॅक्स:२५७६७५६<br>९४२२२४७२९७ |
| कोल्हापूर | शिवाजी विद्यापीठ परिसर<br>पोस्ट ऑफिसशेजारी, विद्यानगर<br>कोल्हापूर - ४१६ ००४ | (०२३१) २६०७०२२<br>फॅक्स:२६०७०२२<br>९४२२२४७२९४ |
| नांदेड | स्वामी रामानंद तीर्थ<br>मराठवाडा विद्यापीठ<br>क्रीडा इमारत, नांदेड-४२१ ६०६ | (०२४६२) २३६७१८<br>फॅक्स:२३६७१८<br>९४२२२४७२९६ |
| कल्याण | कै. खासदार प्रकाश<br>परांजपे स्पर्धात्मक परीक्षा<br>प्रशिक्षण केंद्र, कल्याण-डोंबिवली<br>महापालिकेची इमारत,<br>चंद्रभूषण प्लाझा, मिश्रा कंपाउंड,<br>सहजानंद चौक (प.), जि. ठाणे | ९३२३१०८०४०<br>(०२५१)<br>२२०४०८६ |

## १९. अभ्यासकेंद्रे

ह्या पदवी शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाची एन.सी.टी.ई. मान्य ३५ अभ्यासकेंद्रे आहेत. प्रवेश-अर्जांची विक्री यापुढे अभ्यासकेंद्रावर होणार नसून प्रत्येक विद्यार्थ्याने ती नेटवरून डाऊनलोड करणे अपेक्षित आहे. संगणकीय अर्जाची प्रिंट इ-चलनासह स्वतःकडे ठेवावी.

प्रत्येक जिल्ह्याची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. त्यामुळे **ज्या जिल्ह्यात प्रवेशेच्छू शिक्षकांची शाळा असेल त्याच जिल्ह्यातून त्यांनी प्रवेशासाठी अर्ज भरणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा प्रवेश मुलाखतवेळी नाकारला जातो.**

मुंबई विभागातील विद्यार्थ्यांचे राहण्याचे ठिकाण व सेवेचे ठिकाण याचा विचार करून प्रवेशेच्छू विद्यार्थी मुंबईतील चार जिल्ह्यांपैकी कोणत्याही जिल्ह्यात प्रवेश घेऊ शकतील. मात्र त्यासाठी त्यांना प्रवेश-अर्ज भरताना एस.टी. कॉलेज (धोबीतलाव), सेवासदन (ठाणे), चेंबूर कॉलेज, पनवेल ह्या चार अभ्यासकेंद्रांपैकी **एक अभ्यासकेंद्र निवडणे अनिवार्य असेल.** एकदा प्रवेश-अर्ज भरल्यानंतर केंद्रबदलाबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच ज्या अभ्यासकेंद्रासाठी तो अर्ज भरलेला असेल त्या यादीतील गुणवत्ता क्रमाचा विचार प्रवेशासाठी होईल. मुंबई जिल्ह्यासाठी एकापेक्षा जास्त केंद्रांवर अर्ज भरला तर अशा विद्यार्थ्याचा प्रवेश होणार नाही, चुकून प्रवेश झाला तर शुल्क परत न करता प्रवेश रद्द करण्यात येईल.

**अभ्यासकेंद्रांची यादी पुढीलप्रमाणे :**

**अमरावती विभाग**

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| ०१. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>रामदास पेठ,अकोला<br>☎ : (०७२४) २४३३७६५ | 1121A |
| ०२. | शिवाजी शिक्षण संस्थेचे शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजीनगर<br>डॉ. पंजाबराव देशमुख चौक<br>अमरावती - ४४४ २१४<br>☎ : (०७२१) २६६२१४२ | 1250A |
| ०३ | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>चिखली रोड, बुलढाणा - ४४३ ००१<br>☎ : (०७२६२) २४७०६२ | 1302A |
| ०४. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>गोधनी रोड, उमरसरा<br>यवतमाळ - ४४५ ००१<br>☎ : (०७२३२) २४४३४२ | 1404A |
| ०५. | छबुताई डहाके शिक्षणशास्त्र महाविद्यालय<br>कारंजा (लाड), जि. वाशिम<br>☎ : (०७२५६) २२३६१२ | 1504A |

**औरंगाबाद विभाग**

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| ०६. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>स्टेशन रोड, औरंगाबाद<br>☎ : (०२४०) २३३४८४०<br>ई-मेल : asegsea@agd2.net.in | 2101A |
| ०७. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>अंबाजोगाई, जि. बीड - ४३१ ५१७<br>☎ : (०२४४६) २४७०५६ | 2203A |
| ०८. | मत्सोदरी कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>मत्सगड, जालना - ४३१ २०४<br>☎ : (०२४८२) २३५९३७ | 2303A |
| ०९. | स्वामी विवेकानंद संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद - ४१३ ५०१<br>☎ : (०२४७२) २२२०५८ | 2601A |

**मुंबई विभाग**

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| १०. | चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय<br>रामकृष्ण चेंबूर मार्गसमोर, चेंबूर नाका<br>चेंबूर, मुंबई - ४०० ०७१<br>Email : cssm_college@hotmail.com<br>☎ : (०२२) २५२२१४३९ | 3102A |
| ११. | सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>३, महापालिका मार्ग, धोबीतलाव<br>मेट्रो सिनेमा, मुंबई - ४०० ००१<br>☎ : (०२२) २२६२००५० | 31139 |
| १२. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>पुणे-मुंबई हायवे, पनवेल<br>जि. रायगड - ४१० २०६<br>☎ : (०२२) २७४५३००० | 3213A |
| १३. | सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>सेंट्रल हॉस्पिटलसमोर, सेवासदन मार्ग<br>उल्हासनगर, जि. ठाणे - ४२१ ००१<br>☎ : (०२५१) २५४५५६५<br>ई-मेल : seva_sadn_unr@hotmail.com | 3501A |

**नागपूर विभाग**

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| १४. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>भंडारा - ४४१ ९०४<br>☎ : (०७१८४) २५२३८६<br>ई-मेल :<br>principal56801@yahoo.com | 4102A |
| १५. | पुंजाभाई पटेल कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>डॉ. आंबेडकर वार्ड, गोंदिया - ४४१६०१<br>☎ : (०७१८२) २२२५०८,२३१६९८<br>ई-मेल : ppcegonbhv@sancharnet.in | 4104A |
| १६. | जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>सिव्हिल लाईन्स, चंद्रपूर - ४४२ ४०१<br>☎ : (०७१७२) २५८७२२, २५५२९२<br>ई-मेल : jecbed@nagpur.net.in | 4220A |

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| १७. | शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे<br>ॲड. एन. एस. गंगुवार कॉलेज ऑफ एज्यु.<br>गडचिरोली - ४४२ ६०५<br>☎ : (०७१३२) २३३४५३<br>ई-मेल : nsgbed@nagpur.net.in | 4302A |
| १८. | राधिका अध्यापक महाविद्यालय<br>नवोदय विद्यालय बिल्डिंग, राजीवनगर<br>सोमलवाडा, नागपूर - ४४० ०२५<br>☎ : (०७१२) २२९१६८२<br>ई-मेल :<br>radhikabedcollege@nagpur.com | 4484A |
| १९. | स्वावलंबी कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>वर्धा - ४४२ ००१<br>☎ : (०७१५२) २४३८०४ | 4501A |

## नाशिक विभाग

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| २०. | विद्याप्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>केडगाव देवी रोड<br>अहमदनगर - ४१४ ००१<br>☎ : (०२४१) २५५१४२०<br>ई-मेल : vpsce@rediffmail.com | 5116A |
| २१. | धुळे एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ<br>एज्युकेशन, डॉ. लोहिया मार्ग<br>एस. आर. पी. कॅम्पजवळ<br>धुळे - ४२४ ००१<br>☎ : (०२५६२) २३८०४२ | 5201A |
| २२. | खान्देश एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ<br>एज्युकेशन, एम. जे. कॉलेज परिसर<br>जळगाव - ४२५ ००१<br>☎ : (०२५७) २२३४१८७ | 5310A |
| २३. | एन.डी.एम.व्ही.पी.चे कॉलेज ऑफ<br>एज्युकेशन, के.टी.एच.एम. कॉलेज कॅम्पस<br>गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२<br>☎ : (०२५३) २५७१५४२<br>ई-मेल : coednsk_nsk@sancharnet.in | 5401A |
| २४. | शिक्षणशास्त्र महाविद्यालय<br>नंदुरबार<br>☎ : (०२५६४) २२२५०८ | 5507A |

## पुणे विभाग

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| २५. | झेल एज्युकेशन सोसायटी संचलित<br>ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>सर्व्हे नं. २५/३/३<br>हिंगणे खुर्द, सिंहगड रोड<br>पुणे - ४११ ०९१ | 62395 |
| २६. | आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>कॅम्प, सातारा - ४१५ ००१<br>☎ : (०२१६२) २३१२५७ | 6401A |
| २७. | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>सोलापूर - ४१३ ००२<br>☎ : (०२१७) २३७३२३७<br>ई-मेल : spr_dces@sancharnet.in | 6502A |

## कोल्हापूर विभाग

| अ.क्र. | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| २८. | सांगली शिक्षण संस्थेचे एस.पी.एस. कॉलेज<br>ऑफ एज्युकेशन, राजवाडा<br>सांगली - ४१६ ४१६<br>☎ : (०२३३) २३७३८४८ | 7254A |
| २९. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>बोर्डिंग रोड, रत्नागिरी - ४१५ ६१२<br>☎ : (०२४५२) २२४६५० | 7301A |
| ३०. | शिक्षण विकास मंडळाचे<br>श्री. एस. के. पंतवालावलकर कॉलेज ऑफ<br>एज्युकेशन, देवगड, जि. सिंधुदुर्ग<br>☎ : (०२३६४) २६२१९४<br>ई-मेल : skpc@goatelecom.com | 7403A |
| ३१. | आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय<br>गारगोटी, जि. कोल्हापूर<br>☎ : (०२३२४) २२००७९ | 7515A |

**नांदेड विभाग**

| *अ.क्र.* | *अभ्यासकेंद्राचा पत्ता व दूरध्वनी* | *अभ्यासकेंद्र संकेतांक* |
|---|---|---|
| ३२. | वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय<br>शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर<br>जि. लातूर<br>☎ : (०२३८१) २२०२९०<br>ई-मेल : vnbed@yahoo.co.in | 8416A |
| ३३. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>नांदेड - ४३१ ६०१<br>☎ : (०२४६२) २२९३२८<br>ई-मेल : gcenanded@gmail.com | 8502A |
| ३४. | शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>जिंतूर रोड, परभणी<br>☎ : (०२४५२) २२४००१५ | 8702A |
| ३५. | प्रियदर्शिनी सेवा संस्थेचे डॉ. शंकरराव सातव<br>शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कळमनुरी<br>जि. हिंगोली - ४३१७०२<br>☎ : (०२४५५) २२००३७ | 8810A |

***टीप :*** *विद्यापीठाने प्रवेश देते वेळी दिलेले अभ्यासकेंद्र काही कारणांमुळे कार्यान्वित होऊ शकले नाही तर पर्यायी* ***व्यवस्था करण्यात येईल व त्या ठिकाणी शिक्षणक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.***

## २०. विशेष नोंदी

बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर खालील विशेष बाबी लक्षात ठेवाव्यात.

२०.१ विषय बदलासंबंधी अर्ज करू नयेत तो बदल करण्यास आपल्याला परवानगी देण्यात येणार नाही. **नावातील स्पेलिंग किंवा देवनागरीतील दुरुस्तीसाठी विद्यार्थ्याने अभ्यासकेंद्रामार्फत संबंधित विभागीय केंद्राशी संपर्क साधावा.**

२०.२ **जिल्हानिहाय गुणवत्ता यादी केली जात असल्याने एकदा दिलेले अभ्यासकेंद्र बदलून दिले जाणार नाही. अध्यापकास संपूर्ण शिक्षणक्रम दिलेल्या अभ्यासकेंद्रावरच पूर्ण करावा लागेल.** केवळ बदली झाल्यास केंद्रबदल करावयाचा असेल तर तो अर्ज करताना त्यावर मूळ केंद्राचे ना हरकत आणि नवीन केंद्राच्या मान्यतेसंदर्भात संबंधित अभ्यासकेंद्र संचालक/ समन्वयक यांची सही व शिक्का असावा. तसेच **दोन्ही अभ्यासकेंद्रावर अभ्यासकेंद्र शुल्क भरण्याची तयारी ठेवावी.**

२०.३ **एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही वा या संदर्भातील पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तथापि, ज्या विद्यार्थ्याचा मृत्यू प्रवेशानंतर सहा महिन्याच्या आत झालेला असेल त्याच्या वारसास पुढील आवश्यक कागदपत्रांची त्याच्या वारसाने पूर्तता केल्यास प्रशासकीय खर्च वजा करून ८०% शुल्क परत करण्यात येईल. शुल्क परत करताना (१) मृत्यूच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (२) रु. २० च्या स्टॅम्पपेपरवर कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समक्ष प्रमाणित केलेले वारसाचे ना हरकत दर्शविणारे मूळ शपथपत्र (३) शुल्क भरल्याची मूळ पावती (४) संपूर्ण अध्ययन साहित्य.**

२०.४ अनुपस्थित असलेल्या संपर्कसत्राचे काम पूर्ण करायचे असल्यास त्या संपर्कसत्रातील दिवसांच्या संख्येनुसार प्रत्येक दिवसामागे रु. ५००/- प्रमाणे जादा शुल्क आकारण्यात येईल.

२०.५ बी.एड. पदवीनंतर ज्या छात्रअध्यापकास अन्य विद्यापीठात पुढील उच्चशिक्षण घ्यावयाचे आहे त्यांना Migration प्रमाणपत्र मिळू शकेल. **त्याकरिता प्रवेशाभिनंदन पुस्तिकेत दिलेल्या विहित नमुन्यात अर्ज करावा.**

२०.६ विद्यापीठास पत्र पाठविताना विद्यार्थ्याने अभ्यासकेंद्र, कायम नोंदणी क्रमांक व तुकडीचा उल्लेख नमूद करणे आवश्यक आहे.

२०.७ उमेदवारास विद्यापीठाने माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या अटी व शर्ती प्रवेशासाठी लागू राहतीलच परंतु याव्यतिरिक्त विद्यापीठाने वेळोवेळी तयार केलेले नियमही बंधनकारक राहतील.

## २१. संपर्कासाठी

(विद्यापीठात फोन करताना संबंधित अधिकाऱ्यांनाच ते करावेत.)

२१.१ **नोंदणीच्या संदर्भात** (प्रवेश व विषय बदल अडचणी)
प्रमुख, परीक्षा व नोंदणी कक्ष
किंवा
श्री. मंगेश कांबळे, कक्ष अधिकारी, नोंदणी कक्ष
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ - २२३०७३४

२१.२ **शिक्षणक्रम समन्वयक** (शैक्षणिक अडचणी)
डॉ. कविता साळुंके, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
दूरध्वनी - (०२५३) २२३१७१४ विस्तारित क्र. ३८०४

२१.३ **शिक्षणक्रमाच्या (शैक्षणिक) अडचणींच्या संदर्भात**
प्रभारी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
प्रा. डॉ. संजीवनी महाले,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
फोन : (०२५३) २२३१४७२

२१.४ **प्रवेशासंदर्भातील तक्रारी तसेच प्रवेशासंदर्भातील कागदपत्र प्राप्ती संदर्भात**

मा. कुलसचिव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२

२१.५ **प्रवेश व परीक्षेच्या संदर्भात**

डॉ. अर्जुन घाटुळे, परीक्षा नियंत्रक
श्रीमती मीना वाडिले, कक्ष अधिकारी, परीक्षा कक्ष
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
फोन : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७
फॅक्स : ९१-०२५३ - २२३१७१६


२१.६ **पुस्तकांच्या संदर्भात**

श्री. अनिल थोरात, भांडार अधिकारी
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२

२१.७ **न्यायालयीन संदर्भात**

बी.एड. प्रवेशासंदर्भात कोणतीही न्यायालयीन कार्यवाही करावयाची असेल तर ती केवळ विद्यापीठाच्या **कुलसचिवांच्या नावानेच करावी**. अन्य कोणत्याही पदाधिकाऱ्यांच्या नावे ती करू नये.
मा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**महत्त्वाचे : विद्यापीठाशी करावयाचा सर्व पत्रव्यवहार पोस्टाने अथवा स्पीड पोस्टनेच करावा. खाजगी कुरियरमार्फत करू नये.**



## भाग २

# बी.एड. प्रवेश-प्रक्रियेत संगणकाचा वापर

Anurath/X16-042

## प्रास्ताविक

बी.एड. प्रवेश प्रक्रिया ही गुंतागुंतीची आहे. या शिक्षणक्रमासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या खूप जास्त असते. त्याचबरोबर यात प्रवेशास पात्र होण्यासाठी आणि नंतर निवडीसाठी अनेक निकष लागतात. त्यामुळे प्रवेशासाठी उमेदवारांची चढाओढ लागलेली दिसून येते. या एकूणच कामात सुसूत्रता यावी, जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून प्रत्यक्ष प्रवेशापर्यंतचा कालावधी शक्य तेवढा कमी व्हावा, प्रवेश देताना कुणावरही अन्याय होऊ नये, कामकाजात पारदर्शकता असावी अशा सर्व कारणांसाठी मुक्त विद्यापीठ बी.एड. प्रवेश-प्रक्रियेत संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात करत असते. अर्थातच ही सगळी धडपड तुम्हाला त्रास देण्यासाठी नसून जास्तीतजास्त सोई, सुविधा तसेच न्याय देण्यासाठी आहे; विद्यापीठाद्वारा संगणक व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असला तरी बऱ्याच वेळेस असे दिसून येते की या सर्व गोष्टींचा उपयोग करून घेण्यासाठी प्रवेश-उमेदवारांना मात्र काही गोष्टींची साक्षरता अजिबातच नसते. अशा वेळेस मात्र विद्यापीठाने पुरविलेल्या या सुविधा म्हणजे 'एक नवीन कटकट' आल्यासारखी उमेदवारांना वाटते. तुमच्या मनातल्या सर्व शंका दूर व्हाव्यात, प्रवेश-प्रक्रियेदरम्यान विद्यापीठाने वेबसाईटच्या माध्यमातून पुरविलेल्या सुविधांचा तुम्हांला सर्वांना लाभ करून घेता यावा ही या भागाची मुख्य उद्दिष्टे आहे. कृपया हा भाग काळजीपूर्वक वाचून, समजून घ्या. याचा तुम्हांला बी.एड. प्रवेश-प्रक्रियेसाठी तर उपयोग होईलच, शिवाय तुमची संगणक-साक्षरता वाढविण्यासाठीदेखील याचा उपयोग होईल.

## बी.एड. प्रवेशप्रक्रियेत माहिती तंत्रविज्ञानाचा वापर

तुमच्या आजूबाजूला दिसणाऱ्या कोणत्याही क्षेत्राचा विचार केलात तर माहिती-तंत्रविज्ञानाचा खूप मोठ्या प्रमाणात वापर केलेला दिसून येईल. कोणत्याही कामातली अचूकता वाढवणे, कामात पारदर्शकता आणणे आणि कामाची गती खूप जास्त प्रमाणात वाढवणे अशा उद्देशांनी माहिती-तंत्रविज्ञानाचा वापर सातत्याने केला जातो असे आपल्या लक्षात येईल. संगणक हा तर माहिती-तंत्रविज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. संगणकाच्या समावेशाशिवाय आजचे युग हे माहिती-तंत्रविज्ञान युग होणे शक्यच नव्हते. त्यातही संगणकातल्या वाढत जाणाऱ्या वापरसुकरतेमुळे त्याची दैनंदिन कामातली लोकप्रियता वाढतच जाताना दिसून येते. इतकेच नाही तर संगणकाचा वापर इंग्रजीतून बऱ्याच जास्त प्रमाणात होत असला तरी मराठी व अन्य भाषांमधूनही संगणकाच्या वापराचे प्रमाण वाढतेच आहे. माहिती-तंत्रविज्ञानाला माहिती संप्रेषण तंत्रविज्ञानात रूपांतरित करण्यामध्ये इंटरनेटचा फार मोठा वाटा आहे. इंटरनेट म्हणजे जगभरातल्या संगणकांचे जाळे. या सर्व जोडलेल्या संगणकांच्या माध्यमातून माहितीची त्वरित देवाणघेवाण सहजशक्य झालेली आहे. माहितीची इंटरनेटद्वारा देवाणघेवाण ही वेबसाईटद्वारा केली जाते. इंटरनेट सुविधेचा वापर घर, शाळा, कार्यालय या ठिकाणांवरून केला जाऊ शकतो. यांपैकी कोणत्याही ठिकाणी इंटरनेट सुविधा उपलब्ध नसेल तर काही मिनिटांच्या किंवा तासांच्या अवधीसाठी काही शुल्क देऊन सायबर कॅफेतून ही सुविधा मिळू शकते. बी.एड. प्रवेशासाठी इंटरनेट, वेबसाईट यांचा वापर विद्यापीठ खूप जास्त प्रमाणात करणार आहे. आपल्यापैकी काही जणांना वेबसाईट म्हणजे काय, ती कशी पाहावी, सायबर कॅफे म्हणजे काय या संदर्भात प्रश्न असतील. म्हणून वेबसाईट, सायबर कॅफे यांच्याबाबतची पुढे दिलेली माहिती तुम्हाला उपयोगी ठरेल.

### ■ वेबसाईट म्हणजे काय?

वर्तमानपत्रे नियतकालिके ही जशी प्रसारमाध्यमे आहेत, तसेच वेबसाईट हेदेखील आधुनिक काळातील प्रसारमाध्यम आहे. ज्याचा वापर संगणकाच्या आधारे केला जातो. आपल्याला आवश्यक त्या माहितीचे प्रसारण शीघ्रतेने करण्यासाठी संबंधित संस्था आपली वेबसाईट (माहिती मिळण्याचे ठिकाण) तयार करून त्यात आपली माहिती विविध पानांवर देते. उदाहरणार्थ, प्रवेश माहिती, परीक्षा माहिती, निकाल माहिती, शैक्षणिक साहित्य माहिती, तुमचे प्रश्न, इत्यादी. मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेने माहिती देण्यासाठी http://ycmou.digitaluniversity.ac अशी वेबसाईट तयार केलेली आहे. त्यालाच Home Page असेही म्हणतात. वेबसाईटवरील मजकूर बघण्यासाठी संगणकाची आणि इंटरनेटच्या सुविधेची आवश्यकता असते. जर आपल्या घरी संगणक आणि इंटरनेट सुविधा असेल तर आपण घरीदेखील वेबसाईट बघू शकता. नसल्यास आपण सायबर कॅफेची मदत घेऊ शकता.

### ■ सायबर कॅफे म्हणजे काय?

सायबर कॅफे म्हणजे काही काळासाठी संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा भाड्याने वापरण्याचे ठिकाण. आपण रस्त्याने फिरायला निघालात की आपल्याला अनेक ठिकाणी सायबर कॅफे नावाच्या पाट्या/फलक निदर्शनास येतील. एखाद्या हॉटेलमध्ये जशी खाण्यापिण्यासाठी टेबल्स मांडलेली असतात, आणि आपल्याला हवा तो पदार्थ आपण मागवून खातो, तसेच सायबर कॅफेत अनेक संगणक संच इंटरनेटला जोडलेले असतात. कोणत्याही संगणकाचा वापर करून आपण इंटरनेटद्वारा वेबसाईटवर बघू शकतो. ई-मेल पाठवू शकतो. आपल्याला संगणकाचे ज्ञान नसेल तर सायबर कॅफे चालवणारी व्यक्ती आपल्याला मदत करते. सायबर कॅफेत दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या सेवांचे शुल्क सामान्यपणे प्रतितास रु.२०/- ते ३०/- आकारले जाते. तेव्हा वेबसाईटवरून बी.एड. प्रवेशाची वेळोवेळी देण्यात येणारी माहिती कशी मिळवावी या प्रश्नाने घाबरून न जाता ही माहिती मिळविण्यासाठी तुम्ही सायबर कॅफेचा मोठ्या प्रमाणात वापर करू शकता. आपण दूरवरून विद्यापीठात फोन करून प्रवेशासंदर्भात विचारणा करता, त्या वेळी आपल्याला जो खर्च येतो त्यापेक्षा सायबर कॅफेत जाऊन वेबसाईटवर माहिती पाहण्याचा खर्च निश्चितच कमी असेल. तेव्हा ह्या सुविधेचा आपण अवश्य वापर करावा.

## बी.एड. प्रवेशप्रक्रियेत ऑनलाईन प्रवेशअर्जाचा वापर

बी.एड. प्रवेशप्रक्रियेत वापरसुकरता व अचूकता आणण्यासाठी विद्यापीठाने अद्ययावत तंत्रविज्ञानाचा वापर करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे हस्तलिखीत अर्जाबरोबरच पूर्णपणे ऑनलाईन प्रवेशअर्ज भरणे या टप्प्यापर्यंत प्रगती झालेली आहे. यावर्षी तर तुमचे ई-मेल अकाऊंट

व भ्रमणध्वनी असल्यास त्याचाही वापर तुमच्यापर्यंत काही माहिती पोहोचविण्यासाठी केला जाणार आहे. अशा प्रकारे प्रवेशासाठी आता ऑनलाईन प्रवेश-अर्जाचा वापर हे अत्याधुनिक तंत्रज्ञान मोबाईल तंत्रज्ञानासमवेत वापरले जात आहे. यामध्ये प्रवेशअर्ज इंटरनेटद्वारा वेबसाईटवर उपलब्ध होतो. प्रवेशअर्जातील सर्व माहिती संगणकाच्या की-बोर्डच्या साहाय्यानेच आपण भरावी आणि तो अर्ज विद्यापीठाला Upload करावा. परिणामतः तो तत्काळ विद्यापीठाकडे सादर होतो. ऑनलाईन प्रवेश-अर्ज केवळ विद्यापीठाच्या वेबसाईटवरच उपलब्ध असून इंटरनेटच्या माध्यमातून भरायचा असल्यामुळे त्याला 'ऑनलाईन' अर्ज असे म्हणतात. ऑनलाईन प्रवेश-अर्ज भरतानाच संगणक तुम्हाला एकूण तीन-चार वेळा भरलेल्या माहितीची अचूकता तपासण्याची व त्यात सुधारणा करण्याची संधी येईल.

## (अ) ऑनलाईन प्रवेशअर्ज भरण्यासंदर्भातल्या काही महत्त्वपूर्ण सूचना

बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी उमेदवारांची खूप गर्दी, चढाओढ असते. त्यातून प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छाननी कमीत कमी वेळेत व अचूक करण्यासाठी ऑनलाईन प्रवेशअर्जाचा वापर केला जाणार आहे. आपण जो ऑनलाईन प्रवेशअर्ज भराल, त्यातील माहितीच्या आधारे जिल्हानिहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यामुळे हा अर्ज महत्त्वाचा आहे आणि तो तुम्ही काळजीपूर्वक भरला पाहिजे. यासंदर्भातल्या महत्त्वपूर्ण सूचना पुढे दिलेल्या आहेत. अर्ज भरण्यापूर्वी त्या काळजीपूर्वक वाचा व समजून घ्या.

(१) शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक अध्यापक-विद्यार्थ्यांचे अर्ज संगणकाला माहिती पुरविण्यासाठी संगणकावरून एका विशिष्ट नमुन्यात भरून घेण्यात येतात. यात माहितीपुस्तिकेतील प्रवेश मुलाखतीच्या वेळीच ऑनलाईन अर्ज व प्रवेशासाठी सुरुवातीला भरलेला ऑनलाईन प्रवेशअर्ज भरावा लागेल. ते दोन्ही नमुना अर्ज या माहितीपुस्तिकेत दिलेला आहे. **अर्जदाराने हे दोन्हीही अर्ज भरणे आवश्यक आहे. मूळ अर्जात दर्शवलेल्या माहितीनुसारच ऑनलाईन प्रवेशअर्जातील माहिती भरावयाची आहे. प्रवेश गुणवत्ता यादी केवळ ऑनलाईन प्रवेशअर्जातील माहिती गृहीत धरून केली जाते व प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी ऑनलाईन प्रवेश अर्जाबरोबरच तुमचा मुलाखतीच्या वेळेचा ऑनलाईन प्रवेश अर्जही विचारात घेण्यात येतो. त्यावेळी ह्या दोन्ही माहितीत तफावत आढळल्यास तुमचा गुणवत्ता यादीतील नंबर खालीवर होऊन प्रवेश न मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे दोन्ही अर्ज तुम्ही काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे. प्रत्यक्षप्रवेशाच्या वेळी त्याविषयी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.** या शिक्षणक्रमातील ऑनलाईन प्रवेशअर्जाच्या विविध मुद्द्यांविषयी माहिती व संबंधित महत्त्वाच्या सूचनांचा समावेश या भागात करण्यात आलेला आहे. तसेच या माहितीपुस्तिकेत दिलेला नमुना अर्ज (Specimen copy) आपण काळजीपूर्वक अभ्यासावा. म्हणजे आपणास अर्ज भरणे सोपे जाईल. याव्यतिरिक्त **अर्जासोबत आपणांस सरावासाठी एक अर्ज दिलेला आहे. प्रथम आपण सरावासाठी दिलेल्या अर्जात आपली पूर्ण माहिती पेन्सिलीने भरावी. दिलेल्या सूचनेनुसार माहिती ऑनलाईन अर्ज भरावा. ऑनलाईन प्रवेश अर्ज बिनचूक भरण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमचीच आहे. त्यातील चुकांना इतर कुणीही जबाबदार राहणार नाही.**

(२) ऑनलाईन प्रवेशअर्ज भरण्यासाठी आपल्या किंवा आपण वापरणार असणाऱ्या **संगणकात पुढील तीन सुविधा असणे अत्यावश्यक आहे**

(अ) इंटरनेट सुविधा

(आ) छपाई यंत्राची (प्रिंटर) सुविधा

(इ) स्कॅनिंगची सुविधा

यापैकी कोणतीही एक सुविधा जरी उपलब्ध नसेल तर ऑनलाईन प्रवेशअर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ शकणार नाही.

(३) ऑनलाईन प्रवेशअर्ज भरत असताना संपूर्ण प्रक्रिया पूर्ण (submit) करण्यापूर्वी **संगणक ह्या प्रक्रियेदरम्यान भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री करून घेण्याची एकूण किमान दोन वेळा संधी देतो. आपण कोणाकडूनही अर्ज भरून घेतला असला तरी त्यात भरलेली माहिती पडताळणे ही तुमची जबाबदारी असते. या टप्प्यानंतर आपल्याला त्यात कोणतेही बदल करता येणार नाहीत, याची नोंद घ्यावी. त्यामुळे अर्ज भरताना आपण अचूक माहिती भरत आहात याची पुन्हा पुन्हा खात्री करून घ्यावी. ऑनलाईन प्रवेश अर्जाची "Confirm and Submit Application Form" टप्प्यापासूनची वाटचाल आणि अंतिमतः "submit" करणे. इ बँकींगद्वारा प्रोसेसिंग शुल्क भरावे त्यानंतर आपणाला आपण भरलेला अर्ज यशस्वीपणे पोहोचलेला आहे असा मेसेज येईल. तेव्हा आपण प्रवेशासाठी विचाराधीन असाल.**

(४) आपण भरलेल्या ऑनलाईन अर्जाच्या आधारे 'यशस्वीरित्या ऑनलाईन अर्ज भरू शकलेल्या प्रवेश उमेदवारांची यादी' आपल्या अवलोकनासाठी वेबसाईटवरून प्रसिद्ध केली जाईल. ज्या तारखेला ही यादी प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून आठ दिवस ही यादी उपलब्ध राहील. या यादीत आपण केलेल्या चुकांबाबतचे अर्ज अपेक्षित नाहीत त्यात दुरुस्त्या होत नाहीत. तर संगणकाकडून आपण भरलेली माहिती वाचण्यात झालेल्या चुकांबाबतची माहिती अपेक्षित असते आणि केवळ तेवढ्याच चुका दुरुस्त केल्या जातात आणि तोपर्यंतच आपण आपल्या याबाबतच्या तक्रारी केवळ ई-मेलद्वारे मुख्यालयात पाठवाव्यात. आठ दिवसांनंतर वेगवेगळ्या मार्गांनी आलेल्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे आपल्या तक्रारींवर विचार होण्यासाठी आपण किमान छापील प्रत घेतलेली असणे आवश्यक असेल. छापील प्रत न घेता केल्या गेलेल्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

(५) आपण भरलेल्या ऑनलाईन प्रवेशअर्जात अर्ज भरतेवेळी काही चुका झाल्या आणि त्या प्रवेशअर्ज सादर केल्यानंतर तुमच्या लगेच लक्षात आल्यास आपण केवळ प्रवेश-अर्ज भरावयाच्या मुदतीतच नवीन प्रोसेसिंग शुल्कासह पुन्हा अर्ज भरू शकता.

(६) ऑनलाईन अर्ज भरताना आणि/किंवा नंतरच्या विविध टप्प्यांवर याद्या बघताना ग्रामीण/शहरी भाग असणे, वीज नसणे, इंटरनेट सुविधा जवळपास नसणे, यासारख्या कारणास्तव अडचणी आल्या व आपल्याला आवश्यक तो टप्पा पार करता आला नाही, यादी बघता आली नाही तर त्यासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

**(आ) ऑनलाईन प्रवेशअर्ज भरण्यासाठीची प्रत्यक्ष प्रक्रिया**

(१) सर्वप्रथम विद्यापीठाच्या होमपेजवर पोहोचा. ह्यासाठी **http://www.ycmou.ac.in,** **http://ycmou.digitaluniversity.ac** या वेबसाईटचा वापर करा. या होमपेजच्या डाव्या भागात 'Main Menu' या शीर्षकाखाली 'बी.एड. प्रवेश २०१६-१८' या लिंकवर क्लिक करा.

(२) बी.एड.च्या पानावर तुम्ही पोहोचाल. या पानावर 'Ádmission' हे शीर्षक दिसेल. प्रवेशासंबंधीच्या सर्व सूचना याच पानावरून दिल्या जाणार आहेत.

आतापर्यंतचे लिंकिंग
विद्यापीठ होमपेज ⟶ Main Menu →
बी.एड. प्रवेश २०१६-१८ ↵
↳ Admissions

(३) 'Admission' या शीर्षकाखाली 'बी.एड. प्रवेश 2016-18' या मजकुरावर क्लिक करा. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या पानावर आपण पोहोचाल.

(४) या पानावर मध्यभागी निळ्या चौकोनात `Register Online' असे लिहिलेले असेल.

(५) या पानावर आपल्याला पुढील सूचना (Instructions) दिसतील.

■ To apply, you would have to first fill up the following on-line registration form.

अर्ज करण्यासाठी आधी आपल्याला पुढे दिलेला ऑनलाईन नोंदणी अर्ज भरावा लागेल.

↓

■ After registration, your own login ID and your own password is generated.

नोंदणीनंतर आपला स्वतःचा लॉग-इन आय.डी. व आपला स्वतःचा परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार होईल.

↓

■ Using your own login ID and your password, you can apply online.

आपले स्वतःचे लॉग-इन आय.डी. व आपला स्वतःचा पासवर्ड वापरून आपण ऑनलाईन अर्ज भरू शकता.

(६) सर्व सूचना वाचून झाल्यावर आपण 'Register Online' या बटनावर क्लिक करा. संगणक आपल्याला पुढच्या काही सूचना देणाऱ्या 'Online Registration Terms and Conditions' या शीर्षकाच्या पानावर घेऊन जाईल.

(७) 'Terms and Conditions' या पानावर बी.एड. प्रवेशासाठी एकत्रित केल्या जाणाऱ्या माहितीच्या वापराबद्दल काही अटी असतील. त्या वाचून समजून घ्या. सूचना काळजीपूर्वक वाचून समजून घेतल्यावर या सूचनांच्या तळाशी असणाऱ्या 'Accept' या बटनावर क्लिक करा.

**बी.एड. प्रवेशासाठीचा ऑनलाईन प्रवेश अर्जात माहिती भरण्याचा ओघतक्ता खालीलप्रमाणे –**

उमेदवाराची ऑनलाईन नोंदणी → उमेदवाराला पुढील माहिती प्राप्त → लॉगइन आय.डी. → पासवर्ड → प्राप्त लॉगइन आयडी व पासवर्ड वापरून अर्ज भरणे.

- आपली अर्हता तपासणे (Check your Eligibility)
- वैयक्तिक माहिती (Personal Details)
- प्रवेश प्रकार तपशील (Admission Category Details)
- शैक्षणिक अर्हता (Educational Qualifications)
- विशेष राखीव जागांचा तपशील (Social Reservation Details)

(८) ऑनलाईन अर्ज भरण्यासाठीची प्रत्यक्ष नोंदणी करण्याआधी तुमच्याकडे आवश्यक अर्हता आहेत की नाही हे 'Check your eligibility' (तुमच्या अर्हता तपासून बघा) या पानावर तपासले जाईल. यात एकूण चार प्रश्न आहेत.

- आपण आपली पदवी पूर्ण केली आहे का ?
- आपण पूर्ण वेळ पद्धतीने डिप्लोमा इन एज्युकेशन किंवा डिप्लोमा इन टीचर एज्युकेशन (नियमित डी.एड.) पूर्ण केला आहे का ?
- सध्या आपण प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून सेवेत आहात का?
- आपल्याला ३०.४.२०१६ पर्यंत किमान एकूण २ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे का ?

या चारही प्रश्नांसाठी केवळ 'होय' व 'नाही' असेच पर्याय आहेत. यापैकी कोणत्याही अर्हतेसाठी आपण 'नाही' हा पर्याय निवडलात तर संगणक आपल्याला अर्जाचा पुढील भाग उपलब्ध करून देणार नाही. अर्थातच उपरोक्त यादीपैकी एखादी जरी अर्हता आपल्याकडे नसेल तर आपण यावर्षीचा बी.एड.चा अर्ज भरायला पात्र नाही.

अर्हतेबाबतच्या प्रश्नांची उत्तरे देऊन झाली की तळाशी असणाऱ्या 'Proceed' या बटनावर क्लिक करा.

(९) इथे तुम्ही यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आधी विद्यार्थी असाल, कोणताही शिक्षणक्रम येथून पूर्ण केला असेल

तर त्याच्या कायम नोंदणी क्रमांकाची (PRN) विचारणा केली जाते. सदरचा कायम नोंदणी क्रमांक १६ अंकी संख्येच्या रूपातच असणे गरजेचे आहे. जर आपली मुक्त विद्यापीठातील नोंदणी २००८ सालानंतर असेल तरच असा क्रमांक आपल्याकडे असेल. यापूर्वीच्या पद्धतीप्रमाणे असा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नव्हता. आपल्याकडे असा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तरच 'होय' या बटनावर क्लिक करा. जर आपण कधीच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी असाल नसाल किंवा २००७ पूर्वी या मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी असला तर 'नाही' या बटनावर क्लिक करा.

(१०) जर आपण 'होय' या बटनावर क्लिक केलेत तर, संगणक आपल्याला हा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक विचारेल. दिलेल्या आयतात हा क्रमांक भरा. 'Save and Proceed' या बटनावर क्लिक करा. तुम्ही 'Registration Details' या पानावर पोहोचाल.

(११) जर आपण आपला १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक भरला असेल तर या 'नोंदणी तपशिला'च्या पानावर काही माहिती आधीपासूनच भरलेली आहे असे आपल्या लक्षात येईल. उदाहरणार्थ, आडनाव, नाव, मधले नाव, जन्मतारीख, पत्ता व त्याचे तपशील व भ्रमणध्वनी क्रमांक. यापैकी आपले आडनाव, नाव, मधले नाव व जन्मतारीख हे तपशील आपल्याला बदलता येणार नाहीत. आपला पत्ता व त्याचे तपशील तसेच भ्रमणध्वनी क्रमांक यामध्ये मात्र आपल्याला बदल करायचे असल्यास त्याची मुभा दिलेली आहे.

(१२) आपण १६ अंकी कायम नोंदणी क्रमांकास 'नाही' असे उत्तर दिलेले असल्यास मात्र आपल्यासमोर 'नोंदणी तपशिला'साठी पूर्णतः कोरे पान येईल. त्यात माहिती कशी भरावी हे पुढे दिले आहे.

(१३) प्रत्यक्ष अर्ज कसा दिसेल हे या माहितीपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर दिले आहे. यातील एकेका मुद्द्याबाबत आपण आता माहिती करून घेऊ. ऑनलाईन अर्जातील मुद्द्यांची माहिती १३.१ ते २४.३४ मध्ये देण्यात आलेली आहे.

१३.१ **Name of the candidate (अर्जदाराचे नाव):** या ठिकाणी आपल्याला तीन लांबट आयत दिसतील. त्यामध्ये पहिल्या आयतात आपले आडनाव, दुसऱ्या आयतात आपले नाव आणि तिसऱ्या आयतात आपले मधले नाव (वडिलांचे/पतीचे) लिहावे. ही तीनही नावे लिहिताना आपण आद्याक्षरांचा (initials ) वापर करू नये. पूर्ण नाव लिहावे. उदाहरणार्थ,

| | | | |
|---|---|---|---|
| असे लिहावे – | Palavi | Parashram | Savaliram |
| | (आडनाव) | (स्वतःचे नाव) | (वडिलांचे नाव) |
| असे लिहू नये – | Palavi | P | S |
| | (आडनाव) | (स्वतःचे नाव) | (वडिलांचे नाव) |

थोडक्यात केवळ आद्याक्षरांचा वापर करून नाव न लिहिता पूर्ण नाव लिहावे.

या तीनही आयतांमध्ये माहिती भरताना आपल्याला लक्षात येईल की आपण जरी माहिती छोट्या लिपीत (Small letters) भरत गेलात तरी संगणकात मात्र ती मोठ्या लिपीतच (Capital letters) टाईप होईल. तसेच या आयतांमध्ये तुम्हाला केवळ अक्षरेच भरायला परवानगी आहे. आकडे भरण्याचा प्रयत्न केलात तर संगणक पुढील माहिती स्वीकारणार नाही. त्याचप्रमाणे आडनाव भरल्याशिवाय आपल्याला स्वतःचे नाव भरता येणार नाही, आणि मधले नाव भरल्यानंतरच पुढचा मुद्दा भरण्यास संगणक परवानगी देईल.

आपल्यापैकी काही जणांमध्ये आडनाव नसते. जर आपण या प्रकारात मोडत असाल तर आपण आडनावासाठीच्या आयतात MS/MRS/MR/SMT/DR यांपैकी काही भरावे व उर्वरित दोन आयतांमध्ये आपले स्वतःचे व मधले नाव भरावे. **आपल्यापैकी काही जणांमध्ये आडनाव नसते, परंतु नावामध्ये एकूण चार शब्द असतात त्यांनी वरीलप्रमाणे पहिल्या (आडनावाच्या) आयतात MS/MRS/MR/SMT/DR यांपैकी शब्द लिहावा.** आपल्या नावातील चार शब्दांपैकी दोन-दोन शब्द प्रत्येकी स्वतःचे नाव व आडनाव या आयतांमध्ये भरावे. एका आयतात एकापेक्षा अधिक शब्द भरताना मध्ये जागा सोडता येणार नाही. संगणक तशी परवानगी देणार नाही. त्यामुळे हे दोनही शब्द जोडून लिहावे लागतील, याची कृपया नोंद घ्यावी.

१३.२ **Date of Birth (जन्मतारीख)**

जन्मतारीख भरण्यासाठी एक रिकामा आयत आहे. त्याच्याच बाजूला अगदी बारीक चौकोन असणारी सारणी आहे. या सारणीवर दोनदा लागोपाठ क्लिक करा. एक छोटीशी खिडकीसमोर उघडली जाईल. यातून महिना निवडा, वर्ष ~~२०१०~~ दिसत असेल ते पुसून योग्य ते वर्ष भरा, तारीख निवडा. याप्रमाणे शेवटी तारीख निवडून त्यावर दोनदा लागोपाठ क्लिक केल्यावर Date of Birth समोरच्या आयतात तुमची जन्मतारीख दिसू लागेल. या अर्जात जिथेजिथे तारीख भरायची आहे त्या प्रत्येक ठिकाणी याच पद्धतीचा (ड्राप डाऊन पद्धती) अवलंब केलेला आहे. (जन्मतारखेचा दाखला मुलाखतीच्या वेळेस आणणे अत्यावश्यक आहे.) अस्तित्वात नसलेल्या तारखा (उदा. ३१.२.१९७०) भरण्याची परवानगी संगणक देणार नाही. तसेच आपण जन्मतारीख भरल्याशिवाय पुढील माहिती भरण्याची परवानगी संगणक देणार नाही.

१३.३ **Centre Name (अभ्यासकेंद्राचा जिल्हा) व**

१३.४ **District code of Centre (अभ्यासकेंद्राचा संकेतांक):**

या मुद्द्यांतर्गत आपल्याला आपण अर्ज भरत असणाऱ्या अभ्यासकेंद्राचा

| विभाग व जिल्हा | जिल्हा संकेतांक | विभाग व जिल्हा | जिल्हा संकेतांक | विभाग व जिल्हा | जिल्हा संकेतांक |
|---|---|---|---|---|---|
| **अमरावती** | | **औरंगाबाद** | | **मुंबई** | |
| अकोला | ११ | औरंगाबाद | २१ | **मुंबई–१ (चेंबूर)** | ३१ |
| अमरावती | १२ | बीड (अंबाजोगाई) | २२ | रायगड (पनवेल) | ३२ |
| बुलढाणा | १३ | जालना | २३ | ठाणे (उल्हासनगर) | ३५ |
| यवतमाळ | १४ | उस्मानाबाद | २६ | **मुंबई–२ (धोबीतलाव)** | ३६ |
| वाशिम | १५ | | | | |
| **नागपूर** | | **नाशिक** | | **पुणे** | |
| भंडारा | ४१ | अहमदनगर | ५१ | पुणे | ६२ |
| चंद्रपूर | ४२ | धुळे | ५२ | सातारा | ६४ |
| गडचिरोली | ४३ | जळगाव | ५३ | सोलापूर | ६५ |
| नागपूर | ४४ | नाशिक | ५४ | | |
| वर्धा | ४५ | नंदुरबार | ५५ | | |
| गोंदिया | ४६ | | | | |
| **कोल्हापूर** | | **नांदेड** | | | |
| कोल्हापूर (गारगोटी) | ७१ | लातूर (शिरुरताजबंद) | ८४ | प्रयोगशील शाळा | ९१ |
| सांगली | ७२ | नांदेड | ८५ | | |
| रत्नागिरी | ७३ | परभणी | ८७ | | |
| सिंधुदुर्ग | ७४ | हिंगोली (कळमनुरी) | ८८ | | |
| गोवा | ७५ | | | | |
| बेळगाव | ७६ | | | | |
| बिदर | ७७ | | | | |

जिल्हा (अर्थात आपली प्राथमिक शाळा ज्या जिल्ह्यात आहे तो जिल्हा) नोंदवायचा आहे. यासाठी Centre Name या शीर्षकासमोरच्या आयताचा वापर करा. या आयताच्या जोडूनच एक बाण ( V ) दर्शवलेला आहे. या बाणावर क्लिक केल्यावर आपल्यासमोर गावासह केंद्रांच्या जिल्ह्यांची यादी येईल. ही यादी इंग्रजी आद्याक्षरांप्रमाणे अकारविल्हे दिसेल, आकड्यांच्या क्रमानुसार नाही. त्यातून आपण नोकरी करत असलेल्या शाळेच्या जिल्ह्याचे नाव निवडा. यासाठी त्या नावावर क्लिक करा. गावासह केंद्राच्या जिल्ह्याचे नाव आपोआपच निवडले जाईल. जिल्हा संकेतांक निवडताना चूक करू नये. कारण प्रवेश गुणवत्ता याद्या जिल्हावार असतात. प्रत्यक्ष प्रवेशाचे वेळी आपण जिल्हा चुकीचा नोंदविल्याचे लक्षात आल्यास आपला प्रवेश नाकारला जाईल आणि त्यास पूर्णतः आपण जबाबदार असाल.

अभ्यासकेंद्राचा संकेतांक आपण स्वतः भरण्याची किंवा निवडण्याची गरज नाही. मुद्दा क्र.१३.४ मध्ये तुम्ही गावासह केंद्राचा जिल्हा निवडलात की आपोआप त्याचा संकेतांक निवडला जाईल. त्यामुळे या मुद्याची आपण काळजी करू नका. पुढील सारणीत गावासह जिल्ह्यांची यादी दिलेली आहे. त्याचे अवलोकन करा.

मुंबई विभागातील अर्जदारांनी अर्ज भरतांना मुंबई विभागातील चार अभ्यासकेंद्रांपैकी एकाच अभ्यासकेंद्रासाठी अर्ज भरावा. एकापेक्षा जास्त केंद्रातून अर्ज प्राप्त झाल्यास इतर जिल्ह्यांप्रमाणेच आपला अर्ज प्रवेशप्रक्रियेतून बाजूला काढला जाईल व प्रवेशासाठी आपल्या अर्जाचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी. एकापेक्षा जास्त केंद्रांवर अर्ज भरण्याचा प्रयत्न करू नये. असे घडल्यास संगणक आपला अर्ज स्वीकारणार नाही.

१३.५ **Postal Address (पूर्ण पत्ता)**

आपला पूर्ण पत्ता लिहिण्यासाठी एकूण चार आयतांची सुविधा केलेली आहे. यांपैकी आपण किमान तीन आयतांचा वापर पत्ता लिहिण्यासाठी केलाच पाहिजे. तीन आयतांचा वापर केल्याशिवाय संगणक आपला अर्ज स्वीकारणार नाही. आपला पत्ता विस्तृतपणे, पत्र विनासायास पोहोचेल अशा पद्धतीने लिहा. पत्त्यांच्या आयतांमध्ये अक्षरे, अंक, स्वल्पविराम, तिरपी रेषा (/), आडवी रेषा (-) अशा सर्वांचा वापर करण्याची पूर्ण परवानगी आहे. **परंतु पत्त्यासाठी कोणत्याही आयतात पुढील चिन्हे वापरण्याची परवानगी नाही, कृपया नोंद घ्यावी – एकेरी व दुहेरी अवतरण चिन्हे, &, सर्व प्रकारचे कंस, Underscore या चिन्हांचा वापर केल्यास आपला अर्ज "Submit" होणार नाही.** येथेदेखील संपूर्ण तपशील मोठ्या लिपीतच आपोआप भरला जाईल असे आपल्या लक्षात येईल. तसेच एका ओळीत अंक, अक्षरे, इतर खुणा व मधल्या मोकळ्या जागा मिळून ४० पर्यंतच जागांचा (Characters) वापर करता येईल. त्यामुळे एका ओळीत (आयतात) एखादा शब्द अर्धवट येत असेल तर तो की-बोर्डवरील बॅकस्पेस किंवा डिलिटचे बटन वापरून नवीन ओळीत (आयतात) पुन्हा टाईप करा. उदा. Rajawadi नावापैकी Raja हा भाग लिहून झाल्यावर त्या आयताची ४० जागांची क्षमता संपली तर त्यानंतर wadi ही बटने दाबूनही काहीच टाईप होणार नाही. अशा वेळेस Raja हा भाग बॅकस्पेस

किंवा डिलिटच्या साहाय्याने पुसून Rajawadi हा पूर्ण शब्द खालच्या आयतात टाईप करा.

**१३.६ व १३.७ District Code & District Name (जिल्हा संकेतांक व जिल्ह्याचे नाव) :**

हा पत्त्यातलाच भाग आहे. आपल्या पत्त्याच्या संगणकीय नोंदणीसाठी केलेली ती सोय आहे. पिनकोडचा व या District Code चा काहीही संबंध नाही. District Code च्या बाजूला असणाऱ्या बाणावर क्लिक करा. आपण ज्या जिल्ह्यात राहत असाल त्यानुसार जिल्हा संकेतांक निवडा. आपोआप जिल्ह्याचे नाव District Name मध्ये उमटेल. यासाठी पुढील सारणीचा वापर करा.

**जिल्हा संकेतांक सारणी**

| *जिल्हा* | *जिल्हा संकेतांक* |
|---|---|
| अकोला | ११ |
| अमरावती | १२ |
| बुलढाणा | १३ |
| यवतमाळ | १४ |
| वाशिम | १५ |
| भंडारा | ४१ |
| चंद्रपूर | ४२ |
| गडचिरोली | ४३ |
| नागपूर | ४४ |
| वर्धा | ४५ |
| गोंदिया | ४६ |
| सिंधुदुर्ग | ७४ |
| कोल्हापूर | ७१ |
| सांगली | ७२ |
| रत्नागिरी | ७३ |
| औरंगाबाद | २१ |
| बीड | २२ |
| जालना | २३ |
| उस्मानाबाद | २६ |
| अहमदनगर | ५१ |
| धुळे | ५२ |
| जळगाव | ५३ |
| नाशिक | ५४ |
| नंदुरबार | ५५ |
| लातूर | ८४ |
| नांदेड | ८५ |
| परभणी | ८७ |
| हिंगोली | ८८ |
| मुंबई | ३१ |
| रायगड | ३२ |
| ठाणे | ३५ |
| पुणे | ६२ |
| सातारा | ६४ |
| सोलापूर | ६५ |
| इतर | ९९ |

जिल्ह्यांची यादी ऑनलाईन अर्जात आकड्यांप्रमाणे नसून 'आकारविल्हे' आहे याची नोंद घ्यावी.

जर आपण महाराष्ट्राबाहेरील जिल्ह्यात राहत असाल तर ९९ हा Others साठी असणारा पर्याय निवडा. ९९ हा पर्याय निवडलात तर District Name च्या शेजारी असणाऱ्या रिकाम्या आयतात आपल्या जिल्ह्याचे नाव भरण्याची परवानगी संगणक देईल. याही आयतात आपल्याला केवळ अक्षरे भरावयाची परवानगी संगणक देईल. आपण भरलेली अक्षरे आपोआपच मोठ्या लिपीत (Capital) मध्ये येतील.

**१३.८ Pincode (पिनकोड)**

पिनकोडसाठी असणाऱ्या चौकोनात पिनकोड लिहा. यात मध्ये जागा न सोडता सहाही अंक लिहा. या चौकोनात सहापेक्षा जास्त आकडे लिहिता येणार नाहीत. तसेच पिनकोडसाठी सहा आकड्यांचा वापर केल्याशिवाय संगणक आपल्याला पुढील माहिती भरण्याची परवानगी देणार नाही.

**लक्षात ठेवा**

मुद्दा क्र. १३.६ व १३.७ मधील जिल्हा संकेतांकासाठी या पुस्तिकेतील जिल्हा संकेतांक सारणीचा वापर करावा. घरचा पत्ता लिहिताना पुढील चिन्हांचा वापर करू नये. अन्यथा आपला अर्ज सादर होणार नाही.

- एकेरी अवतरण चिन्ह
- सर्व प्रकारचे कंस
- दुहेरी अवतरण चिन्ह
- Underscore
- & चे चिन्ह

**१३.९ Mobile No. (भ्रमणध्वनी क्रमांक)**

याच्या समोरच्या आयतात आपला भ्रमणध्वनी असल्यास त्याचा क्रमांक लिहा. भ्रमणध्वनी असणे अनिवार्य आहे. जर आपला स्वतःचा मोबाईल नसेल तर जी व्यक्ती तुम्हाला निश्चितपणे माहिती देईल अशा व्यक्तीचा मोबाईल क्रमांक द्यावा. भ्रमणध्वनी क्रमांक भरल्याशिवाय संगणक आपल्याला पुढे जाऊ देणार नाही. तसेच या भ्रमणध्वनी क्रमांकावर 'Do Not Disturb (DND)' कार्यरत असू नये. जर आपला भ्रमणध्वनी DND अंतर्गत नोंदवलेला असेल तर आपल्याला पासवर्ड, इत्यादी माहिती मिळणार नाही, आणि त्यासाठी विद्यापीठ जबाबदार नसेल.

**१३.१० E-mail ID (ई-मेल पत्ता)**

याच्या समोरच्या आयतात आपला ई-मेल पत्ता लिहा. ई-मेल पत्ता असणे अनिवार्य नाही. त्यामुळे तुमच्यापैकी ज्यांचा ई-मेल पत्ता असेल त्यांनाच तो भरता येईल. परंतु आपला ई-मेल दिल्यास ते संपर्काच्या दृष्टिकोनातून उपयोगाचे असेल.

१३.११ **Telephone No. (दूरध्वनी क्रमांक)**

येथे एस.टी.डी. कोडसह आपला दूरध्वनी क्रमांक भरावा.

(१४) या टप्प्यावर 'नोंदणी'साठी आवश्यक असणारी सर्व माहिती भरून झाल्यानंतर तळाशी असणाऱ्या 'Save and Proceed' या बटनावर क्लिक करा. आपण 'Verify One Time Password' या पानावर पोहोचाल. आपल्याला आपल्या भ्रमणध्वनीवर 'एकदाच वापरायचा सांकेतिक शब्दाचा' संदेश आलेला असेल. हा संदेश लगेचच येतो. परंतु काही वेळा १५ मिनिटांपर्यंत कालावधी लागतो.

(१५) आपल्या भ्रमणध्वनीवरून ह्या संदेशातून तो सांकेतिक शब्द 'Verify One Time Password' या पानावरील आयतात टाईप करा. यानंतर 'Verify OTP' या बटनावर क्लिक करा.

(१६) तुमची नोंदणी पूर्ण झाल्याचा संदेश दाखवणारे पान समोर येईल. त्याचबरोबरीने आपला लॉग-इन आय.डी. व पासवर्ड ही पडद्यावर दिसेल. आपण ई-मेल पत्ता आणि/किंवा भ्रमणध्वनी दिला असेल तर त्यावरही नोंदणी पूर्ण झाल्याचा व लॉग-इन आय.डी. व पासवर्ड सांगणारा संदेश येईल. ऑनलाईन अर्जासाठी नोंदणी पूर्ण केली की साधारणपणे १० मिनिटांत हा संदेश ई-मेल आणि/ किंवा भ्रमणध्वनीवर पोहोचतो. लॉग-इन आय.डी. व पासवर्ड ही माहिती नीट सांभाळून ठेवा. शक्य झाल्यास प्रिंट काढा, कारण तिचा वापर पुढे करावयाचा आहे.

(१७) याच पानावर खाली असणाऱ्या 'Print' या बटनावर क्लिक करून या पानाची (आणि अर्थात या महत्त्वाच्या माहितीची) छापील प्रतदेखील घेऊन ठेवू शकता. या माहितीचा वापर करून उर्वरित अर्ज लगेचच किंवा नंतरही भरू शकता.

(१८) पानाच्या तळाशी असणाऱ्या 'Proceed to Complete Your Application' या बटनावर क्लिक करा. 'Login' या पानावर आपण पोहचाल.

(१९) या पानाच्या मध्यावर लॉग-इन आय.डी. व पासवर्ड भरण्यासाठी रिकामे टेक्स्ट-बॉक्सेस आहेत. तिथे ही माहिती भरा. (किंवा कॉपी-पेस्टने देखील ही माहिती भरू शकता.) त्यानंतर त्यांच्याच खाली असणाऱ्या 'Login' या बटनावर क्लिक करा.

(२०) आपण Instructions to Fill the Application Form वर पोहोचाल. येथून आपल्या ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात होते. त्याआधी एक सूचना दिसते.

**हा अर्ज भरण्यापूर्वी पुढील माहिती आपल्याकडे असल्याची खात्री करून घ्या.**

- **आपल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील - पदवी/ पदव्युत्तर पदवी/ पदविकेचे नाव, प्राप्त वर्ग, गुणांची टक्केवारी, उत्तीर्णतेचे वर्ष व महिना.**
- **आपल्या अध्यापन अनुभव वर्षांचा तपशील.**
- **राखीव जागेतून असाल तर जातीचे प्रमाणपत्र व आवश्यक्ते-नुसार नॉन क्रिमीलेयर व जात वैधता प्रमाणपत्र मिळाल्याची किंवा त्यासाठी अर्ज केल्याची तारीख (लागू असल्यास).**
- **पदवीदान वेतनश्रेणीची तारीख (लागू असल्यास)**
- **डिप्लोमा इन एज्युकेशन (डी.एड.)/ डिप्लोमा इन टीचर एज्युकेशन (डी.टी.एड.) तपशील.**
- **आपल्या छायाचित्राची व सहीची स्कॅन केलेली प्रत**

ही पूर्वतयारी करून नंतरच प्रवेश अर्ज भरावा.

(२१) या पानाच्या डाव्या बाजूला असणाऱ्या 'Fill/Edit Application Form' या बटनावर क्लिक करा. 'Personal Details' या पानावर आपण पोहोचाल. येथे पुढील माहिती भरा.

२१.१६ **Gender (लिंग)**

या ठिकाणीही पुरुष असाल तर Male, स्त्री असाल तर Female व Transgender असाल तर तसा पर्याय छोट्या बाणांच्या मदतीने निवडा. ही माहिती भरल्याशिवाय संगणक तुम्हाला पुढे जाऊ देत नाही.

२१.१७ **Category (प्रवर्ग)**

अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती (VJ -A), भटक्या जमाती (NT-B, NT-C, NT-D), विशेष मागास प्रवर्ग (SBC), इतर मागास (OBC) व खुला (Open) अशा प्रवर्गांच्या यादीतून आपण ज्या प्रवर्गात मोडता त्याची निवड करा. यापैकी जर आपण ST या प्रवर्गात मोडत असाल तर आपल्याला जातवैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) मिळाल्याची तारीख तिथेच भरणे आवश्यक आहेत. त्यामुळे आपण ST हा प्रवर्ग निवडल्या-बरोबर लगेचच तिथे ही तारीख भरण्याची सोय उपलब्ध होते. जन्मतारखे-प्रमाणेच सदर प्रमाणपत्र आपल्याला कधी मिळाले याची तारीख भरावी, जातवैधता प्रमाणपत्राच्या वरच्या उजव्या भागात ही तारीख असते. आपण जर ST प्रवर्गात मोडत असाल आणि Caste Validity Certificate नसल्या-मुळे किंवा अन्य कारणांमुळे ही तारीख जर भरली गेली नाही तर आपल्याला या प्रवर्गाचा फायदा मिळणार नाही व आपला अर्ज खुल्या प्रवर्गात धरला जाईल, व त्या बाबतीत आपल्याला प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गाचे नियम लागू होतील. ह्याबद्दल नंतर कोणतीही तक्रार करता येणार नाही. अर्ज भरताना प्रवर्ग न भरल्यास संगणक आपला अर्ज स्वीकारणार नाही. त्याचप्रमाणे जर आपण VJ-A, NT-B, NT-C, NT-D, OBC किंवा SBC यापैकी पर्यायाची निवड केलीत तर संगणक आपल्याला 'ना सायस्तर प्रमाणपत्र' मिळाल्याची तारीख विचारेल. **२०१६-१८च्या प्रवेशासाठी संगणक एप्रिल १, २०१५ पूर्वीची तारीख स्वीकारणार नाही. जर आपण 'ना सायस्तर प्रमाणपत्र' मिळविले नसेल तर त्यासाठी अर्ज करा** व त्याच्या पावतीची तारीख भरा. जर ऑनलाईन अर्जाच्या छापील प्रतीवरची तारीख आणि प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याची तारीख किंवा प्रमाणपत्रावरची तारीख एकच नसेल तर 'खोटी माहिती भरली' म्हणून आपला अर्ज

प्रवेशप्रक्रियेतून बाद होऊ शकेल. जर आपण OBC, VJ NT असूनही ना सायस्तर प्रमाण-पत्राची तारीख भरली नाहीत, तर आपल्याला OPEN प्रवर्गात गणले जाईल व खुल्या प्रवर्गाचे सर्व नियम आपल्याला लागू राहतील. ST प्रवर्गातील नियमांप्रमाणेच आपण सदर प्रमाणपत्र मिळाल्याची तारीख भरावी. प्रवेशाच्या वेळी आपल्याकडे 'ना सायस्तर' प्रमाणपत्र असणे अत्यावश्यक असेल. आपल्याला वाढीव मुदत दिली जाणार नाही.

या नंतर तळाशी असणाऱ्या 'Save and Proceed' या बटनावर क्लिक करा.

(२२) तुमच्या अध्यापनाविषयी माहिती विचारणाऱ्या पानावर पोहोचाल.

२२.१८ **Presently in-service Teacher in Elementary Education ? (सध्या आपण प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून सेवेत आहात काय ?)**
सध्या आपण सेवेत असाल तर Yes आणि सेवेत नसाल तर No हा पर्याय निवडा. आपण No हा पर्याय निवडलात तर संगणक आपला अर्ज स्वीकारणार नाही. आपला वेळ व श्रम वाया जाऊ नये म्हणून ही सोय केलेली आहे.

२२.१९ **आपल्याला पदवीधर वेतनश्रेणी मिळते का ? :**
आपण प्राथमिक शिक्षक असाल तर आपल्याला पदवीनंतर देण्यात येणारी पदवीधर वेतनश्रेणी (Scale after Graduation) लागू झाली आहे का असा पुढचा प्रश्न संगणक विचारतो. जर नसेल तर 'NO' हा पर्याय निवडा. **जर आपल्याकडे 'पाच/सात वर्षांत बी.एड. पूर्ण करणे अनिवार्य आहे' असे पत्र असेल तरच 'YES' हा पर्याय निवडा.** (आपण जर दोन्हीपैकी काहीच निवडले नाही तर आपल्याला पदवीधर वेतनश्रेणी लागू झालेली नाही असे गृहीत धरले जाईल याची नोंद घ्या.) जर तुम्ही 'YES' हा पर्याय निवडला तर ही पदवीधर वेतनश्रेणी लागू होण्याची तारीख संगणक आपल्याला विचारेल. परत एकदा तारीख भरण्याच्या सुविधेतील पर्यायांचा वापर करून ही तारीख लिहू शकाल. ही तारीख भरली नसेल तर पदवीधर वेतनश्रेणीचा फायदा आपल्याला मिळणार नाही. शिक्षक प्रकारांतून एका पर्यायाची निवड केल्याशिवाय संगणक आपल्याला पुढील माहिती भरू देणार नाही.

२२.२० **Total Experience upto 30.04.2015 (yy/mm/dd) (३०.०४.२०१५ पर्यंतचा एकूण अनुभव)**
आपल्याला असणारा एकूण अनुभव (पूर्णवेळ+अर्धवेळ) वर्षे-महिने-दिवस यांमध्ये लिहावा. **तो अनुभव लिहिताना ३० एप्रिल २०१६** पर्यंतचा त्या शैक्षणिक वर्षाचा अनुभव विचारात घ्यावा. अर्थात त्या प्रत्येक सेवेचा पुरावा म्हणून नियुक्ती आदेश/शाळा तपासणी अहवाल किंवा सेवापुस्तिका नोंद असणे आवश्यक आहे. अनुभवाचे प्रमाणपत्र विचारात घेतले जात नाही. तेव्हा जेवढे सेवेचे पुरावे असतील तेवढीच सेवा संगणक अर्जात भरताना विचारात घ्यावी. त्यांची तपशील-वार नोंद आपल्या माहितीपुस्तिकेतील अर्जात करावी.

२२.२०.१ जर आपली सेवा केवळ पूर्णवेळ स्वरूपाची असेल तर छापील **प्रवेश-अर्जात आपण ४(अ)** मध्ये त्याचा तपशील दिलेला असेल. त्याची तळाशी बेरीज करून संगणक अर्जातही त्याचा उल्लेख करा.

२२.२०.२ जर आपली सेवा केवळ अर्धवेळ असेल तर छापील **प्रवेश-अर्जात आपण ४(आ)** मध्ये त्याचा तपशील दिलेला असेल. त्याची तळाशी बेरीज करून तिला दोनने भागा. येणारे उत्तर संगणक अर्जात भरा.

२२.२०.३ जर आपली सेवा अंशतः पूर्णवेळ व अंशतः अर्धवेळ असेल तर छापील **प्रवेश-अर्जात ४(अ) व (आ)** दोन्ही ठिकाणी त्याच्या नोंदी येतील. **४(अ)च्या** एकूण सेवाकाळात **४(आ) च्या** एकूण सेवा-काळाच्या अर्धा सेवाकाळ(दोनने भागून आलेला) मिळवा. येणारी बेरीज या मुद्द्यात भरा.)

(२३) यानंतर तळाशी असणाऱ्या 'Save Proceed' या बटनावर क्लिक करा. तुमच्या शैक्षणिक अर्हतेबाबत माहिती विचारणाऱ्या पानावर पोहोचाल.

२३.२१ **'आपण डी.एड./डी.टी.एड. पूर्ण वेळ पद्धतीने केले आहे का ?'** असा प्रश्न संगणक आपल्याला विचारेल. जर याचे उत्तर 'होय' असेल तर तो पर्याय निवडा. त्याचे गुणपत्रक प्रवेशाचेवेळी दाखवा.

२३.२२ **Graduation Type (पदवीचा प्रकार)**
यामध्ये तुमच्या पदवीचा प्रकार निवडायचा आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., यांपैकी पदवीधर असाल तर तसा पर्याय निवडा. जर आपली पदवी यापेक्षा वेगळ्या प्रकारातली असेल तर Other हा पर्याय निवडा. आपण पदवीचा प्रकार निवडल्याशिवाय संगणक आपल्याला पुढील माहिती भरू देणार नाही.

२३.२३ **Graduation Class/Grade (पदवीचा वर्ग/श्रेणी)**
आपल्याला पदवी परीक्षेत मिळालेल्या वर्ग/श्रेणीनुसार येथे योग्य त्या श्रेणीची निवड करा.

२३.२४ **Graduation Percentage (पदवी परीक्षेतील टक्केवारी)** : यानंतर संगणक आपल्याला टक्केवारी विचारेल. या ठिकाणी [00].[00] असे दोन चौकोन येतील. यातील दोन्ही चौकोनांमधली शून्ये डिलिट किंवा

बॅकस्पेसच्या बटनांच्या मदतीने काढून टाकून टक्केवारी भरा. उदा. ५०.५०. टक्केवारी भरताना जर आपण ३५ पेक्षा कमी टक्केवारी भरण्याचा प्रयत्न केलात, तर संगणक अशी माहिती स्वीकारणार नाही. त्याचप्रमाणे या चौकोनांमध्ये अंक सोडून इतर काहीही भरण्याची परवानगी संगणक देणार नाही. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना **किमान ५०% व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना किमान ४५% गुण पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षेत असल्याशिवाय आपल्या अर्जाचा विचार गुणवत्ता यादीसाठी केला जाणार नाही.** त्याचप्रमाणे जर आपण चुकीची माहिती/गुण भरले, संगणकाने जरी आपला अर्ज स्वीकारला आणि मुलाखतीसाठी जरी आपली निवड झाली तरी प्रत्यक्ष मुलाखतीदरम्यान आपले गुण कमी होतील. त्यामुळे अकारण आपला जाण्यायेण्याचा वेळ, पैसे व श्रम वाया जातील व त्याविषयी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. आपण जर पदवीची टक्केवारी भरली नाही तर आपला अर्ज 'अपूर्ण' म्हणून प्रवेश नाकारला जाईल. म्हणून अचूक टक्केवारी लिहिणे आपल्या हिताचे आहे.

जर आपल्याला पदवीधर वेतनश्रेणी लागू झाली असेल तर पदवीसाठी आपल्याला किमान टक्केवारीची अट शिथिल केली गेलेली आहे.

२३.२५ **Post Graduation Type (पदव्युत्तर पदवीचा प्रकार)** : या मुद्द्यांतर्गत तुम्हाला पदव्युत्तर पदवीबाबत माहिती नोंदवायची आहे. मूलतः Post Graduation या शीर्षकासमोर 'None' हा पर्याय दिसतो. जर आपण पदव्युत्तर पदवी संपादन केलेली नसेल तर हा शब्द तसाच राहू द्यावा. तुम्ही सरळ पुढील मुद्द्याकडे जा. जर आपण पदव्युत्तर पदवी संपादन केलेली असेल तर None च्या बाजूच्या बाणावर क्लिक करा. M.A,. M..Com., M.Sc. व Other (अन्य प्रकारची पदव्युत्तर पदवी) असे चार पर्याय असणारी यादी समोर येते. त्यातून योग्य त्या पर्यायाची निवड करा.

२३.२६ **Post Graduation Class/Grade (पदव्युत्तर पदवीतील वर्ग/श्रेणी)** :
मुद्दा क्र २३.२६ मध्ये तुम्ही M.A., M.Com., M.Sc. व Other यांपैकी पर्याय निवडल्यानंतरच हा २३.२७ क्रमांकाचा मुद्दा पडद्यावर दिसेल. या ठिकाणी तुम्हाला पदव्युत्तर पदवीला मिळालेल्या वर्ग/श्रेणीची निवड करा.

२३.२७ **Students passed from YCM Open University (य.च.म.मुक्त विद्यापीठातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी)**:
जर आपण य.च.म.मुक्त विद्यापीठातून एम.फिल., पीएच.डी./पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका तसेच विद्यापीठाचा **किमान ६ महिने कालावधीचा** प्रमाणपत्र शिक्षणक्रम यांसारखे शिक्षणक्रम पूर्ण केले नसतील तर 'None' हा पर्याय तसाच ठेवा. आपण जर उपरोक्त शिक्षणक्रम य.च.म. मुक्त विद्यापीठातून यशस्वीरित्या पूर्ण केले असतील त्या सर्व पर्यायांची (M.Phil./Ph.D., level Programmes, PG level Programme, Graduation level Programme, Diploma level Programme, Certificate level Programme of minimum 6 months duration) निवड करा. कारण आपण य.च.म. मुक्त विद्यापीठातून एकापेक्षा जास्त पातळीवरील अर्हता प्राप्त केलेल्या असतील तर त्या सर्वांना भारांश देऊन त्याचे एकत्रित भारांश प्रवेश गुणवत्ता यादीत विचारात घेण्यात येईल.

प्रत्येक प्रकारातील (पातळीवरील) एकापेक्षा जास्त शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास एकाच शिक्षणक्रमाचे गुण ग्राह्य धरण्यात येतील.

२३.२९ **य. च. म. मुक्त विद्यापीठातून प्राप्त केलेल्या अर्हता–प्राप्तीचा महिना व वर्ष** – या ठिकाणी तुमच्या गुण–पत्रिकेवर दिलेला महिना व वर्ष नोंदवा. हा तपशील प्रवेश मुलाखतीच्या वेळेस तपासून बघितला जाईल. जर ऑनलाईन अर्जातली माहिती व प्रत्यक्ष गुणपत्रिका यात फरक असेल तर य.च.म.मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून मिळणारा अतिरिक्त गुणांचा फायदा आपल्याला मिळणार नाही.

२३.२७ **Class obtained in One year Degree/ One year Diploma, whose entry qualification is graduation (मूळ पदवी ही प्रवेश पात्रता असलेली एक वर्ष कालावधीच्या पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रमात मिळालेली श्रेणी)**:
ह्या ठिकाणी आपण आपली मूळ पदवी प्राप्त केल्यानंतर त्या पदवीच्या आधारे एखादी पदविका व पदवी प्राप्त केली असेल त्याच शिक्षणक्रमाचा विचार होतो. (म्हणजेच ज्या शिक्षणक्रमाच्या **प्रवेशाची मूळ अर्हता पदवी शिक्षणक्रम पूर्ण अशी असेल त्याच शिक्षणक्रमांचा विचार ह्या सदरात येतो.)** उदा. आपण जर बारावीनंतर प्रवेश मिळणारा शिक्षणक्रम पूर्ण केला असेल आणि पदवी परीक्षाही उत्तीर्ण असाल तर या ठिकाणी त्याबाबतची माहिती भरू नका. प्रवेशअर्जात मूलतः 'None' हा पर्याय दिसतो. जर आपण मूळ पदवीनंतर कोणतीही पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण झाला नसाल तर किंवा वर उल्लेख केल्याप्रमाणे जर D.Ed. सारखी बारावीनंतर प्रवेश मिळणारी पदविका/पदवी पूर्ण केलेली असेल तर 'None' हा पर्याय तसाच राहू देत. मूळ पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका यात शालेय व्यवस्थापन पदविका, लोकसंख्या शिक्षणातील पदविका, प्रौढ शिक्षणातील पदविका, पर्यावरण शिक्षणातील पदविका यांसारख्या अर्हता यात मोडतात. जर आपण अशी अर्हता प्राप्त केलेली असेल तर या पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविकेत प्राप्त वर्गाची दिलेल्या पर्यायांतून निवड करा. एकापेक्षा जास्त पदव्या प्राप्त केलेल्या असल्यास केवळ सर्वोच्च गुण प्राप्त झालेल्या पदव्युत्तर पदवीबाबतचा येथे उल्लेख करा.

२३.२८ **Name of such One Year PG Degree/ One Year PG Diploma (पदव्युत्तर पदवीचे/ पदव्युत्तर पदविकेचे नाव)** : एक वर्ष कालावधीच्या काही पदव्युत्तर पदव्या/पदव्युत्तर पदविकांची यादी येथे दिलेली आहे. त्यापैकी आपण जी पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका प्राप्त केलेली असेल तिची निवड करा. या यादीबाहेरील अशा प्रकारची पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका असेल तर 'Other' हा पर्याय निवडा व त्याच्या समोरील टेक्स्ट बॉक्समध्ये तिचे नाव लिहा. अर्थात वरच्या मुद्द्यात आपण 'None' हा पर्याय निवडला असेल तर या ठिकाणी पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविकेचे नाव लिहिण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(२४) यानंतर या पानाच्या तळाशी असणाऱ्या 'Save Proceed' या बटनावर क्लिक करा. 'विशेष राखीव जागांच्या तपशिलाच्या' (Special Reservation Details) पानावर तुम्ही पोहोचाल.

२४.२९ **Handicappedness (अपंगत्व)**: जर आपल्याला कोणत्याही प्रकारचे शारीरिक अपंगत्व नसेल तर 'None' हा पर्याय निवडा. आपण जर शारीरिक अपंग (अल्पदृष्टी, कर्णबधिर व अस्थिव्यंग) असाल तरच या मुद्द्यातील पर्याय आपल्याला निवडायचा आहे. आपल्याला ज्या प्रकारचे अपंगत्व असेल त्यानुसार पुढीलपैकी एक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| **अल्पदृष्टी** | **Visually Impaired** |
| **कर्णबधिर** | **Hearing Impaired** |
| **अस्थिव्यंग** | **Physically Handicapped** |

२४.३० **Freedom fighter/Earthquake and Project Affected/Widow, Desserted, Divorcee (स्वातंत्र्यसैनिक/भूकंपग्रस्त/विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित)**:
जर आपल्याला यापैकी कोणताही मुद्दा लागू नसेल तर या मुद्द्यातले चौकोन रिकामेच सोडून द्या. आपण जर स्वातंत्र्यसैनिक (पती, पत्नी, पुत्र, कन्या) असाल, भूकंपग्रस्त किंवा प्रकल्पग्रस्त असाल किंवा विधवा, परित्यक्ता किंवा घटस्फोटित असाल तर आपण त्या त्या पर्यायांच्या आधी असणाऱ्या छोट्या चौकोनांमध्ये क्लिक करा. तिथे बरोबरची (✓) खूण उमटेल. आपल्याला यापैकी एकापेक्षा जास्त मुद्दे लागू होत असतील तर तितक्या सर्व प्रकारांसाठी चोकोनांमध्ये आपण क्लिक करू शकता. आपल्याला जरी एकापेक्षा जास्त मुद्दे लागू असतील तरी कोणत्याही एकाच मुद्द्याचा फायदा आपल्याला प्रवेशाच्या वेळेस मिळेल, ह्याची कृपया नोंद घ्यावी. **त्यासाठीचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर केल्याशिवाय या सुविधेचा लाभ घेता येणार नाही** याची कृपया नोंद घ्यावी.

२४.३१ **Ex-Service-Man/Military Serviceman (माजी सैनिक/आजी सैनिक)**:
जर आपल्याला यांपैकी कोणताही मुद्दा लागू नसेल तर दोन्ही चौकोन रिकामेच सोडून द्या. आपण जर माजी किंवा आजी सैनिकांचे पती, पत्नी, पुत्र किंवा कन्या असाल तर आपण त्या त्या पर्यायांच्या आधी असणाऱ्या छोट्या चौकोनांमध्ये क्लिक करा. तिथे बरोबरची (✓) खूण उमटेल. या साठीचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर केल्या-शिवाय या सुविधेचा लाभ घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(२५) यानंतर तळाशी असणाऱ्या 'Save Proceed' बटनावर क्लिक करा.

अशा प्रकारे आपली ऑनलाईन अर्जातली माहिती भरून पूर्ण झाली. वरील ३४ मुद्द्यांपैकी जे मुद्दे ✻ असे दर्शविलेले आहेत ते सर्व उपमुद्दे भरणे अनिवार्य आहे. जर यांपैकी एखादाही मुद्दा भरावयाचा बाकी राहिले तर संगणक आपल्याला तसा संदेश देईल. ती माहिती व्यवस्थित भरून पूर्ण करा. या मुद्द्यांपैकी कोणतीही माहिती भरायची राहिली तर (अपूर्ण भरलेला अर्ज म्हणून) असा अर्ज प्रवेशप्रक्रियेतून रद्द ठरवण्यात येईल व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. इतर मुद्द्यांतील तुम्हाला जेवढे मुद्दे लागू असतील तेच आपण भरा.

(२६) ही सर्व माहिती भरल्यावर तळाशी असणाऱ्या 'Save Proceed' या बटनावर क्लिक करा. आपण 'Upload Photo & Signature' या पानावर पोहोचाल.

(२७) या पानावर आपल्याला आपला स्कॅन केलेला फोटो व सही अपलोड करायचे आहेत. हा सर्व अर्ज भरताना सुरुवातीला जर आपण १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक भरलेला असेल तर या पानावर आपल्याला आपला तेव्हाचा फोटो व सही आधीपासूनच दिसत असेल. जर यात बदल झालेले असतील तर नवीन फोटो आणि / किंवा सही आपण अपलोड करू शकता. ज्यांचा असा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसेल त्यांना ह्या दोन्ही गोष्टी नव्याने अपलोड कराव्या लागतील. यासाठी या दोन्ही फाईल्स प्रत्येकी १० केबी (10 KB) पेक्षा जास्त मोठ्या नसतील याची काळजी घ्यावी लागेल. फोटोचा आकार लहान केला की हे आपल्याला जमू शकेल. आपल्याला संगणक वापराचे फार ज्ञान नसेल तर या टप्प्यावर आपल्याला तांत्रिक सहाय्याची गरज भासू शकते.

हा टप्पा पूर्ण झाला की तळाशी असणाऱ्या 'Save & Proceed' या बटनावर क्लिक करा.

(२८) आपण आतापर्यंत भरलेली सर्व माहिती आता एका पानावर एकत्रित-पणे दिसायला लागेल. प्रत्येक शीर्षकाच्या उजव्या टोकाला Edit हे चिन्ह असते. त्याचा वापर करून आपण माहितीत बदल करू शकाल. ही खूप महत्त्वाची सूचना आहे कारण आपण भरलेल्या माहितीत बदल करण्याची ही अंतिम संधी आहे. या पानाचा टप्पा पार पडल्यावर भरलेल्या माहितीत कोणतेही बदल शक्य होणार नाहीत.

(२९) या पानावर या वर्षीपासून दिलेली नवीन सोय म्हणजे आपण भरलेल्या माहितीनुसार आपले किती गुण होतात याचा तपशील इथे आपल्या समोरच दिसेल. ती योग्य आहे की नाही हे आपण या माहितीपुस्तिकेच्या पृष्ठ क्र. १२ व १३ यावर दिलेल्या गुणमोजणी करण्याच्या नियमांनुसार

तपासून पाहू शकाल. आपले एकूण गुण किती होतात हे इथेच आपल्याला स्वतःला तपासून पाहता येईल.

(३०) या पानाच्या तळाशी Self-Declaration आहे आपण भरलेली माहिती योग्य असल्याचे तुम्ही त्यातून मान्य करता. त्याच्या बाजूला असणाऱ्या चौरसात क्लिक करा. त्यात एक बरोबरची (✓) खूण उमटेल व त्याच्या खाली असणाऱ्या 'Confirm & Print' बटण activate होईल. त्यावर क्लिक करा.

(३१) 'तुम्हाला नक्की अर्ज भरून घ्यायचाय ना !' असा प्रश्न विचारणारी विन्डो समोर येईल. त्यातल्या 'OK' या पर्यायावर क्लिक करा. आपण 'Challan Details' या पानावर पोहोचाल.

आपली माहिती भरल्यावर आपण बँकेत चलनाद्वारे प्रक्रिया शुल्क भरणार आहात. हे चलनदेखील आता आपल्यासाठी ऑनलाईन पद्धतीनेच दिले जाणार आहे. यासाठी आपल्याला अभ्यासकेंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही. या चलनाची व्यवस्थितपणे छापील प्रत येण्यासाठी 'Challan Details' या पानावरील सर्व सूचना नीट वाचा व त्यांचे पालन करा. त्यानंतरच चलनाची प्रत घ्या. यासाठी तळाशी डावीकडे असणाऱ्या 'Print Challan' या बटनावर क्लिक करा.

(३२) त्यानंतर नेट बँकींगद्वारे अँक्सेस बँक किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये ऑनलाईन दिलेल्या प्रक्रियेनुसार प्रोसेसिंग शुल्क भरा.

(३३) उपरोक्त प्रक्रिया पूर्ण झाली की तळाशी असणाऱ्या 'Save & Proceed' या बटनावर क्लिक करा.

(३४) आता छापील प्रत घेण्यासाठी तुमची माहिती समोर दिसेल. यात नवीन गोष्टींची भर पडलेली असल्याची खात्री करून घ्या.

**१. वरच्या डाव्या कोपऱ्यात य.च.म.मुक्त विद्यापीठाचा लोगो दिसेल.**
**२. वरच्या उजव्या कोपऱ्यात बारकोड दिसेल.**
**३. आपला फोटो**
**४. आपली सही**
**५. तळाशी त्या दिवसाची तारीख आपोआप येईल.**
**६. तुम्हाला सही करायला एक चौकोन असेल.**

तसेच Print ची Window समोर येईल. त्या आधारे ऑनलाईन अर्जाची छापील प्रत घ्या. ही छापील प्रत घेताना आपल्या प्रिंटरचे पेज सेटिंग्स् तपासून घ्या. ते 'Portrait' या प्रकारात असणे आवश्यक आहे. तसेच ही छापील प्रत एका पानात मावणार नाही. दोन पानांची आवश्यकता असेल. तसेच छापील प्रतींसाठीचा कागद A4 आकाराचा असणे आवश्यक असेल.

अशा प्रकारे आपण कितीही वेळा आपल्या अर्जाची छापील प्रत घेऊ शकता.

या टप्प्यावर आपला ऑनलाईन अर्जासाठी माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली.

**लक्षात ठेवा**

अर्जात माहिती भरणे
↓
पडद्यावर दिसणारी माहिती तपासून बघणे ←
↓
माहिती योग्य आहे का ?
↓
होय → Declaration साठी बरोबरची खूण करणे. → 'Confirm & Submit Application Form' वर क्लिक करणे

नाही → संबंधित ठिकाणी जाऊन माहितीत बदल करणे. (→ पडद्यावर दिसणारी माहिती तपासून बघणे)

वरील ओघतक्त्यातील 'नाही' या पर्यायावर क्लिक करून तुम्ही कितीही वेळा मागे जाऊन एकाहून अधिक छापील प्रती घेऊ शकता. जरी 'नाही' या पर्यायावर क्लिक केलेत तरी आपण भरलेली माहिती मात्र बदलणे शक्य नाही. मघाशी म्हटल्याप्रमाणे ती विद्यापीठाकडे "Confirm and Submit Application Form" वर क्लिक केल्यावरच सादर झालेली आहे. परंतु 'होय' या बटनावर क्लिक केल्यावर मात्र आपल्याला छापील प्रत घेता येत नाही. त्यामुळे 'होय' बटनावर क्लिक करण्यापूर्वी तुम्ही किमान एक छापील प्रत घेतली असल्याची खात्री करून घ्या.

आपल्याला मिळालेली एक छापील प्रत छायांकित करून घ्या. मूळ प्रतीवर सही करून ती (ऑनलाईन अर्जाची मूळ प्रत) आपल्याजवळ ठेवा. छायांकित (झेरॉक्स) प्रत तुमच्याकडे संदर्भासाठी राहू द्या. या प्रती प्रवेशमुलाखतीच्या वेळेस आवश्यक असतील.

आपण भरलेला संगणकीय अर्ज आपल्याला **केवळ अवलोकनासाठी** वेबसाईटवर उपलब्ध केला जाईल. त्या माहितीत आपल्याला कोणताही बदल करता येणार नाही. ही प्रत केवळ अवलोकनासाठी व छापील प्रत घेण्यासाठीच उपलब्ध असेल याची कृपया नोंद घ्यावी. ही प्रत बघण्यासाठी यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे –

विद्यापीठ होमपेज → Admission →
B.Ed. Programme ← School of Education ↩
↳ Admission Process

या क्रमाने क्लिक करा. डाव्या बाजूच्या वरच्या कोपऱ्यात 'New Registration' ही लिंक दिसणाऱ्या 'Instructions च्या पानावर आपला पोहोचाल. या पानावरच्या लॉगइन आयडी व पासवर्ड भरा. आपला भरलेला अर्ज 'बदल न करता येण्याच्या स्वरूपात' समोर येईल. त्याची छापील प्रत आपण घेऊ शकता.

**लक्षात ठेवा**

जर आपणास वरीलपैकी संपूर्ण प्रक्रिया न करता आल्यास अगर कोणत्याही मधल्याच टप्प्यावरून अर्ज भरणे सोडून दिलेत आणि त्यामुळे आपल्याकडे छापील प्रत नसेल तर आपला अर्ज स्वीकारला जाणार नाही. छापील अर्ज व ऑनलाईन अर्जाची छापील प्रत अशी दोन्ही कागदपत्रे सादर केली जाणे अनिवार्य आहे. त्यामुळे ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या भरणे आवश्यक आहे.

## बी.एड. प्रवेशप्रक्रियेतील वेबसाईटच्या वापराचे प्रमुख टप्पे

बी.एड. प्रवेशप्रक्रिया हा अत्यंत संवेदनशील विषय असून या प्रवेशप्रक्रियेसंदर्भात प्रवेश समितीएवढेच आपण प्रवेशेच्छू विद्यार्थीही खूप जागरूक असतात. त्यामुळे या प्रवेशप्रक्रियेत पारदर्शकता आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. परिणामतः ती माहिती वेळोवेळी आपणास दर्शवण्यासाठी विद्यापीठ वेबसाईटचा वापर करते. २००७-०९ या तुकडीपासून बी.एड. प्रवेशप्रक्रियेत दोन बदल केलेले आहेत.

- ❐ छापील अर्जासोबत ऑनलाईन प्रवेश-अर्जाचा वापर
- ❐ प्रवेश मुलाखतपत्र पोस्टाने न येता वेबसाईटवरच उपलब्ध असणे.

पोस्टाच्या दिरंगाईमुळे अनेक प्रश्न निर्माण होत असल्याने विद्यापीठाने हे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे प्रवेशेच्छू अर्जदारांनी वेळोवेळी विद्याशाखेची वेबसाईट पाहूनच आपल्या प्रवेशाबाबतची माहिती प्राप्त करणे अपेक्षित आहे. ती पूर्णतः आपलीच जबाबदारी आहे. म्हणूनच वेबसाईटवरून प्रसारित होणाऱ्या सूचनांचे विशेष महत्त्व आहे.

२०१६-१८ या तुकडीपासून बी.एड. प्रवेशप्रक्रियेत पुढील बदल केलेले आहेत.

- ❐ मुक्त विद्यापीठातून आधी पूर्ण केलेल्या १६ अंकी कायम नोंदणी क्रमांकाचा व त्याच्याशी जोडलेल्या अन्य माहितीचा वापर
- ❐ प्रवेश उमेदवाराला 'एकाच वेळी वापरायच्या पासवर्ड'ची (One Time Password) उपलब्धता
- ❐ प्रवेश उमेदवाराच्या फोटो व सहीच्या तसेच चलनाच्या स्कॅन्ड प्रतींचा उपयोग
- ❐ प्रवेशप्रक्रिया प्रक्रियेत अभ्यासकेंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही.

बी.एड. प्रवेशप्रक्रियेदरम्यान वेबसाईटच्या वापराचे प्रमुख पाच टप्पे पडतात.

१. ऑनलाईन प्रवेशअर्ज भरणे.
२. प्रवेशप्रक्रिया शुल्काचा तपशील भरणे.
३. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या भरलेल्यांची यादी बघणे.
४. प्रवेश मुलाखतीची प्रथम फेरी
५. प्रवेश मुलाखतीची द्वितीय फेरी.

## टप्पा १ : ऑनलाईन प्रवेशअर्ज भरणे

ऑनलाईन प्रवेशअर्ज भरणे अनिवार्य असल्यामुळे हा टप्पा पार केल्याशिवाय आपण पुढे जाऊच शकत नाही. याबाबतची तपशीलवार माहिती आपण यापूर्वीच बघितली आहे. त्यामुळे इथे आपण केवळ सारांश रूपाने ही प्रक्रिया बघणार आहोत.

| कृती | परिणाम |
|---|---|
| (१) http://www.ycmou.ac.in किंवा http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवर पोहोचा. | तुम्ही विद्यापीठाच्या homepage वर पोहोचाल |
| (२) 'Main Menu' या शीर्षकाखालच्या 'बी.एड. प्रवेश २०१६-१८' या लिंकवर क्लिक करा. | तुम्ही बी.एड. प्रवेशाच्या पानावर पोहोचाल |
| (३) 'Admission' या शीर्षकाखाली 'बी.एड. प्रवेश २०१६-१८' या लिंकवर क्लिक करा. | Instructions च्या पानावर पोहोचाल |
| (४) प्रवेशाच्या अर्हता तपासणीच्या पानावरील माहिती भरा 'Proceed' बटनावर क्लिक करा | 'Check PRN' च्या पानावर पोहोचाल |
| (५) PRN बाबतची माहिती भरा | 'Registration Details' च्या पानावर पोहोचाल |
| (६) माहिती भरा, "Save & Proceed" वर क्लिक करा. | One Time Password येईल. |
| (७) One Time Password भरा. | Login ID व Password येतील. |
| (८) 'Apply Online या लिंकवर क्लिक करा. | प्रत्यक्ष ऑनलाईन अर्जावर पोहोचाल |
| (९) अर्ज भरा, माहिती अचूकता तपासा, दुरुस्त्या असल्यास करा. | |
| (१०) फोटो व सहीच्या स्कॅन्ड प्रती अपलोड | |

**टप्पा २ : ऑनलाईन प्रवेश अर्ज यशस्वीरित्या भरलेल्यांची यादी बघणे'**

| कृती | परिणाम |
|---|---|
| (१) http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवर पोहोचा. | तुम्ही विद्यापीठाच्या homepage वर पोहोचाल |
| (२) 'Main Menu' या शीर्षकाखालच्या 'बी.एड. प्रवेश २०१६-१८' या लिंकवर क्लिक करा. | तुम्ही बी.एड. प्रवेशाच्या पानावर पोहोचाल |
| (३) 'Admission' या शीर्षकाखाली 'Database of Candidates successfully submitting Online Admission Form' यावर क्लिक करा. | ऑनलाईन प्रवेश अर्ज यशस्वीरित्या भरलेल्या प्रवेश उमेदवारांच्या यादीपर्यंत जाण्याच्या सूचना असतील. |
| (४) सूचनांनुसार आपली माहिती तपासा<br>✤ माहिती अचूक असणे<br>✤ आपले नाव यादीत नसणे<br>✤ आपण भरलेल्यापेक्षा यादीतील माहिती वेगळी असणे | तक्रार अर्ज करणे आवश्यक आहे की नाही हे स्पष्ट होईल. |
| (४) 'Announcement about B.Ed. 2016-18 Admission' या पानावरील Format of Complaint Letter या Link वर क्लिक करा. | तक्रार अर्जाच्या नमुन्याच्या पानावर पोहोचाल. त्याचा वापर करून आपली तक्रार नोंदवा. |

**टप्पा ३ व ४ : प्रवेश गुणवत्ता यादी बघणे (प्रथम व द्वितीय फेरी)**

(१) प्रवेशासाठी तयार झालेली गुणवत्ता यादी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येते. त्यात प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे केंद्रनिहाय व प्रवेश वर्गवारीनिहाय देण्यात येतात. मुलाखतीचे पत्र, मुलाखतीचे वेळापत्रक आणि मुलाखतीच्या वेळी सोबत आणावयाच्या कागदपत्रांची यादी असते, (ज्या आधारे आपण मुलाखतीसाठी येणार असता) या सर्व बाबी वेबसाईटवरच उपलब्ध होतील.

प्रवेश- मुलाखतीचे पत्र आपल्याला पोस्टाने येणार नसल्यामुळे हा टप्पा महत्त्वाचा आहे. यासाठी पुढीलप्रमाणे कृती कराल.

| *कृती* | *परिणाम* |
|---|---|
| (१) http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवर पोहोचा. | तुम्ही विद्यापीठाच्या homepage वर पोहोचाल |
| (२) 'Main Menu' या शीर्षकाखालच्या 'बी.एड. प्रवेश २०१६-१८' या लिंकवर क्लिक करा. | आपण बी.एड. प्रवेशाच्या पानावर पोहोचाल |
| (३) आपली प्रवेश मुलाखतीसाठी निवड झाली किंवा नाही हे पाहण्यासाठी 'Admissions' शीर्षकाखाली पुढील वाक्यावर क्लिक करा. 'Kindly click here to see the centrewise lists of Candidates for first round' | केंद्रांच्या नावांच्या यादीवर पोहोचाल. |
| (४) ज्या केंद्राची यादी बघायची असेल त्या केंद्रावर क्लिक करा. | त्या केंद्राची संपूर्ण यादी समोर येईल. आपल्या उजव्या बाजूला असणाऱ्या Scroll bar च्या मदतीने संपूर्ण यादी बघा. |
| (५) 'Announcements about B.Ed. 2016-18 Admission' या पानावर Time-table, Interview letter या Links वर क्लिक करा. | आपल्याला मुलाखतीचे वेळापत्रक पाहावयास मिळेल. ते download करून त्याची Printout काढून घ्या. मुलाखतीच्या वेळी ती प्रत विद्यापीठात आणावयाची आहे. |

वेबसाईटवरून ही सर्व माहिती, सूचना प्रसारित केले जाण्याचे सर्वसाधारण वेळापत्रक पुढीलप्रमाणे असेल.

| *अ.क्र.* | *टप्पा* | *साधारणतः कालावधी* |
|---|---|---|
| २.१ | ऑनलाईन प्रवेशअर्ज भरणे | जुलै व ऑगस्ट |
| २.२ | ऑनलाईन प्रवेश अर्ज यशस्वीरित्या भरलेल्या उमेदवारांची यादी पाहणे | ऑगस्ट |
| २.३ | प्रवेश गुणवत्ता यादी :पहिली फेरी | ऑगस्ट |
| २.४ | प्रवेश गुणवत्ता यादी : दुसरी फेरी | सप्टेंबर |

या कालावधीत थोडाफार बदल होऊ शकतो. त्यामुळे निश्चित आठवडा वा बदल असल्यास त्यात्या वेळी ती माहिती आपणास वेबसाईटवर मिळू शकेल.

**बी.एड. प्रवेशप्रक्रियेत विद्यापीठाकडून एसएमएस / ई-मेलचा वापर**

बी.एड. २०१६-१८ तुकडीच्या प्रवेशप्रक्रियेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे **विद्यापीठाकडून एसएमएस आणि / किंवा ई-मेलद्वारा तुमच्याशी साधला जाणारा संपर्क.**

वर उल्लेखलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विविध टप्प्यांवर विद्यापीठाद्वारा वेबसाईटवरून माहिती प्रकाशित केली जातेच; परंतु काही वेळा काही तांत्रिक अडचणींमुळे या वेळापत्रकात बदल होतो. विशेषतः अशा प्रकारच्या परिस्थितीत आपल्यासाठी हा वैयक्तिक पातळीवर विद्यापीठाकडून साधला जाणारा संपर्क महत्त्वाचा ठरेल. पुढील सारणीत दिल्यानुसार या सर्व टप्प्यांवर विद्यापीठ तुमच्याशी एसएमएस आणि / किंवा ई-मेलद्वारा संपर्क साधेल.

अशा प्रकारे विद्यापीठाकडून जरी संपर्क साधला जाणार असला तरी या बाबतीत काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

- आपला मोबाईल क्रमांक आणि / किंवा ई-मेल पत्ता खराखुरा व अत्यंत अचूक देणे गरजेचे आहे.
- कोणत्याही तांत्रिक अडचणींमुळे आपल्याला एसएमएस आणि / किंवा ई-मेल मिळाली नाही तर कृपया त्यासंबंधी तक्रारी करू नये.
- वेबसाईटवर वेळोवेळी आवश्यक तो तपशील आणि / किंवा बदललेले वेळापत्रक प्रकाशित केले जाईल. ते बघण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
- SMS प्राप्तीनंतर वेबसाईट पाहून आपले नाव प्रवेश गुणवत्ता यादीत आहे याची खात्री करावी व नंतर वेबसाईटवर दिलेल्या सूचनांनुसार प्रवेशास उपस्थित राहावे.

**बी.एड. प्रवेशप्रक्रियेत आवश्यक संगणकीय सेवा**

जर आपल्याला संगणक, इंटरनेट यांसारख्या गोष्टींचा वापर जमत नसेल तर आपण हे ज्ञान अवगत असणाऱ्या व्यक्तीला वरील माहिती दाखवू शकता. त्या व्यक्तीला या माहितीच्या आधारे आपल्याला हवी ती माहिती काढून देणे सोईचे जाईल. हे काम आपण आपल्या घरून, शाळेतून, कार्यालयातून किंवा सायबर कॅफेतून करू शकता.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान, विशेषतः ऑनलाईन प्रवेशअर्ज भरताना आपल्याला कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्या तर आपण **विद्याशाखेला ई-मेल पाठवली तरी चालेल. विद्याशाखेचा ई-मेल पत्ता ybed2016@gmail.com असा आहे.** मात्र आपल्या ई-मेलमध्ये आपल्या अडचणीचा पूर्ण तपशील द्यावा, तरच आपल्याला मदत करणे शक्य होईल. **तसेच ही ई-मेल मराठीत/ इंग्रजीतून असावी. मराठीत मेल करणाऱ्यांनी Unicode Fond चाच वापर करावा. पत्र स्कॅन कून पाठवावे. याचीही नोंद घ्या.** मराठीतून वापरायच्या सॉफ्टवेअरमध्ये बरीच विविधता असल्यामुळे बऱ्याच वेळा विद्याशाखेकडे पोहोचलेली ई-मेल वाचनीय नसते. त्यामुळे इंग्रजीतूनच ई-मेल पाठविणे आपल्याला हिताचे आहे. सदर इमेल पत्र केवळ प्रवेश प्रक्रियेपुरताच मर्यादित असेल.

मित्रहो, संगणकासंदर्भातील प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान मिळवणे ही आपल्याला मिळालेली एक संधी आहे. ज्याच्या पुढील काळातही आपल्याला निश्चितच उपयोग होईल. तेव्हा वेबसाईटचा वापर कटकट म्हणून न स्वीकारता काळाची गरज म्हणून आपण स्वीकाराल असा आम्हाला विश्वास वाटतो. आपला व विद्यापीठाचाही वेळ वाचावा म्हणून माहिती संप्रेषण तंत्रविज्ञानाचा वाढता वापर विद्यापीठ करीत असते. जर आपल्याला या कार्यपद्धतीबाबत काही सूचना करायच्या असतील तर त्या लेखी स्वरूपात पत्राने किंवा ई-मेलने जरूर आमच्यापर्यंत पोहोचवा त्याचा पुढच्या तुकड्यांना फायदा होईल.

**महत्त्वाचे -**
आपण आपला वेबसाईटवरील अर्ज भरणे, तपासणे, दुरुस्त्यांसह परत सादर करणे यातील प्रमुख टप्प्यांवरील अर्जाचे स्वरूप पुढील काही पानांवर चित्रांसह दाखवलेले आहे. कृपया ते काळजीपूर्वक अभ्यासा.

## ऑनलाईन अर्ज भरत असताना येणाऱ्या अडचणींबाबत

०१. आपण ऑनलाईन अर्ज भरायला घ्याल त्या वेळेस जर वेबसाईटला भेट देणाऱ्यांची संख्या एकाच वेळेस खूप जास्त असेल तर काही वेळेस आपल्याला ऑनलाईन अर्ज उपलब्ध होणे, भरलेला अर्ज भरण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण होणे यात अडचणी येऊ शकतात. या बाबतीत किमान अडचणी याव्यात यासाठी कमी गर्दी असणाऱ्या वेळात (रात्री उशिरा किंवा पहाटे लवकर) अर्ज भरण्याची प्रक्रिया करा.

०२. समजा आज, आता अडचण येत असेल तर एखाद्या तासाने, दुसऱ्या दिवशी, काही दिवसांनी किंवा दुसऱ्या सायबर कॅफेतून प्रयत्न करा.

०३. काही तांत्रिक बिघाडामुळे वेबसाईट उघडली जात नसली तर परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक तेवढी मुदत अधिकची देण्यात येईल. याबाबतची माहिती वेबसाईटवर उपलब्ध असेल. परंतु आपला संगणक बिघडला, आपल्याला इंटरनेट-बाबत अडचणी असतील तर मात्र अशी वाढीव मुदत देय राहणार नाही.

०४. ऑनलाईन प्रवेश-अर्जाबाबत आपल्याला कोणत्याही अडचणी लेखी स्वरूपात द्यायच्या असतील तर त्या

अध्यक्ष,
बी.एड. प्रवेश समिती
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ
नाशिक - ४२२ २२२

यांच्याकडे द्याव्यात. ते आपल्या अडचणी निवारण्याकरता मार्गदर्शन करतील.

■■■■

# <u>अत्यंत महत्त्वाचे</u>

(प्रवेश अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर पुढील माहिती प्राप्तीसाठी विद्यापीठ वेबसाईट रोज पहावी.
प्रवेशार्थींची जबाबदारी असेल)

■ **बी.एड. प्रवेशप्रक्रियेत Online चा वापर**

(१) माहितीपुस्तिका डाऊनलोड करणे.

(२) Online प्रवेश-अर्ज मुदतीत भरणे.

(३) Web वर प्रसिद्ध केलेली प्रवेशेच्छू विद्यार्थ्यांची सर्वसाधारण माहिती यादी तपासणे (ऑगस्ट पहिला आठवडा)

(४) गुणवत्ता यादी पाहणे - (ऑगस्ट तिसरा आठवडा)

(५) प्रवेश मुलाखत पत्र वाचणे, डाऊनलोड करणे.

(६) प्रवेश मुलाखत वेळापत्रकानुसार विद्यापीठात हजर राहणे.

(७) Online सूचनापत्रकानुसार बी.एड. मुलाखतीसाठी दिलेल्या कागदपत्रांसह उपस्थित राहणे.

(८) Online प्रसिद्ध झालेली माहिती पुन्हा माहितीच्या अधिकारात नंतर पुरवली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**प्रवेशासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जात नाही. वर दिलेल्या सर्व सूचना पाहून त्याप्रमाणे कृती करणे ही प्रवेशेच्छू उमेदवाराचीच जबाबदारी असते.**

**प्रवेशासाठी वेबसाईट : <u>http://ycmou.digitaluniversity.ac</u>**

**ऑनलाईन प्रवेशअर्ज भरण्यातील कळीचे टप्पे व त्या वेळेस संगणकाच्या पडद्यावर दिसणाऱ्या बाबी**

०१. ऑनलाईन प्रवेशअर्जात प्रत्यक्ष माहिती भरून झाल्यावर तळाशी दिसणारे बटन

| Submit |
|---|

०२. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती दुरुस्त करण्यायोग्य अवस्था

२.१ अर्जाच्या वरील उजव्या बाजूला ( छापील अर्ज क्रमांकाच्या बाजूला) दिसणाऱ्या Serial No. (संगणकीय क्रमांक)

| Serial No. | BED 2016 ............................ |
|---|---|

येथे एक संख्या असेल.

२.२ तळाशी दिसणारे Declaration

> **Declaration :**
> All the information given in this form is true to the best of my knowledge. I accept that, if information given by me is found to be incorrect then my Registration will be cancelled and University can take legal action against me. I have read all the information minimum three times. I have also cheked and it is time to the best of my knowledge.

२.३ Declaration च्या खाली डावीकडे तुम्ही ऑनलाईन अर्ज ज्या दिवशी भरत आहात, ती तारीख

| Date : 25/07/2016 |
|---|

— उदाहरणार्थ, २५ जुलै ही तारीख

२.४ तळाशी तारखेच्या बाजूला सही करण्यासाठी आयत

| |
|---|

२.५ अगदी तळाशी असणारे दोन पर्याय

| Edit | Proceed to Print |
|---|---|

०३. 'Proceed to Print' वर क्लिक केल्यावर दिसणारे भरलेल्या माहितीचे स्वरूप

३.१ Declaration च्या खाली दिसणारे छापील वाक्य

| Your online application has been submitted successfully. |
|---|

३.२ छापील प्रत घेण्यासाठीचे तळाशी असणारे बटन

| Take a Print |
|---|

०४. वरील १ ते ३ ची पूर्तता झाल्यास आपला Online Form विद्यापीठाकडे प्राप्त झाला हे निश्चित !

०५. आता आपणास मिळालेली अर्जाची छापील प्रत व आपला मूळ प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्राकडे जमा करावा.

# परिशिष्ट – १

## जातीनिहाय आरक्षण

०१. खुल्या संवर्गातील ५० टक्के जागा व राखीव संवर्गातील ५० टक्के जागा अंतर्गत स्वतंत्रपणे खालील संवर्गातील उमेदवारांना त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे आरक्षण लागू राहील.

(अ) जिल्हा शल्यचिकित्सक यांनी प्रमाणपत्र दिलेले शारीरिक अपंग असलेले उमेदवार .................... ३ टक्के
(किमान ४० टक्के प्रमाणित केलेले)

(आ) सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (ॲक्टिव्ह सर्व्हिस) व माजी सैनिक यांच्या ..................... २ टक्के
कर्मचाऱ्यांची मुलगे/अविवाहित मुली व पती/पत्नी

०२. मागासवर्गीय उमेदवारांची त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेली साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

(अ) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती (SC) .................... १३ टक्के

(आ) अनुसूचित जमाती (ST) ........................................................................................ ७ टक्के

(इ) विमुक्त जाती (मूळ १४ व तत्सम जाती) (VJ-A) ................................................................ ३ टक्के

(ई) भटक्या जमाती (NT-B) ........................................................................................ २.५ टक्के
(जानेवारी १९९० पूर्वीच्या व २८ तत्सम जाती + नव्याने समाविष्ट केलेल्या तत्सम जाती)
गोसावी, बेलदार, भराडी, भूते चलवादी(वगळले), चित्रकथी, गारुडी, घिसाडी, गोल्ला, गोंधळी, गोपाल, हेळवे, जोशी, फासेपारधी (वगळले), कोल्हाटी, मैराळ, मसनजोगी, नंदीवाले, पांगूळ, रावळ, सिक्कलगार, ठाकर, वैदू, वासुदेव, भोई, बहुरुपी, ठेलारी, ओतारी *दि. ७ मे २००५च्या शासन निर्णयानुसार,* मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मवाले, गिहरा/गहरा, गुसाई/गोसाई, मुस्लीम मदारी, गारुडी, सापवाले व जादूगर, भारतीय इराणी, गवळी, मुस्लीम गवळी, दरवेशी, वाघवाले, शाह (मुस्लीम धर्मीय), अस्वलवाले, दि. १ मार्च २००६ शासन निर्णयानुसार लोहार व तत्सम जाती, सिक्कलगार व तत्सम जाती.

(उ) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) (NT-C) ............................................................ ३.५ टक्के
अहिर/डांगे/गढरी/तेलकर/हटकर/हाटकर/शेगर/खुटेकर/तेलंगी/तेल्लारी/
कोकणी–धनगर/कानडे/वऱ्हाडे/धनगर/झाडे/झेंडे/कुरमार/माहुरे/लाडसे/सनगर

(ऊ) भटक्या जमाती (NT-D) ........................................................................................ २ टक्के
वंजार, वंजारा आणि वंजारी

(ए) इतर मागासवर्गीय .............................................................................. १९ टक्के

**एकूण ............................................................................ ५० टक्के**

# परिशिष्ट – २

## अपंग विद्यार्थी प्रवेश कार्यपद्धती ( बी.एड.)

(१) बी.एड. शिक्षणक्रमासाठी एन.सी.टी.ई. ने एकूण १५०० जागा मान्य केल्या आहेत.

(२) अपंगासाठी नियमानुसार १५०० पैकी ३% जागा आरक्षित असतील. त्यापैकी १% जागा अल्पदृष्टी (१५ जागा ), १%जागा कर्णबधिर ( १५ जागा ), १% जागा अस्थिव्यंगांसाठी ( १५ जागा ) असतील. अपंग जागांचा स्वतंत्र कोटा नसून त्या संबंधित प्रवर्गाच्या निर्धारित आरक्षण कोट्यातूनच भरल्या जातील.

(३) बी.एड. शिक्षणक्रम प्रवेश अभ्यासकेंद्रानिहाय होतात. **प्रत्येक अभ्यासकेंद्रावर ४२ जागा असतात.** त्याचा विचार करता एका अभ्यासकेंद्रावर एका अपंगाला ( १.३५ ) प्रवेश देता येऊ शकतो.परंतु अपंगांना नियमानुसार ४५ जागा मिळाव्यात ह्या हेतूने प्रत्येक अभ्यासकेंद्रास किमान १ आणि दहा अभ्यासकेंद्रांवर जास्तीत जास्त दोन अशी त्यांची विभागणी होईल. मात्र कोणत्याही एका अभ्यासकेंद्रावर दोनपेक्षा जास्त जागा देता येणार नाहीत.

(४) अपंगांचे ३% म्हणजेच ४५ प्रवेश पूर्ण करताना सर्व प्रकारच्या अपंगांची एकत्रित गुणवत्ता यादी करण्यात येईल. त्यातुन गुणवत्तेनुसार आलेल्या अपंगांना प्रथम सरळ प्रवेश देण्यात येतील. ह्या जागा ३ % व्यतिरिक्त असतील. उर्वरित यादीतून ३% अपंगांची निवड (४५) करण्यात येईल. ( १%अस्थिव्यंग, १%अल्पदृष्टी,१% कर्णबधिर व्यंग )

(५) अल्पदृष्टी, कर्णबधिर, अस्थिव्यंगापैकी ज्या गटात कमी अर्ज असतील त्या गटाची यादी अपंग प्रवेश गुणवत्ता याद्या तयार करताना प्रथम विचारात घेण्यात येईल. त्यानंतर त्यापेक्षा जास्त अर्ज असलेल्या याद्या अनुक्रमे विचारात घेण्यात येतील. अल्पदृष्टी, कर्णबधिर गटातील अपंग पुरेशा संख्येने उपलब्ध नसतील तर त्या जागा अस्थिव्यंगाकडे संक्रमित होतील.

(६) अपंगांना प्रवेश देताना एका जिल्ह्यात जास्तीत जास्त दोनच अपंगांच्या जागा असल्याने, प्रत्येक उपगटातील जास्तीत जास्त दोनच जागा एका जिल्ह्याला देण्यात येतील. एखाद्या जिल्ह्यात दोन जागा जर एकाच गटातून भरल्या गेल्या तर उर्वरित अपंग गटांना त्या जिल्ह्यात प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.

(७) काही वेळेस अल्प दृष्टी, कर्णबधिर या प्रकारच्या प्रवेशेच्छूक अर्जाची संख्या १५ किंवा १५ पेक्षा कमी असू शकते. ते अपंग काही ठरावीक जिल्ह्यात जास्त संख्येने असतात, असे घडल्यास त्या जिल्ह्यात जास्तीत जास्त दोन अल्पदृष्टी / कर्णबधिर अपंगांना प्रवेश देता येतील. आणि इतर अपंग उपगटातील व्यक्तींचा प्रवेशासाठी विचार करता येणार नाही. त्यामुळे ज्या प्रकारातील जितक्या जागा १५ पेक्षा कमी भरल्या जातील तितक्या जागा अस्थिव्यंगांकडे वर्ग करून त्या जागा अन्य जिल्ह्यातून भरण्यात येतील.

( टीप : शासकीय परिपत्रके, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आणि नियमित बी.एड.ची महाराष्ट्र शासनाची पद्धती, मुक्त विद्यापीठाचे व एन.सी.टी.ई.चे प्रवेश नियम या सर्वांचा एकत्रित विचार करून सर्व प्रकारच्या अपंगांना जास्तीत जास्त पदांचा लाभ व्हावा व अपंगांवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठी ही कार्यपद्धती निर्धारित करण्यात आलेली आहे. त्यातूनही काही त्रुटी लक्षात आल्या तर पुढील वर्षी आवश्यक त्या सुधारणा करता येऊ शकतील. अपंग संघटनांनी ह्या कार्यपद्धतींचा बारकाईने अभ्यास करून आपली निरीक्षणे प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी विद्यापीठाच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्यांचेही स्वागत होईल. )

# परिशिष्ट – ३

## मान्यताप्राप्त प्रयोगशील शाळा यादी

(१) प्राचार्य लीला पाटील
सृजन आनंद विद्यालय
इ वॉर्ड, मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर – ४१६ ००५
दूरध्वनी क्र. : ०२३१–६५६३१०

(२) मुख्याध्यापक
आंदळकर लॉज, भांडारकर रस्ता
पुणे – ४११ ००४
दूरध्वनी क्र. : ०२१२–६७२२२४

(३) कमला निंबकर बालभवन
पो. बॉ. नं. ५५, फलटण
जिल्हा सातारा – ४१५ ५२३
दूरध्वनी क्र. : ०२१६६–२३३२४

(४) उदयाचल विद्यालय
पिरोजशानगर, विक्रोळी, मुंबई – ४०० ०७९
दूरध्वनी क्र. : ०२२–५७७३५३५

(५) डोअर स्टेप स्कूल
जगन्नाथ शंकरशेठ चौक, मनपा शाळा
नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई – ४०० ००७
दूरध्वनी क्र. : ०२२–३८२६३४३

(६) तेजस विद्यालय
राजेंद्र नगर, कोल्हापूर – ४१६ ००४
दूरध्वनी क्र. : ०२३१–६५५९४१

(७) ग्राममंगल
'स्नेहनगरी', ऐना, ता. डहाणू
जिल्हा ठाणे – ४०१ ६०७.

(८) लोकमान्य टिळक विद्यालय
'मनवा' दापोली
जिल्हा रत्नागिरी – ४१५ ७१२
दूरध्वनी क्र. : ०२३५८–८२०७५

(९) श्रमिक सहयोगी
सती, पो. पिंपळी खु.
ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी – ४१५ ६०४
दूरध्वनी क्र. : ०२३५५–५४०२७

(१०) जीवन शाळा
बी–१३, शिवम फ्लॅटस्
एलोरा पार्क रोड, बडोदा – ३९० ००७
दूरध्वनी क्र. : ०२२६५–३८२२३२

(११) साखरशाळा
'प्रचीती', द्वारा ज्ञानप्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११ ०३०
दूरध्वनी क्र. : ०२०–२४७७६९१

(१२) भोंगा शाळा
द्वारा विधायक संसद
उसगाव डोंगरी, पो. भाताणे
ता. वसई,
जिल्हा ठाणे – ४०१ ३०३
दूरध्वनी क्र. : ०२५०–५७००१६

**अत्यंत महत्त्वाचे**

या वर्षीच्या बी.एड. प्रवेश प्रक्रियेत संगणकाचा वापर हा महत्त्वपूर्ण बदल आहे. त्यामुळे गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीची पत्र पोस्टाने पाठविली जाणार नाहीत, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. प्रवेशाबाबतची सर्व माहिती (गुणवत्ता यादीपासून मुलाखत पत्रापर्यंत) केवळ **http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवरच प्रसिद्ध करण्यात येईल.** तेव्हा पान क्रमांक ३५ व ३६ वरील कोष्टकाप्रमाणे वेबसाईट पाहणे ही तुमची जबाबदारी असेल. त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

# मुलाखतीच्यावेळी भरून आणावयाचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**<br>Yashwantrao Chavan Maharashtra Open University<br>Dnyangangotri, Nashik 422 222, MS, India | Form No: | Please paste a passport size (35 mm X 45 mm) Photograph here, Do NOT staple. Photo should not exceed the borders.<br>येथे पासपोर्ट साईजचा (३५X४५ मी.मी.) फोटो चिकटवावा. स्टेपल करू नये. फोटो चौकटीच्या बाहेर जाऊ नये. |

| | | |
|---|---|---|
| Programme Name (शिक्षणक्रमाचे नाव ) : **B.Ed.** | Programme Code शिक्षणक्रम संकेतांक: **P80** | Medium of Programme (शिक्षणक्रमाचे माध्यम ):<br>☐ English ☐ Marathi ☐ Hindi<br>☐ If Other, Specify |
| Year (वर्ष)(प्रथम/द्वितीय/तृतीय): **2016-18** | Semester (सत्र): | |
| Study Centre Name (अभ्यासकेंद्राचे नाव): | Study Centre Code (अभ्यासकेंद्र संकेतांक): | Payment Date: |
| Bank of Maharashtra Challan No: | Amount in Rs.: | Bank Transaction No: |
| For study centre use only (फक्त अभ्यासकेंद्रासाठी ) → | Documents Verified by Study Centre and Eligible for Admission: ☐ Yes ☐ No | |

**Important instructions for students** (विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना):

a. Read prospectus carefully before filling the admission form (प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचावी)
b. Use **black** ink ballpen to fill the form. No overwriting. (अर्ज काळ्या शाईच्या बॉलपेननेच भरावा. खाडाखोड करू नये)
c. Fill in all fields in **CAPITAL English** letters only. (अर्ज भरताना **कॅपिटल इंग्रजी** अक्षरांचाच वापर करावा)
d. **All the information in this form is compulsory and Study Centre should verify that this form is completely filled by the student.**
e. Mark ☑ in appropriate box. (योग्य त्या चौकोनात ☑ अशी खूण करावी.)

↑ Student should sign strictly inside this box only with black ink
विद्यार्थ्याने वरील चौकटीच्या आतच काळ्या शाईने स्वाक्षरी करावी

16 digit PRN, if already given
१६ अंकी कायम नोंदणी क्रमांक (पूर्वी दिलेला असल्यास): | | | | | | | | | | | | | | | | |

## 1. Personal Information Section (वैयक्तिक माहिती)

| | *Last Name* *(आडनाव)* | *First Name* *(स्वतःचे नाव)* | *Father's/Husband's Name* *(वडिलांचे/पतीचे नाव)* | *Mother's Name* *(आईचे नाव)* |
|---|---|---|---|---|
| Name of the Student (in English): | | | | |
| विद्यार्थ्याचे नाव (मराठीमध्ये): | | | | |
| Name of the Student as printed on Leaving or 10th std. certificate (१० वी किंवा शाळेच्या प्रमाणपत्रावर असलेले नाव) | | | | |

Marital Status वैवाहिक स्थिती : ☐ Unmarried अविवाहित ☐ Married विवाहित ☐ Divorced घटस्फोटित ☐ Widowed विधवा/विधुर ☐ Deserted परित्यक्ता

Date of Birth जन्मतारीख : D D M M Y Y Y Y | Gender लिंग: ☐Male पुरुष ☐Female स्त्री | Mother tongue मातृभाषा:

| | | | |
|---|---|---|---|
| Place of Birth जन्माचे ठिकाण: | Blood Group (with Rh) रक्तगट: | Religion धर्म : | Nationality राष्ट्रीयत्व: |
| Student's location Category रहिवासाचे क्षेत्र: | ☐ Rural ग्रामीण | ☐ Urban शहरी | ☐ Tribal आदिवासी |

| | | |
|---|---|---|
| Employment Status: ☐ Employed ☐ Unemployed | Occupation हुद्दा/काम : | Your Annual Income (Rs.) (last financial year) मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न रुपयांत: |
| If Employed: ☐ Service (नोकरी) ☐ Business (धंदा) | Work Experience in Years व्यावसायिक अनुभव: | |
| ☐ Profession (व्यवसाय) ☐ Other इतर | Gap in education in Years शिक्षणातील खंड: | |

Address and Contact Details for Correspondence संपर्कासाठी पत्ता:

PIN पिन: | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Country: | State राज्य: | District जिल्हा: | Tehsil तालुका: | City/Town/Village शहर/गाव/खेडे : |
| Phone STD Code दूरध्वनी एसटीडी: | Phone No. दूरध्वनी क्रमांक: | Mobile number भ्रमणध्वनी क्र.: | Email ID ई-मेल : | |

| | | | |
|---|---|---|---|
| Only for N.R.I./ Foreign Student → | Name of Country (Nationality): | Sponsoring Agency: ☐ Private ☐ Govt ☐Other | |
| Passport No: | Type of Visa: | Residential Permit No: | Police Verification: ☐ Yes ☐ No Enclosed docs |
| Validity upto: | Validity upto: | Date: | |

## 2. Legal Reservation Category Information Section (जातीच्या प्रवर्गाची माहिती)

Domicile of State रहिवासी (राज्य) : | Category जातीचा प्रवर्ग: ☐ Open खुला ☐ Reserved आरक्षित

If Reserved (आरक्षित असल्यास): ☐ SC ☐ ST ☐ DT(A) ☐ NT(B) ☐ NT(C) ☐ NT(D) ☐ OBC ☐ SBC

| | | |
|---|---|---|
| Caste जात: | Sub-Caste उपजात: | Whether belong to Minority Category: ☐ Yes ☐ No If Yes which:<br>☐ Muslim ☐ Jain ☐ Christian ☐ Sikh ☐ Parsi ☐ Nav-Baudh |

If Physically Challenged शारीरिक अपंगत्व | ☐ Visually Impaired दृष्टिदोष | ☐ Speech Impaired मुकबधिर | ☐ Hearing Impaired कर्णबधिर | ☐ Mentally Retarded मतिमंद | ☐ Orthopedic Disorder विकलांग | Percentage of Disability अपंगत्वाचे प्रमाण% : **Enclosed documents**

| 3. Social Reservation Information Section (सामाजिक आरक्षण प्रवर्गाची माहिती) | | | |
|---|---|---|---|
| ☐ Ex-Serviceman माजी सैनिक | ☐ Member of Project Affected Family प्रकल्पग्रस्त | ☐ WPD विधवा/ परित्यक्ता | ☐ Prisoner बंदीजन |
| ☐ Active-Serviceman आजी सैनिक | ☐ Member of Earthquake Affected Family भूकंपग्रस्त | ☐ Freedom Fighter स्वातंत्र्य सैनिक | |

**4. Other Information (इतर माहिती)**

☐ University Employee/ 's Children ☐ Artist Person ☐ Sports Person played at College/ District/ State/ National/ International level

**5. Guardian Information Section (पालकाबद्दल माहिती)**

| | |
|---|---|
| **Guardian's Name** पालकाचे नांव: | Annual Income of the Guardian (Rs.) (last financial year) पालकाचे मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न रुपयांत: |
| **Occupation of the Guardian** पालकाचा हुद्दा/काम : Service नोकरी / Business धंदा / Profession व्यवसाय / Farming Farmer शेती / Laborer मजुरी/ Retired निवृत्त / Other इतर | |
| **Relationship of guardian with applicant** पालकाशी नाते: | **Phone No.** पालकाचा दूरध्वनी क्र.: |

**6. Educational Details Section (शैक्षणिक माहिती)**

[Write 'YES' in the last column, against the qualifying examination, on the basis of which you are seeking admission to the said course. Write 'NO' in front of other examinations]
[आपल्या अर्हता परीक्षेसमोरील शेवटच्या रकान्यात 'Yes' लिहावे] **Please Note: 10th Details are mandatory if passed. १० वी परीक्षा उत्तीर्ण असल्यास माहिती आवश्यक आहे**

**Last College Attended** शेवटचे कॉलेज/शाळा: | **Year** वर्ष: | **Roll No.:**

| Name of Examination परीक्षा | Name of Board /University बोर्ड/विद्यापीठ | Name of School/College शाळा/कॉलेज | Date of Passing (DD/MM/YYYY) उत्तीर्ण दिनांक | Examination Seat No. (Last) परीक्षा आसन क्र. | Degree / Passing Certificate No. प्रमाणपत्र / पदवी क्र. | Marks Obtained मिळालेले गुण | Out of पैकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **बी.एड** | | | | | | | |
| YCMOU Preparatory/ Other (इतर) | | | | | | | |
| YET/CET Qualifying/ Entrance/ Aptitude Test Details (अर्हता परीक्षा माहिती) | | | | | | | |

**7. Experience**

| Sr.No. | Name of the Institution | Experience in Months and Year |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | Total Experience | **Months : Years :** |

**8. Enclosures सोबत जोडलेली कागदपत्रे:**

| | | |
|---|---|---|
| 1. | 4. | 7. |
| 2. | 5. | 8. |
| 3. | 6. | 9. |

**9. Declaration by Student विद्यार्थ्याने दिलेली हमी**

मी असे नमूद करतो की, प्रवेशासंबंधीचे माहितीपुस्तिकेतील नियम मी वाचले आहेत. प्रवेश अर्जातील भरलेली माहिती पूर्णपणे खरी असून कागदपत्रे जोडलेली आहेत. **अंतिम प्रवेश मुख्यालयातून निश्चित केला जाईल, तसेच भरलेले शुल्क परत किंवा वर्ग केले जाणार नाही, याची मला जाणीव आहे.** विद्यापीठाने घेतलेले प्रवेशाबाबतचे निर्णय व त्यात वेळोवेळी झालेले बदल मला बंधनकारक राहतील, तरी आपण मला प्रवेश द्यावा ही विनंती.

I hereby declare that, I have read the rules related to admission as given in the prospectus; and that the information furnished by me is true and complete to the best of my knowledge. **I am aware that my admission will be finalized by the University headquarters and that the admission fee will not be returned or transferred to next year in any case.** I further agree that the decision taken by the University and any change made in the rules regarding admission from time to time will be binding on me.

**Place** ठिकाण:

**Date** दिनांक: **Signature of the student** विद्यार्थ्यांची स्वाक्षरी:

**Note:** Student **MUST** retain photocopy of completely filled in admission form (both pages) for future reference. Available information in this form will be required to activate his/her account on http://ycmou.digitaluniversity.ac portal. पूर्ण भरलेल्या अर्जाची (दोन्ही बाजू) एक प्रत विद्यार्थ्याने **स्वतःकडे ठेवणे आवश्यक** आहे. ह्या अर्जावरील माहितीच्या आधारेच 'ई-सुविधा' अकाऊन्ट http://ycmou.digitaluniversity.ac वर अॅक्टिव्हेट करता येईल.

Anurath/X14-287

© २०१५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ प्रथम प्रकाशन : जून २०१५

■ **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

Anurath/X14-286

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम : २०१६-१८

## (प्रवेश-अर्जासोबत जोडावयाचे सहपत्र) सेवा माहिती प्रपत्र

(१) विद्यार्थ्याचे नाव : ______________________

(२) पत्ता : ______________________

______________________

______________________

(३) शाळेचा प्रकार : (अ) प्राथमिक ☐ (आ) प्रयोगशालेय ☐

(४) शाळेचा प्रकार : (अ) अनुदानित ☐ (आ) विनाअनुदानित ☐

(५) (अ) पूर्ण वेळ शिक्षक म्हणून ३० एप्रिल २०१६ अखेरपर्यंत निर्दिष्ट केलेल्या सेवेचा तपशील : ☐ वर्षे ☐ महिने

| *क्र.* | *विद्यालयाचे नाव* | *शिकविलेले/ शिकवीत असलेले वर्ग* | *सेवेचा कालावधी* | | *वर्षे* | *अध्यापनाचे विषय* |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | *पासून* | *पर्यंत* | | |
| १. | | | - -१९ | - -१९ | | |
| २. | | | - -१९ | - -१९ | | |
| ३. | | | - -१९ | - -१९ | | |
| ४. | | | - -१९ | - -१९ | | |
| ५. | | | - -२० | - -२० | | |
| ६. * | | | - -२० | - -२० | | |
| | | | | एकूण सेवाकाल | | |

**(* सहापेक्षा अधिक शाळांत नोकरी असेल तर स्वतंत्र पानावर माहिती द्यावी)**

(आ) अर्धवेळ शिक्षक म्हणून ३० एप्रिल २०१६ अखेरपर्यंत निर्दिष्ट केलेल्या सेवेचा तपशील : ☐ वर्षे ☐ महिने

| *क्र.* | *विद्यालयाचे नाव* | *शिकविलेले/ शिकवीत असलेले वर्ग* | *सेवेचा कालावधी* | | *वर्षे* | *अध्यापनाचे विषय* |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | *पासून* | *पर्यंत* | | |
| १. | | | - -१९ | - -१९ | | |
| २. | | | - -१९ | - -१९ | | |
| ३. | | | - -१९ | - -१९ | | |
| ४. | | | - -१९ | - -१९ | | |
| ५. | | | - -२० | - -२० | | |
| ६. * | | | - -२० | - -२० | | |
| | | | | एकूण सेवाकाल | | |

**(* सहापेक्षा अधिक शाळांत नोकरी असेल तर स्वतंत्र पानावर माहिती द्यावी)**

P1

**टीप :** (१) दिनांकाचा स्पष्ट उल्लेख असावा. (२) ज्या सेवेचे अनुभव प्रमाणपत्राशिवाय इतर पुरावे (उदा.  नियुक्ती आदेश, सेवा पुस्तिका, शाळा तपासणी अहवाल, इत्यादी) आपण देऊ शकता ती सेवा मुद्दा क्र. १६ मध्ये नोंदवावी. कारण ते सर्व पुरावे, शाळा मान्यता प्रत शिक्षक पद मान्यता प्रत, कायम सेवेत असल्यास तसे प्रमाणपत्र आपणास मुलाखतीच्या वेळी सादर करावे लागते.)

**वरिष्ठ श्रेणी/स्केल घेणाऱ्या शिक्षकांनीच फक्त हा मुद्दा भरावा**

मला .......................... तारखेपासून वरिष्ठ श्रेणी/स्केल देण्यात आले असून .......................... तारखेच्या आत बी.एड. शिक्षणक्रम पूर्ण करण्यास सांगितले आहे. कृपया मला यावर्षी बी.एड. शिक्षणक्रम करण्याची संधी द्यावी ही विनंती. (मुलाखतीच्या वेळी या संदर्भातील आपणांस प्राप्त झालेला आदेश दाखविणे अनिवार्य असेल.

## प्रतिज्ञापत्र

सदर आवेदनपत्रात दिलेली सर्व माहिती मी स्वतः भरलेली असून ती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे. **ती चुकीची वा खोटी आहे असे आढळल्यास मी प्रवेशास अपात्र होईल किंवा मला प्रवेश मिळाला असल्यास तो रद्द होईल ह्याची मला जाणीव आहे.** प्रवेश-अर्जात भरलेली माहिती व संगणकीय प्रपत्रात भरलेली माहिती सारखी आणि एकच असून तफावत आढळल्यास माझ्या विरोधात विद्यापीठाची फसवणूक केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात येईल, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. **प्रवेश–अर्जासोबतची माहितीपुस्तिका मी काळजीपूर्वक वाचलेली आहे. त्यातील सर्व अटी व नियम मला मान्य आहेत व त्याबाबत मी कोणतीही तक्रार करणार नाही.**

**स्थळ :** **अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

**दिनांक :** / /२०१६

---

## केवळ प्रयोगशील शाळेतील शिक्षकांसाठी हमीपत्र

मी श्री./श्रीमती ______________________ हे ______________________

*(स्वतःचे नाव)* *(गावाचे नाव)*

या गावातील ______________________ या प्रयोगशील शाळेत __________

*(शाळेचे नाव)*

वर्षांपासून सेवेत आहे. मला या मुक्त विद्यापीठात बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश मिळाल्यास माझा हा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर त्या पुढील किमान पाच वर्षे मी याच प्रयोगशील शाळेत माझी सेवा/नोकरी सुरू ठेवेन हे मी हमीपत्र लिहून देतो.

**प्रयोगशील शाळेतून अर्ज करणाऱ्या**
**अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही**

उपर्युक्त शिक्षक आमच्या ______________________ या प्रयोगशील शाळेत ...........

वर्षांपासून सेवेत आहेत. त्यांना या शिक्षणक्रमास प्रवेश मिळाल्यास त्यांचे सर्व प्रात्यक्षिक कार्य त्यांना आमच्या शाळेत पूर्ण करण्यास मी मान्यता देत आहे. कारण यापुढील काळात किमान पाच वर्षे ते आमच्याकडे सेवा करतील असे त्यांनी हमीपत्र दिलेले आहे.

**प्रयोगशील शाळेचे मुख्याध्यापक**
**संपूर्ण नाव व सही**

P2

## सर्व अर्जदार व्यक्तीने भरावयाचे हमीपत्र

मी ______________________________

*(पूर्ण नाव)*

(१) प्रवेश-अर्ज भरण्यापूर्वी या माहितीपुस्तिकेतील सर्व माहिती मी वाचलेली आहे. प्रवेशासंदर्भात दिलेले सर्व नियम व अटी मला मान्य असून त्याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

(२) मी हमी देतो की, प्रस्तुत शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते सरावपाठ व ह्या शिक्षणक्रमाची शाळेशी संबंधित **सर्व प्रात्यक्षिके** मी विनातक्रार पूर्ण करेन. सदर पाठ व प्रात्यक्षिके सादर केल्याशिवाय हा शिक्षणक्रम मला पूर्ण करता येणार नाही ह्याची मला जाणीव आहे.

दिनांक :    /    /

अर्जदाराचे नाव व सही

**टीप : अर्जासोबत कोणत्याही कागदपत्रांची झेरॉक्स जोडू नये. फक्त अर्ज व प्रवेश-अर्ज सूचनांनुसार अचूक भरून द्यावा.**

**अत्यंत महत्त्वाचे : केवळ प्राथमिक शिक्षकांसाठी**

बी.एड. प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांनी पुढील शिफारस-प्रमाणपत्र प्रवेश-अर्जाबरोबर न जोडता आपले नाव गुणवत्ता यादीत आल्यास मुलाखतीच्या वेळी आणणे आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र नसेल तर मुलाखत घेतली जाणार नाही.

*(हा अर्ज जमा करताना हे पान फाडून स्वतःजवळ ठेवावे व प्रवेश मुलाखतीला येताना भरून सोबत आणावे)*

---

## प्राथमिक शिक्षकांची शिफारस - प्रमाणपत्र

(इयत्ता १ली ते ७वी ला अध्यापन करणारे शिक्षकांसाठी)

### प्रमाणपत्र ★

मी ____________________________________________

*(अधिकाऱ्याचे पूर्ण नाव)*

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती / प्रशासन अधिकारी, नगरपालिका / शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगरपालिका

*(नको असलेले खोडावे)*

________________ असे प्रमाणपत्र देतो की, श्री. ________________________________

*(गावाचे नाव)* *(शिक्षकाचे नाव)*

शाळेचे नाव ________________________ गावाचे नाव ______________ ता. ______________ जि. ________________ येथे सहायक शिक्षक पदावर ............. वेतनश्रेणीत कार्यरत असून त्यांची नियुक्ती शासनाने मान्य केलेल्या पदावर दि.  /  /  पासून आहे. निर्दिष्ट केलेल्या तारखेपर्यंत त्यांच्या सेवेचा एकूण कालावधी .......... वर्षे ........ महिने ........ दिवस इतका असून त्यांच्या सेवेबाबतची पूर्ण कागदपत्रे मी तपासली आहेत. त्यांच्या सेवेच्या येथे नमूद केलेल्या तपशिलात तफावत व विसंगती राहिल्यास वा सिद्ध झाल्यास मी जबाबदार राहीन.

स्थळ : दिनांक : ........................ आयुक्त / गटशिक्षणाधिकारी - शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/

प्रशासन अधिकारी

स्वाक्षरी व शिक्का

★ सदर प्रमाणपत्र जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकेतील तसेच महानगरपालिका अंतर्गत कार्यरत शिक्षकांनीच भरावे. खाजगी संस्थेच्या शिक्षकांनी सदर प्रमाणपत्र भरू नये. त्यांनी पूर्ण अनुभवाचे दाखले व नियुक्ती आदेशाच्या प्रती जोडाव्यात.

---

## मेंटार प्रपत्र

दिनांक :    /    /    .

प्रति,
मा. संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ,
नाशिक

(१) मी श्री./श्रीमती ________________________________ बी.एड. २०१६- २०१८
या तुकडीचा विद्यार्थी आहे.

(२) माझा प्रवेश ........................ या जिल्ह्यात झालेला आहे.

(३) माझी सेवा ............................................................................................... या
शाळेत सुरू आहे.

(४) माझ्या शाळेतील पाठांसाठी आणि या शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक कालावधीतील इतर प्रात्यक्षिकांसाठी
श्री. / श्रीमती ........................................................................... हे शाळेतील वरिष्ठ शिक्षक
मेंटर म्हणून काम करण्यास तयार आहेत. त्यांची शैक्षणिक अर्हता ..................... अशी आहे.

(५) मेंटरचे मान्यता पत्र जोडलेले आहे.
कृपया त्यास मान्यता द्यावी, ही विनंती

________________________

________________________

**प्रवेशेच्छू विद्यार्थ्याचे नाव व सही**

**मार्फत** : संबंधित मेंटार

---

## मान्यता पत्र

श्री./श्रीमती ........................................................................................ यांना आपल्या बी.एड.
शिक्षणक्रम पूर्णतेसंबंधातील शाळेतील पाठ व इतर प्रात्यक्षिकांना मार्गदर्शन व मूल्यमापन करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

**संचालक**
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ

# बी.एड. शैक्षणिक वेळापत्रक

**वर्ष १**

| अ.क्र. | महिना | कार्य |
|---|---|---|
| ०१. | जुलै दुसरा आठवडा | जाहिरात |
| ०२. | जुलै शेवटचा व ऑगस्ट प्रथम आठवडा | प्रवेशासाठी अर्ज स्वीकृती |
| ०३. | ऑगस्ट अखेर | प्रवेश निश्चिती |
| ०४. | सप्टेंबर | अभ्याससाहित्य प्राप्ती व उद्बोधन कृतिसत्र (२ दिवस) (शिक्षणक्रम परिचय) |
| ०५. | ऑक्टोबर / नोव्हेंबर | प्रथम संपर्कसत्र (१२ दिवस) (१५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान) (सूक्ष्म अध्यापन) |
| ०६. | ऑक्टो./नोव्हें. ते मे | अभ्यासकेंद्रावर संगणक संबंधित प्रात्यक्षिक कार्य नियुक्त संगणक |
| ०७. | मार्च | परीक्षा अर्ज भरणे |
| ०८. | मे | अंतिम परीक्षा (सत्र १) |

**वर्ष २**

| अ.क्र. | महिना | कार्य |
|---|---|---|
| ०९. | मे (संपूर्ण महिना) | द्वितीय कृतिसत्र (२२ दिवस) (आ.अ.प. सरावपाठासंबंधित प्रात्यक्षिक व संमंत्रण) |
| १०. | ऑगस्ट (चौथा आठवडा) | तृतीय संपर्कसत्र (२ दिवस) चाचणी पाठ |
| ११. | ऑक्टोबर/नोव्हेंबर (१५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान) | चौथे संपर्कसत्र (८ दिवस) (संमंत्रण, स.प.स. स्वयं-मूल्यमापन आणि सलग साप्ताहिक पाठ माहिती व प्रात्यक्षिक सादरीकरण) |
| १२. | नोव्हेंबर/डिसेंबर (१ नोव्हें. ते १० डिसेंबर १० जानेवारी) | पाचवे संपर्कसत्र (२ दिवस) स.प.स. संदर्भात बैठका रिव्हयूसेशन (२ दिवस) |
| १३. | मार्च (दुसरा आठवडा) | मौखिक परीक्षा (२ दिवस) |
| १४. | मार्च | परीक्षा अर्ज भरणे |
| १५. | मे | अंतिम परीक्षा (सत्र - २) |
| १६. | जुलै/ऑगस्ट | निकाल |